मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.
https://www.vruttamanas.in/
# वृत्तमानस
Email : vrittamanas1@gmail. com
मुंबई/ पालघर | सोमवार, १४ ऑक्टोबर २०२४ | वर्ष- २९ | अंक - ११४ | पाने- ८ | आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६ | किंमत : ३ रुपये

## बांग्लादेश सरकारने हिंदू आणि अल्पसंख्यांकांचे संरक्षण करावे - भारत

**नवी दिल्ली :** बांगलादेश सरकारने हिंदू आणि सर्व अल्पसंख्याकांसाठी प्रार्थनास्थळांचे संरक्षण करावे, अशी मागणी भारताने केली आहे. भारताच्या या आरोपांदरम्यान बांगलादेशच्या अंतरिम सरकारचे प्रमुख मोहम्मद युनूस यांनी ढाकेश्वरी मंदिराला भेट दिली. येथे पोहोचल्यानंतर ते म्हणाले की, आम्हाला बांगलादेश हा असा देश बनवायचा आहे जिथे सर्व धर्माच्या लोकांचे हक्क सुरक्षित असतील.ढाका येथील तंटीबाजार येथील पूजा मंदिरावर झालेला हल्ला आणि बांगलादेशातील सातखीरा येथील जेशोरेश्वरी काली मंदिरात झालेल्या चोरीच्या घटनेवर भारताने चिंता व्यक्त केली आहे.



अहिका-सुतीर्थाने आशियाई टेबल टेनिसमध्ये जिंकले कांस्यपदक

पान ७

# महिलांचा शाश्वत विकास हेच शासनाचे मुख्य ध्येय -मुख्यमंत्री

### 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेसह सर्व योजना सुरूच राहणार

**प्रतिनिधी**
**नांदेड**

राज्य शासनाची 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजना देशभरात सुपर हिट झाली. या योजनेसह इतर योजनांमधूनही महिलांना आर्थिक सक्षम करण्याचे काम राज्य शासन करत आहे. या योजनांच्या माध्यमातून महिलांचा सर्वांगीण व शाश्वत विकास व्हावा, हेच शासनाचे मुख्य ध्येय असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. या योजनेसह शासनाच्या सर्व योजना 'पर्मनंट' सुरू राहतील, असा विश्वासही त्यांनी उपस्थित लाडक्या बहिणींसमोर व्यक्त केला.

नांदेड येथील कृषी उत्पन्न बाजार समिती, नवा मोंढा मैदानावर जिल्हा प्रशासनाच्या वतीने आयोजित मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियान कार्यक्रमात मुख्यमंत्री बोलत होते. या कार्यक्रमास सर्वश्री माजी मुख्यमंत्री व खासदार अशोक चव्हाण, मा. बाळासाहेब ठाकरे हरिद्रा संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे अध्यक्ष हेमंत पाटील, आमदार बालाजी कल्याणकर, भीमराव केराम, डॉ. तुषार राठोड, श्यामसुंदर शिंदे, राजेश पवार, जिल्हाधिकारी अभिजित राऊत, परभणी जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे, नांदेड जि.प.च्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल, पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांची उपस्थिती होती.



### गोमातांचे पूजन, 'खेळ पैठणी'ची रंगत

राज्यमाता म्हणून नुकताच गायीला सन्मान राज्याने दिला आहे. याच पार्श्वभूमीवर लाल कंधारी, मथुरा लभाण, देवणी या प्रजातीच्या गोमातांचे पूजन करून कार्यक्रमास सुरूवात झाली. तत्पूर्वी शालेय विद्यार्थ्यांच्या पारंपरिक वेशभूषेतील कला, गितांनी कार्यक्रमाने रंगत आणली. तसेच उपस्थितांची मने जिंकली. त्यानंतर 'खेळ पैठणीचा' हा प्रश्न मंजुषा कार्यक्रम पार पडला. यामध्ये विचारलेल्या प्रश्नाला बरोबर उत्तर देणाऱ्या प्रत्येक विजेत्या महिलेस मुख्यमंत्री जनकल्याण कक्षाचे राज्य समन्वयक डॉ. अमोल शिंदे, आमदार कल्याणकर, जिल्हाधिकारी राऊत यांच्या हस्ते पैठणी बक्षीस म्हणून देण्यात आली.

## म ह त्त्वा चे

### दिल्ली विद्यापीठाचे माजी प्राध्यापक साईबाबा यांचे निधन



**नवी दिल्ली :** दिल्ली विद्यापीठाचे माजी प्राध्यापक जी एन साईबाबा यांचे आज (१२ ऑक्टोबर) निधन झाल्याची माहिती समोर आली आहे. गेल्या काही दिवसांपासून त्यांच्यावर हैदराबादमधील निजाम इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस रुग्णालयात उपचार सुरू होते. जी एन साईबाबा यांच्या पित्ताशयावर काही दिवसांपूर्वीच शस्त्रक्रिया पार पडली होती. मात्र, या शस्त्रक्रियेनंतर शनिवारी रात्री उशिरा त्यांचं निधन झालं. ते ५७ वर्षांचे होते.जी एन साईबाबा यांच्या प्रकृती अस्वस्थतेमुळे त्यांना १० दिवसांपूर्वी निम्समध्ये दाखल करण्यात आलं होतं. त्यानंतर पित्ताशयावर शस्त्रक्रिया करण्यात आली होती.दिल्ली विद्यापीठाचे माजी प्राध्यापक जी एन साईबाबा यांना आणि त्यांच्या काही सहकाऱ्यांना ९ मे २०१४ रोजी मावोवादी गटाशी संबंध असल्याच्या आरोपावरुन पोलिसांनी त्यांच्या घरातून त्यांना अटक केली होती. त्यांच्यावर मावोवादी गटाशी संबंध असल्याचा आरोप करण्यात आला होता.नक्षलवाद्यांशी असलेल्या कथित संबंधांच्या आरोपांखाली अटकेची कारवाई झाल्यानंतर जी.एन.साईबाबा आणि इतर पाच जणांची मुंबई उच्च न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली होती. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठानं साईबाबा व त्यांच्यासह इतर पाच आरोपींची निर्दोष मुक्तता केली होती.

### रिक्षाचालकांकडून मनसे कार्यकर्त्याची हत्या

**मुंबई :** मुंबईच्या मालाड पूर्वेमध्ये मनसे कार्यकर्त्याची हत्या झालीय. मनसेकडून पोलिसांचं तपासावर प्रश्नचिन्ह? उपस्थित केले जात आहे.बाबा सिद्दिकी यांना वेगळा न्याय आणि मनसे कार्यकर्ताला वेगळा न्याय का? असा सवाल मनसेकडून उपस्थित केला जात आहे. अधिकच्या माहितीनुसार, मुंबईच्या मालाड पूर्वेत दिंडोशी परिसरात मनसे कार्यकर्त्याची हत्या झालीय. रिक्षा चालक आणि स्थानिक फेरीवाल्यांकडून मनसे कार्यकर्त्याची हत्या झाल्याचे सांगण्यात आले. आकाश माईन याचे वय २७ वर्ष आहे.

## बिश्नोई गँगने घेतली बाबा सिद्दीकी यांच्या हत्येची जबाबदारी

### पुण्यातून प्रवीण लोणकरला अटक

**प्रतिनिधी**
**मुंबई**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अजित पवार गटाचे नेते बाबा सिद्दीकी यांची शनिवारी रात्री गोळ्या घालून हत्या करण्यात आली आहे. रात्री ९:३० वाजताच्या सुमारास झीशान सिद्दीकी यांच्या कार्यलयाबाहेर ही धक्कादायक घटना घडली. बाबा सिद्दीकी यांच्या हत्येची जबाबदारी बिश्नोई गँगने स्विकारली आहे. बिश्नोई गँगने सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत याबद्दलची माहिती दिली आहे.

समाजमाध्यमांवर सध्या एक पोस्ट व्हायरल होत आहे. या पोस्टमध्ये बाबा सिद्दीकी यांच्या हत्येची जबाबदारी बिश्नोई गँगने घेतली असल्याचे सांगितले जात आहे. बिश्नोई गँगमधील एका सदस्याने ही पोस्ट शेअर केली असून, या गोळीबाराची जबाबदारी अनमोल बिश्नोई याने घेतली आहे. केंद्रीय तपास यंत्रणांनी या पोस्टकर्त्याचा तपास केला असता, शुभम रामेश्वर लोणकर या इसमाचे नाव पुढे आले आहे. पोस्ट लिहीणारा शुभम पुण्याचा असून बिश्नोई गँगसोबत त्याचे संबंध असल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे. या पूर्वी देखील शुभम लोणकर याला अकोला इथुन अवैध शस्त्रे बाळगल्याप्रकरणी अटक करण्यात आली होती. शुभम लोणकर हा २०२२ आणि २०२३ या दोन वर्षांमध्ये लॉरेन्स बिश्नोई याच्यासोबत whatsapp व्हिडिओ कॉल वर संपर्कात होता.



बाबा सिद्दीकी हत्या प्रकरणी पोलिसांनी तिसऱ्या आरोपीलाही अटक केली आहे. प्रवीण लोणकर नावाच्या इसमाला पुण्यावरून अटक करण्यात आली आहे. 28 वर्षीय प्रवीण लोणकर हा शुभम लोणकर यांचा भाऊ आहे. प्रवीण लोणकर हा गटातील एक सूत्रधार, असल्याचं सांगण्यात येत आहे.

### सिद्दीकी यांच्या मारेकऱ्यांना शिक्षा होईपर्यंत शांत बसणार नाही - अजित पवार

**मुंबई :** बाबा सिद्दीकी यांच्या हत्येला जबाबदार असलेल्यांना शिक्षा होईपर्यंत आपण शांत बसणार नाही, असा इशारा उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांनी दिला आहे. सोशल मीडियावर पोस्ट करत ते म्हणाले की, अनेकांचे मनापासून प्रेम करणारे नेते बाबा सिद्दीकी यांच्या दु:खद निधनाने राष्ट्रवादी काँग्रेस उद्ध्वस्त झाली आहे. आणि वैयक्तिकरित्या मी एक प्रिय मित्र गमावला आहे. ज्याला मी वर्षानुवर्षे ओळखतो. ते पुढे म्हणाले की, "आम्ही दु:खी आहोत. आम्ही या घटनेची क्रूरता समजून घेत आहोत, आम्ही हृदयापासून दु:खी असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

### 'मवीआ'कडून 'गद्दारांचा पंचनामा' पुस्तकाचे प्रकाशन

## मुख्यमंत्रीपदाची खुर्ची आमच्यासाठी महत्वाची नाही, खोकेवाल्यांसाठी आहे - नाना पटोले

**प्रतिनिधी**
**मुंबई**

आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने आज महाविकास आघाडीच्या वतीने पत्रकार परिषद पार पडली. या पत्रकार परिषदेत गद्दारांचा पंचनामा नावाने पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. सत्ताधाऱ्यांच्या विरोधातील आरोपपत्राची मविआकडून घोषणा करण्यात आली. पत्रकार परिषद सुरू होण्यापूर्वी महायुतीवर टीका करणारी चित्रफित दाखवण्यात आली. आचारसंहिता लागण्यासाधी महाविकास आघाडीचे सरकारवर बरसले. यावेळी उद्धव ठाकरे, शरद पवार, नाना पटोले, सुप्रिया सुळे, अनिल देसाई, आदित्य ठाकरे, पृथ्वीराज चव्हाण, विजय वडेट्टीवार, वर्षा, गायकवाड, संजय राऊत, अरविंद सावंत उपस्थित होते.



यावेळी नाना पटोले आणि उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्रीपदाच्या चेहऱ्याबाबत भाष्य केले. आम्ही एक असून एकमताने मुख्यमंत्री ठरवू, मुख्यमंत्रीपदाची खुर्ची आमच्यासाठी महत्वाची नाही. खोकेवाल्यांसाठी आहे. महाराष्ट्र धोक्यात असून तो वाचवायचा आहे, असे नाना पटोले म्हणाले.

मुख्यमंत्रीपदाबाबत बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले की, महायुतीचा मुख्यमंत्रीपदाचा चेहरा जाहीर करुन द्या, आमचा आम्ही लगेच करू. भाजपची दयनीय अवस्था झाली आहे. आमच्याकडून मुख्यमंत्रीपदाचा चेहरा अपेक्षित करत आहेत, अशी टीका देखील ठाकरे यांनी केली.

### 'मुडा घोटाळ्या'वरून मोठा निर्णय

## खरगेंनी कर्नाटक सरकारला जमीन केली परत

**वृत्तसंस्था**
**बेंगळुरू**

खरगे कुटुंबीयांच्या सिद्धार्थ विहार ट्रस्टला देण्यात आलेली पाच एकर जमीन कर्नाटक सरकारला परत करण्याचा निर्णय काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आणि त्यांच्या कुटुंबीयांनी घेतला आहे. म्हैसूर अर्बन डेव्हलपमेंट ॲथॉरिटी (मुडा) घोटाळ्याच्या चौकशीदरम्यान खरगे यांनी हे पाऊल उचलले आहे.

पाच एकर जमीन खरगे यांचे पुत्र राहुल एम खरगे यांना कर्नाटक औद्योगिक क्षेत्र विकास मंडळाने (KIADB) बागलूरमधील हाय-टेक डिफेन्स अँड एरोस्पेस पार्कमध्ये हार्डवेअर क्षेत्रात दिली होती.यापूर्वी कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्या पत्नी पार्वती बी. एम. यांनी 30 सप्टेंबर रोजी 14 भूखंड मुडाला परत करण्याचे म्हटले होते. याबाबत सिद्धरामय्या म्हणाले की, माझ्याविरोधात सुरू असलेल्या राजकीय षडयंत्रामुळे दुखावले जात असल्याने माझ्या पत्नीने भूखंड परत करण्याचा निर्णय घेतला आहे.

### ट्रस्टसाठी 5 एकर जमीन दिली होती



वास्तविक, ईडीने 30 सप्टेंबर रोजी मुख्यमंत्री सिद्धरामय्या, त्यांची पत्नी, मेहुणा आणि इतरांविरुद्ध एफआयआर नोंदवला होता. यापूर्वी म्हैसूर लोकायुक्तांनी 27 सप्टेंबर रोजी सर्वांविरुद्ध गुन्हा दाखल केला होता. लोकायुक्तांनी एक ऑक्टोबरपासून या प्रकरणाची चौकशी सुरू केली आहे.

### 'ना युती-ना आघाडी', मनसे स्वतंत्र निवडणूक लढणार

**मुंबई :** नवनिर्माण सेना स्वतंत्रपणे निवडणुकीला सामोरे जाणार असल्याचे राज ठाकरे यांनी स्पष्ट केले आहे. आगामी निवडणुकीनंतर महाराष्ट्र नवनिर्माण सेना हा सत्तेमधील पक्ष असेल, असा दावा देखील राज ठाकरे यांनी केला. महाराष्ट्रातील मतदारांनी महाराष्ट्र निर्माण सेनेवर विश्वास दाखवावा, त्यांना आपण उत्तम महाराष्ट्र घडवून दाखवू. जगाला हे हेवा वाटावा असा महाराष्ट्र घडवून दाखवावा, एवढीच माझी प्रामाणिक इच्छा आहे. या महाराष्ट्राचे धुरा माझ्या हातामध्ये द्या, अशी विनंती देखील राज ठाकरे यांनी राज्यातील जनतेला केली. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने लोकसभा निवडणुकीत महायुतीला पाठिंबा देण्यात आला होता. त्यामुळे मनसे विधानसभा निवडणुकीत देखील युती सोबत जाईल, अशी शक्यता वर्तवली जात होती. मात्र गेल्या काही दिवसांपासून राज ठाकरे यांनी उमेदवारांच्या नावाची घोषणा सुरू केली होती. त्यातच त्यांनी 200 पेक्षा जास्त विधानसभा निवडणुका लढवण्याची घोषणा देखील केली होती.




### ३६ हजार फुटांवर विमानात बिघाड

## पुण्याच्या लेकीने वाचविले 140 प्रवाशांचे प्राण

### मराठमोळ्या मैत्रेयीचे जगभरातून होतेय कौतुक

**प्रतिनिधी**
**पुणे**

जमिनीपासून हवेत ३६ हजार फूट उंचीवर असणाऱ्या विमानामध्ये बिघाड झाला आणि सर्व प्रवाशांच्या हृदयाची धडधड अधिकच वाढली. आता आपण काही वाचणार नाही, अशीच अवस्था सर्वांची झाली होती. पण त्यामध्ये पुण्याच्या सहवैमानिक असणाऱ्या मैत्रेयी शितोळे हिने अतिशय धीराने सर्व परिस्थिती हाताळली आणि विमानातील बिघाड दुरुस्त केला. त्यामुळे विमानातील तब्बल १४० प्रवाशांचे प्राण वाचले. या पुणेकर लेकीच्या धैर्याचे जगभर कौतुक होत आहे.



एअर इंडियाचे एक विमान शुक्रवारी (दि.११) सायंकाळी त्रिचीहून शारजाला जात होते. तमिळनाडूच्या त्रिची एअरपोर्टवर नेहमीप्रमाणे गजबज होती. प्रवाशी ये-जा करत होते, पण अचानक विमानाच्या हायड्रॉलिक यंत्रणेत बिघाड झाल्याचे समजताच सर्वत्र धावपळ सुरू झाली. एअर इंडियाचे 'फ्लाइट आयएक्स ६१३' या विमानात तब्बल ३६ हजार फूट उंचीवर बिघाड झाला होता. एक-दोन नव्हे तर तब्बल १४० प्रवाशांचा जीव त्यामुळे धोक्यात होता. विमानातील हायड्रॉलिक सिस्टिममध्ये अचानक बिघाड झाला आणि ते निकामी झाले. त्यामुळे वैमानिकांना चांगलीच कसरत करावी लागली. हायड्रॉलिक सिस्टिममध्ये बिघाड झाल्याचे समजल्यानंतर विमानतळावर आणखीनच गोंधळ उडाला. एअर इंडिया फ्लाइटचे पायलट क्रोम रिफादली फहमी झैनाल आणि सहवैमानिक मैत्रेयी शितोळे यांच्यासाठी ही परिस्थिती अतिशय गंभीर होती. त्यांची कसोटी पाहणारी होती. त्या दोघांनी विमानाला सुरक्षित खाली उतरवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले आणि अखेर धावपट्टीचा अंदाज लावून विमान सुरक्षितरीत्या उतरवले.

### घिरट्या घालून विमानातले इंधन कमी करून लँडिंग

विमानामध्ये हायड्रोलिक सिस्टिममध्ये बिघाड झालेला. यामुळे विमान संचलन करताना इतर यंत्रणेमध्ये बिघाड होऊ शकतो, तसेच अनेक अडचणी येतात. म्हणून वैमानिकांनी विमान टेक ऑफ केल्यानंतर तिथेच लॅडिंग केले. पण लॅन्डिंग करताना काही प्रोटोकॉल असतात. विमान लॅन्डिंग करताना त्यातील इंधन कमी झालेले असते. पण हे विमान इंधनाने पूर्ण लोडेड होते. त्यामुळे ते इंधन कमी केल्याशिवाय लॅन्ड करता येत नव्हते. म्हणून विमानाने काही काळ घिरट्या मारून इंधन कमी केले. त्यानंतर लॅन्डिंग करण्यात आले, अशी माहिती वैमानिक सेवा सल्लागार धैर्यशिल वंडेकर यांनी दिली.

## राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे कॅन्सरग्रस्तांना अन्नदान वाटप

**मुंबई :** मुंबई जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेस दक्षिण मध्य-मुंबई जिल्हाध्यक्ष समाजरत्न डॉ. सिद्धार्थदादा टी.कांबळे यांच्या वाढदिवसानिमित्त चांदिवली तालुकाध्यक्ष सुरेंद्र सिंह यांच्या नेतृत्वाखाली टाटा कॅन्सर हॉस्पिटलजवळ अन्नदानाचा कार्यक्रम संपन्न झाला. याशिवाय कॅन्सरग्रस्त रुग्णांच्या समस्या सोडविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचा निर्धारही यावेळी करण्यात आला, यावेळी चांदिवली राष्ट्रवादी परिवाराचे प्रशांत बारामती (जिल्हाप्रमुख सामाजिक विभाग), अस्लम शेख जिल्हा सचिव, संतोष गवळी (162 प्रभाग अध्यक्ष) डॉ. ) सचिन वाकोडे (तालुका अध्यक्ष सामाजिक), आलोक राय युवक समाजसेवक आणि आनंद मार्ग युनिव्हर्सल रिलीफ टीम च्या दीदी सहित मोठ्या संख्येने लोक उपस्थित होते.



## थोडक्यात

### निलेश जयसिंगराव भोसले यांना पितृशोक

**मुंबई:** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे भारतीय कामगार सेना चिटणीस व शिव वाहतूक सेना सरचिटणीस निलेश जयसिंगराव भोसले यांचे वडील कै. जयसिंगराव मुलाजीराव भोसले यांचे रविवार १३/१०/२४ रोजी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांचा पार्थिव देह अत्यंदर्शनासाठी रविवार रोजी संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत त्यांच्या राहत्या निवासस्थानी ठेवण्यात येईल, व सोमवार दिनांक १४/१०/२४ रोजी संध्याकाळी ४.०० वा वांद्रे स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येतील. भारतीय कामगार सेना,शिव वाहतूक सेनेच्या वतीने त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली..त्यांच्या आर. एन.ए.अंझुर,१५०२,१५ वा मजला, पी.एफ ऑफिसच्या बाजूला खेर नगर सर्व्हिस रोड बांद्रा पूर्व मुंबई ५१ अंत्ययात्रा निघणार आहे.

### ज्येष्ठ नाट्य लेखक आणि दिग्दर्शक आनंद म्हसवेकर यांचे निधन

**मुंबई:** ज्येष्ठ नाट्य लेखक आणि दिग्दर्शक आनंद म्हसवेकर यांचे अल्पशा आजाराने आज सकाळी निधन झाले. ते ७० वर्षांचे होते. आज सायंकाळी त्यांच्या 'मु. पो. वडाचे म्हसवे ते यु.एस.ए' या आत्मचरित्राचे प्रकाशन करण्यात येणार होते. त्यांच्या पार्थिवावर डोंबिवली येथील स्मशान भूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात त्यांची पत्नी आणि दोन मुले असा परिवार आहे. सातारा जिल्ह्यातील म्हसवे या गावात त्यांचा जन्म झाला. त्यांनी मुंबई विद्यापीठातून बी. कॉम आणि एम.ए ची पदवी प्राप्त केली होती. १९७९ ते २००० सालापर्यंत म्हसवेकर हे स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये कार्यरत होते. त्यानंतर त्यांनी पूर्णवेळ लेखनासाठी झोकून दिले. त्या दरम्यान, त्यांनी 'यू टर्न', 'कथा', 'जोडी जमली तुझी माझी', ' केंव्हा तरी पहाटे' यांसारख्या ३८ नाटकांचे लिखाण केले.

### जे.जे.त होणार मुलांच्या हाडांची शस्त्रक्रिया

**मुंबई:** हाडांच्या आजाराने त्रस्त असलेल्या पीडित मुलांच्या पालकांना आता शस्त्रक्रियेसाठी महागड्या हॉस्पिटलमध्ये जावे लागणार नाही. आता राज्य सरकारतर्फे चालवल्या जाणाऱ्या जे. जे. रुग्णालयात शस्त्रक्रिया करता येणार आहे.रुग्णालयाच्या ऑर्थोपेडिक विभागाला बालरोग ऑर्थो सर्जन मिळाले असून यापुढे कोणत्याही रुग्णाला इतरत्र पाठवण्याची गरज भासणार नाही. त्यामुळे लहान मुलांच्या हाडांच्या आजाराशी संबंधित सर्व गुंतागुंतींवर कोणताही अडथळा न येता उपचार करण्यास जे. जे. रुग्णालय सक्षम झाले आहे.


**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.


# नायगाव कोळीवाडा स्मशानभूमीची दुर्दशा

## अंतिम संस्कारासाठी मोबाईलच्या टॉर्चचा आधार





**प्रतिनिधी**
■ **वसई**

जीवनाच्या अंतिम टप्प्यावर जिथे अंतिम संस्कार केले जातात, त्या ठिकाणी साध्या सुविधा मिळणे अपेक्षित असते, परंतु वसई-विरार शहर मनपाच्या हद्दीतील नायगाव कोळीवाडा स्मशानभूमीत परिस्थिती याच्या पूर्णत: उलट आहे. येथे अंत्यविधी करणाऱ्या नागरिकांना अत्यंत अडचणींचा सामना करावा लागत असून, या स्मशानभूमीची दुरवस्था झालेली आहे. पावसामुळे दहन क्षेत्रावरील पत्रे पडून गेले आहेत, विजेचा पुरवठा खंडीत झाल्यावर काहीच पर्याय नसल्यामुळे नागरिकांना मोबाईलच्या टॉर्चच्या प्रकाशात आणि स्कूटरच्या हेडलाईटवर अंत्यविधी करावा लागत आहे.

नायगाव कोळीवाडा स्मशानभूमीची दुरवस्था गेल्या एक ते दीड महिन्यांपासून कायम आहे. पावसामुळे छतावरची पत्रे पडून गेली असून, त्यामुळे पावसाळ्यात अंतिम संस्कार करणे कठीण झाले आहे. शिवाय, विजपुरवठा खंडीत झाल्यास कोणतेही पर्यायी प्रकाश स्रोत नसल्यामुळे नागरिकांना मोबाईलच्या टॉर्च किंवा स्कूटरच्या हेडलाईटच्या प्रकाशात अंत्यविधी करावा लागतो. यामुळे नागरिकांत तीव्र असंतोष आहे.

शुक्रवार, ११ ऑक्टोबर रोजी रात्री ८:३० वाजता, नायगाव कोळीवाड्यातील एक मृतदेह अंत्यविधीसाठी स्मशानभूमीत आणला गेला तेव्हा विजपुरवठा खंडीत झाला होता. अंधाराच्या वातावरणात, अंतिम संस्कार मोबाईलच्या टॉर्चच्या मदतीने करण्यात आला, हे पाहून नागरिकांचा संताप उफाळून आला. पावसात आणि अंधारात अंतिम संस्कार करणाऱ्या नागरिकांना प्रचंड अडचणींचा सामना करावा लागत आहे.

स्मशानभूमीमध्ये छत नसल्यामुळे, पावसात अंतिम संस्कार करताना नातेवाईकांना खूप अडचणींचा सामना करावा लागतो. रात्रीच्या वेळी विजेचा पुरवठा खंडीत झाल्यास कोणतेही पर्यायी प्रकाश स्रोत नसल्यामुळे अंतिम संस्कार मोबाईलच्या टॉर्चच्या किंवा स्कूटरच्या हेडलाईटच्या मदतीने करावे लागतात. या गंभीर समस्यांकडे महानगरपालिकेने लक्ष देण्याची तातडीची गरज असून, येथील नागरिकांनी त्वरित स्मशानभूमीच्या दुरुस्तीची मागणी केली आहे.

नायगाव कोळीवाडा येथील स्मशानभूमीच्या या दुरवस्थेमुळे ग्रामस्थ प्रचंड संतापले आहेत. महानगरपालिकेने तातडीने हस्तक्षेप करून छताची दुरुस्ती, विजेचा कायमस्वरूपी पुरवठा, इन्व्हर्टर किंवा रिचार्जेबल बल्बची सुविधा पुरवावी अशी नागरिकांची मागणी आहे.

**महानगरपालिकेचे दुर्लक्ष**

*स्मशानभूमीच्या समस्यांबाबत अनेकदा तक्रारी केल्या गेल्या असल्या तरी वसई-विरार महानगरपालिका याकडे सातत्याने दुर्लक्ष करत आहे. नायगाव कोळीवाडा परिसरात मोठ्या लोकसंख्येची वस्ती आहे, आणि या परिसरात या स्मशानभूमीशिवाय इतर कोणतीही स्मशानभूमी उपलब्ध नाही. त्यामुळे स्थानिकांना हाच पर्याय उरतो. अनेक वर्षांपासून स्मशानभूमीची डागडुजी न झाल्यामुळे ग्रील मोडकळीस आले आहे आणि लोखंडी एंगल गंजल्यामुळे ती सुद्धा मोडली आहेत.*

# परतीच्या पावसाने शेतकऱ्यांचे भातपीक धोक्यात

## मोठ्या आर्थिक नुकसानीची शक्यता



**प्रतिनिधी**
■ **वसई**

काही दिवस परतीच्या पावसाने विश्रांती घेतल्याने शेतकऱ्यांनी भात कापणीला सुरुवात केली होती, मात्र बुधवारपासून परतीच्या पावसाने अचानक पुनरागमन केले. या पावसामुळे शेतकऱ्यांचे भातपीक धोक्यात आले असून, वाऱ्याने पीक आडवे पडल्यामुळे त्याचे पाण्यात कुजण्याची भीती निर्माण झाली आहे.

नवरात्रोत्सवाच्या काळात काही दिवसांचा पावसाचा विश्रांतीचा काळ आला होता, ज्यामुळे भाविकांना सण साजरा करता आला, पण या सणाच्या गोडीपलीकडे शेतकऱ्यांना मात्र त्याचाच आर्थिक फटका बसला आहे. दोन दिवसांपासून दर संध्याकाळी अवकाळी पाऊस जोरदार तडाखा देत असून, विजांच्या कडकडाटामुळे नागरिकही संध्याकाळच्या वेळेत घराबाहेर पडणे टाळत आहेत.

या अवकाळी पावसामुळे अनेक ठिकाणी भातपीक आडवे पडून त्याच्या कुजण्याची शक्यता वाढली आहे. कापणी केलेल्या आणि शेतात साठवलेल्या पिकांवरही मोठा परिणाम झाला आहे. यामुळे शेतकऱ्यांना गंभीर आर्थिक नुकसानीचा सामना करावा लागणार आहे. शेतकऱ्यांना आता चिंता सतावत आहे की, परतीच्या पावसामुळे अजूनही पीक वाचेल का, किंवा शासनाकडून नुकसान भरपाईसाठी मदत मिळेल का. येत्या काही दिवसांत पावसाने विश्रांती न घेतल्यास शेतकऱ्यांना मोठ्या आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागण्याची भिती व्यक्त होत आहे.

# वसईत आयुष्मान आरोग्य मंदिर आणि हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखान्यांचे लोकार्पण




■ **वसई**

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात १५ व्या वित्त आयोगाअंतर्गत ५५ आयुष्मान आरोग्य मंदिर आणि राज्य शासनाने निर्धारित केलेल्या १५ हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखान्यांच्या लोकार्पणाचे लक्ष्य देण्यात आले आहे. या उपक्रमाअंतर्गत, दिनांक ११ ऑक्टोबर २०२४ रोजी वसई-विरार महानगरपालिकेच्या विविध भागांमध्ये सात आयुष्मान आरोग्य मंदिर आणि एक हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना यांचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमात स्थानिक लोकप्रतिनिधी, मान्यवर नागरिक तसेच महानगरपालिकेचे अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

पालिकेने आतापर्यंत २६ आयुष्मान आरोग्य मंदिर आणि १५ हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाने कार्यान्वित केले असून, नागरिकांना मोफत वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देत आहेत. महानगरपालिकेला दिलेल्या लक्ष्यापैकी हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखान्यांचे पूर्ण लक्ष्य पूर्ण करण्यात आले आहे,

# वसईतील साई भक्तांची शिर्डीकडे भक्तिमय पदयात्रा; निष्ठेचा 250 किमी प्रवास




**प्रतिनिधी**
■ **वसई**

वसईतील साई भक्तांचे शिर्डीच्या साईबाबांशी नातं अतूट आहे. दरवर्षी दसरा सण उत्साहाने साजरा झाल्यानंतर वसईतील हजारो भाविक शिर्डीच्या दिशेने पायी दिंडी काढतात, ज्यामध्ये ते भक्तिभावाने श्री साईबाबांच्या दर्शनासाठी प्रवास करतात. या वर्षी देखील भाविकांनी नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात हा भक्तिमय प्रवास सुरू करण्याची तयारी केली आहे.

वसई पूर्व, पश्चिम तसेच ग्रामीण भागातील हजारो भक्त नोव्हेंबर ते एप्रिल या कालावधीत वसई ते शिर्डी असा सुमारे २५० किमीचा पायी प्रवास करतात. शिर्डीच्या श्री साईबाबांचे दर्शन घेण्यासाठी हे भाविक प्रचंड उत्साही असतात. वसईतील साई भक्तांमध्ये हा प्रवास भक्तीचा एक महत्त्वाचा भाग मानला जातो. विशेषत: दसरा सणानंतर हा भक्तिप्रवास सुरू होतो आणि त्याचा समारोप शिर्डीत साईबाबांच्या दर्शनाने होतो.

मालजीपाडा येथील भाविक गेल्या १० वर्षांपासून सलगपणे पायी दिंडी आयोजित करत आहेत. या वर्षी ६ नोव्हेंबर ते १२ नोव्हेंबर या कालावधीत ७ दिवसांची पदयात्रा मालजीपाडा येथून शिर्डीकडे कूच करणार आहे. याशिवाय, वसई तालुक्यातील इतर गावे देखील या यात्रेत सहभागी होतात. शहरी भागातील भाविक एप्रिल महिन्यात श्रीरामनवमीच्या निमित्ताने वसईहून शिर्डीकडे प्रयाण करतात.

साई भक्तांची पायी यात्रा वसईच्या धार्मिक परंपरेचा एक अभिन्न भाग बनली आहे. शिर्डीत साईबाबांचे दर्शन घेऊन भाविक आपले जीवन धन्य मानतात. या वर्षी देखील दसरा सण संपल्यानंतर वसईतून अशा पायी दिंड्या भक्तिभावाने शिर्डीकडे मार्गक्रमण करणार आहेत.



*मुंबई : चुनाभट्टी येथील श्री सत्यनारायण सोसायटी परिसरात नवरात्रौत्सव आयोजित करण्यात आला होता. नवरात्र उत्सव निमित्ताने श्री सत्यनारायण सोसायटी च्या वतीने भंडारा आयोजित करण्यात आला होता, याप्रसंगी विभागातील युवा नेतृत्व नदीम कप्तान मलिक यांनी सदिच्छा भेट देऊन सोसायटी सदस्यांचे कार्यक्रम चांगल्या प्रकारे केल्याबद्दल कौतुक केले, दरम्यान श्री सत्यनारायण सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांनी नदीम कप्तान मलिक यांचा सत्कार केला आणि पुढील वाटचालीच्या शुभेच्छा दिल्या*

# फेलोशिप थांबवल्याच्या विरोधात याचिका बार्टीसह सरकारला हायकोर्टाची नोटीस




**मुंबई :** अनुसूचित जातींमधील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्याचे मातेरे करत आल्यामुळे सतत आंदोलनांचे लक्ष्य बनलेली बार्टी ( डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण संस्था पुणे) आणि तिच्या अडेलतट्टू धोरणामुळे महाराष्ट्र सरकारलाही मुंबई उच्च न्यायालयाकडून सणसणीत चपराक खावी लागली आहे. बार्टीने नाहक फेलोशीप बंद केल्यामुळे संशोधकांवर पीएचडी प्रवेश रद्द होण्याची आफत ओढवल्याच्या प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने सुनावणीच्या पुढील तारखेपर्यंत प्रवेश रद्द करण्याची कार्यवाही करू नये, असे अंतरिम आदेश नुकतेच दिले आहेत. तसेच बार्टीसह डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, महाराष्ट्र शासन आणि प्रतिवादींना नोटीस बजावण्याचे निर्देशही न्यायालयाने दिले आहेत.

# उद्धव ठाकरे यांच्या शुभहस्ते 'शिवसेनेचा रॉबिनहूड नितीन नांदगावकर' पुस्तकाचे शिवसेनाभवन येथे प्रकाशन



**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या हस्ते मंगळवारी शिवसेना उपनेते आणि शिवसेनाभवन येथील लोकप्रिय जनता दरबारमुळे सर्वश्रुत झालेले नितीन नांदगावकर यांच्या राजकीय कारकिर्दीवरील ,"शिवसेनेचा रॉबिनहूड नितीन नांदगावकर" ह्या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले . "या पुस्तकातील नितीनची कथा मी वाचली आहे आणि ती प्रेरणादायी आहे . शिवसैनिकांकडून अशीच जनसेवा अपेक्षित असते ." असे या प्रसंगी उद्धव ठाकरे म्हणाले .

या पुस्तक प्रकाशन कार्यक्रमांस शिवसेना नेते सुनील प्रभू , शिवसेना आमदार सर्वश्री अजय चौधरी, रमेश कोरगावकर , शिवसेना उपनेते भाऊ कोरगावकर , शिवसेना उपनेत्या किशोरी पेडणेकर सुषमाताई अंधारे , अस्मिताताई गायकवाड , शिवसेनेचे उपनेते आणि ज्यांच्यावर पुस्तक प्रकाशित झाले ते नितीन नांदगावकर आणि शिवसेना जनसंपर्कप्रमुख आणि प्रवक्ता अँड. हर्षल प्रधान आदी उपस्थित होते.

पुस्तकाचे लेखन ज्येष्ठ पत्रकार विजय सामंत यांनी केले आहे. तर प्रकाशक अरविंद शाह आणि जयंत प्रिंटरी हे आहेत. पुस्तकासाठी छायाचित्र वरिष्ठ छायाचित्रकार सचिन वैद्य आणि शैलेश आचरेकर यांनी काढली असून पुस्तकाचे संपादन अँड. हर्षल प्रधान यांनी केले आहे .



*मुंबई : बुधांजली रिसर्च फाउंडेशनतर्फे जुहू येथील इस्कॉन सभागृहात आयोजित कार्यक्रमात महाराष्ट्राचे राज्यपाल सीपी राधाकृष्णन यांच्या हस्ते ज्येष्ठ पत्रकार शिवपूजन पांडे यांना भारतरत्न डॉ. आंबेडकर पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी केंद्रीय मंत्री रामदास आठवलेही उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजक कैलास मासूम यांनी सर्वांचे आभार मानले.*


**पब्लिक नोटीस**

कै. चंद्र प्रकाश शर्मा यांचे २२/०३२०२० रोजी निधन झाले त्यांच्या हयातीत ते व त्यांचा मुलगा श्री. अनुभव शर्मा हे फ्लॅट क्र. १७१३, १७ वा मजला, एल बिल्डिंग, गार्डन व्यु अपार्टमेंट कॉ ऑप हौ सो लि, आरे मिल्क कॉलोनी, युनिट नं. २६ जवळ, गोरेगाव पूर्व, मुंबई ४०००६५ चे मालक होते आणि सोसायटीच्या २० शेअर्सचे हक्क (प्रमाणपत्र क्र. २५९, २६४१ ते २६६० पर्यंतचे शेअर्स, जारी व्यु अपार्टमेंट कॉ ऑप हौ सो लि द्वारा चे सभासद होते.

रिलीझ डीड द्वारे दि. १३/०९/२०२४, उपनिबंधक बोरीवली१ यांच्या कार्यालयात नोंदणीकृत, नोंदणी क्र. १३४५४/२०२४, दि. १३/०९/२०२४, श्रीमती मंजुळा शर्मा व छाया शर्मा (पत्नी व मुलगी दोघी कै. चंद्र प्रकाश शर्मा यांचे वर्ग १ कायदेशीर वारस यांनी फ्लॅटमधील त्यांचे हक्क त्यांच्या मुलगा / भाऊ, श्री. अनुभव शर्मा यांना समभागांच्या हक्कांसह सोडले, आणि अशा प्रकारे श्री. अनुभव शर्मा यांनी १००% अविभाजित हक्क, शीर्षक तसेच सोसायटीच्या शेअर्सचे संपादन केले आहे.

मी, अँड. रजत के. सिंह याद्वारे मृत सदस्य कै. चंद्र प्रकाश शर्मा यांचे उक्त अधिकार, पद आणि हित हस्तांतरित करण्याबाबत वारस किंवा इतर दावेदार/आक्षेपकर्त्यांकडून दावे किंवा हरकती आमंत्रित करतो, श्री. अनुभव शर्मा यांचे सदर सदनिका शेअर्ससह नावे करण्यास, ही नोटीस प्रकाशित झाल्यापासून ७ त्यांच्या दाव्या/आक्षेपांच्या समर्थनार्थ अशा कागदपत्रांच्या प्रती आणि इतर पुरावे. मृत सदस्याचे हित खाली नमूद केलेल्या पत्त्यावर वर विहित केलेल्या कालावधीत कोणतेही दावे/आक्षेप प्राप्त न झाल्यास, तर मी माझ्या क्लायंटने विनंती केल्यानुसार नो क्लेम सर्टिफिकेट जारी करा आणि त्यानंतर कोणतेही दावे विचारात घेतले जाणार नाहीत.

ठिकाण : मुंबई
तारीख: १४/१०/२०२४.

सही/-
अँड. रजत के. सिंग
कार्यालय क्र. १३८, पहिला मजला,
ओस्तवाल ऑर्नेट, इमारत क्र. २/अ, जैन मंदिराजवळ,
जेसल पार्क, भाईंदर पूर्व, जि. ठाणे ४०११०५
(मो. नं. ८१६९८७५१९५)



**वसई-विरार शहर महानगपालिका**
**मुख्य कार्यालय, विरार**
विरार (पूर्व), ता. वसई, जि. पालघर - ४०१३०५.
दुरध्वनी : ०२५० - २५२५१०१/०२/०३/०४/०५/०६ फॅक्स: ०२५० - २५२५१०७ ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com

जा.क्र./प्र.स.जी./१९७७/२०२४-२५ — दि. ११/१०/२०२४

**प्रथम फेर ई-निविदा सुचना**

वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'जी' वालिय अंतर्गत येणाऱ्या जुचंद्र येथील गांधी तलाव,कामण येथील पिराचा तलाव, राजावली येथील गावदेवी तलाव व वालीव तलाव ठेका पध्दतीने मत्स्य बीज शेती करण्यासाठी लिलावाद्वावारे दि. १७/०९/२०२४ ते दि.३१/०५/२०२७ या कालावधी करिता ठेका पध्दतीने देणेबाबत ई-निविदा महानगरपालिकेच्या अटी व शर्तीस अधिन राहून मागविण्यात येत आहेत. सदर कामाचे ई- निविदा फॉर्म महानगरपालिकेच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि. १४/१०/२०२४ ते दि. २१/१०/२०२४ दु. ३.०० वाजेपर्यंत उपलब्ध आहेत. सदरच्या निविदा दि. २१/१०/२०२४ दु. ३.०० वाजेपर्यंत ऑनलाईन स्विकारण्यात येतील. सदर कामांची इसारा रक्कम वसई विरार शहर महानगरपालिकेच्या नावे देय ऑनलाईन भरणा करावयाचे आहेत. प्राप्त ई-निविदा हजर निविदाधारक व त्यांचे अधिकृत प्रतिनिधी यांचे समक्ष मा. उपायुक्त वसई विरार शहर महानगरपालिका यांचे संमतीने दि. २२/१०/२०२४ रोजी सायंकाळी ४.०० वा. उघडण्यात येतील. याकामी आलेल्या निविदांपैकी कोणतीही एक निविदा स्विकारण्यास अथवा आलेल्या सर्व ई- निविदा नाकारण्याचा अधिकार महानगरपालिकेने राखुन ठेवला आहे. कामाचे नाव

| अ. क्र. | कामाचे नाव | कोरी ई- निविदा किंमत | इसारा रक्कम | अपेक्षित रक्कम | मुदत कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'जी' वालिव अंतर्गत जुचंद्र येथील गांधी तलाव ठेका पध्दतीने मत्स्य बीज शेती करण्यासाठी ई-निविदाद्वारे देणेबाबत. | किंमत GST सहित रु. १७७०/- | १०,०००/- | ४,९४,७६६/- | दि. १७/०९/२०२४ ते दि. ३१/०५/२०२७ |
| २. | वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'जी' वालिव अंतर्गत कामण येथील पिराचा तलाव ठेका पध्दतीने मत्स्य बीज शेती करण्यासाठी ई-निविदाद्वारे देणेबाबत. | किंमत GST सहित रु. १७७०/- | १०,०००/- | ५,९२,६१८/- | दि. १७/०९/२०२४ ते दि. ३१/०५/२०२७ |
| ३. | वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'जी' वालिव अंतर्गत राजावली येथील गावदेवी तलाव ठेका पध्दतीने मत्स्य बीज शेती करण्यासाठी ई-निविदाद्वारे देणेबाबत. | किंमत GST सहित रु. १७७०/- | १०,०००/- | ५,२७,७५०/- | दि. १७/०९/२०२४ ते दि. ३१/०५/२०२७ |
| ४. | वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'जी' वालिव अंतर्गत वालीव तलाव ठेका पध्दतीने मत्स्य बीज शेती करण्यासाठी ई- निविदाद्वारे देणेबाबत. | किंमत GST सहित रु. १७७०/- | १०,०००/- | ९,७०,६१२/- | दि. १७/०९/२०२४ ते दि. ३१/०५/२०२७ |

'टिप-ई- निविदे संबंधी सविस्तर माहिती http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पहावयास मिळेल.

सही/-
(समिर भूमकर )
उप-आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

जा.क्र. व.वि.श.म./मा.व.अ./३०९ /२०२४
दिनांक : ११/१०/२०२४



Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

**As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts**

**Year - Twenty Nine**
**Issu - 114**
**R.N.I. Registration No. - 65609/96**

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे,** E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊलकर**

**पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.**

**वर्ष- एकोणतीसावे**
**अंक - ११४**
**आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६**

## उमेद अभियानच्या प्रेरिकांनाभाऊबीज भेट मिळावी; महाराष्ट्र श्रमिक सभेची मागणी

**मुंबई :** ग्रामविकास मंत्रालया अंतर्गत सुरू असलेल्या उमेद अभियानमधील प्रेरिकांना (सीआरपी) अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या धर्तीवर दिवाळीला भाऊबीज भेट मिळावी, अशी मागणी महाराष्ट्र श्रमिक सभेच्या वतीने करण्यात आली आहे. राज्यात बचत गटांची चळवळ सर्वदूर पसरली आहे. या गटातील महिलांना उद्योग व्यवसायासाठी मार्गदर्शन करण्यासाठी राज्य सरकारने उमेद अभियानांतर्गत प्रेरिकांची नियुक्ती केली आहे. राज्यभरातील या महिलांची संख्या ५० हजारांच्या सुमारास आहे. या महिलांना महिन्याला अवघे सहा हजार रुपये एवढे तुटपुंजे मानधन देण्यात येते. त्यातही मागच्या आठ महिन्यांचे प्रत्येक महिन्याचे तीन हजार असे २४ हजार रुपये मानधन थकित आहे. त्यामुळे हे थकित मानधन मिळावे, तसेच अंगणवाडी सेविका व मदतनिसांप्रमाणे प्रेरिकांनाही दिवाळीसाठी भाऊबीज भेट मिळावी, अशी मागणी या महिलांचे प्रतिनिधित्व करणार या महाराष्ट्र श्रमिक सभेचे अध्यक्ष प्रभाकर नारकर, सरचिटणीस केतन कदम व सल्लागार संजय परब यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांच्याकडे केली आहे.



## थोडक्यात

### रुग्णालयांत यांत्रिकी सफाईसाठी 3190 कोटींच्या खर्चाला मंजूरी

**मुंबई:** सार्वजनिक आरोग्य विभागाच्या रुग्णालयांमध्ये यांत्रिकी सफाई करण्याचा निर्णय वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. प्रतिवर्षी ६३८ कोटी रुपये याप्रमाणे पाच वर्षांसाठी ३१९० कोटी रुपयांमध्ये ही यांत्रिकी सफाई केली जाणार असून आतापर्यंत मनुष्यबळावर आधारित सफाईसाठी वार्षिक ७७ कोटी रुपये लागत होते. तर वैद्यकीय शिक्षण विभागाने वैद्यकीय महाविद्यालये व सलग्न रुग्णालयांसाठी अलीकडेच काढलेल्या निविदेनुसार सफाईसाठी १९३ कोटींचा खर्च येणार आहे.आरोग्य विभागाची राज्यातील बहुतेक रुग्णालये ही जुन्या वास्तुमध्ये आहेत. यातील अनेक रुग्णालयात फरशा उखडलेल्या वा समतल नाहीत. वाढती रुग्णसंख्या लक्षात घेता पुरेशी स्वच्छतागृहे नाहीत व जी आहेत त्यांची अवस्था वाईट असते. परिणामी जुन्या वास्तुंमध्ये यांत्रिकी सफाई होण्यात अनेक अडचणी येऊ शकतात असे आरोग्य विभागाच्याच डॉक्टरांचे म्हणणे आहे. सफाईसाठी पुरसे मनुष्यबळ दिल्यास जी रुग्णालयीन सफाई १०० ते १५० कोटी रुपयांमध्ये उत्तमप्रकारे होऊ शकते त्यासाठी यांत्रिकी सफाईसाठी ६३८ कोटी रुपये कोणाच्या भल्यासाठी खर्च केले जात आहेत, असा सवालही आरोग्य विभागाच्या डॉक्टरांकडून उपस्थित केला जात आहे.

### देशभरात RTI च्या 4 लाखांहून अधिक तक्रारी प्रलंबित

**मुंबई :** माहितीचा अधिकार (RTI) कायदा 2005 ला आज 19 वर्षे पूर्ण झाली आहेत. एका अहवालात देशभरातील 29 माहिती आयोगांमधील 4 लाखांहून अधिक केसेस प्रलंबित आहेत. आरटीआय कार्यकर्त्या अंजली भारद्वाज यांच्या नेतृत्वाखाली नागरी समाज समूह सतर्क नागरीक संघटनेने तयार केलेल्या अहवालात असे दिसून आले आहे. की 30 जून 2024 पर्यंत देशभरातील विविध माहिती आयोगांमध्ये एकूण 4,05,509 प्रकरणे प्रलंबित आहेत. महाराष्ट्रात सर्वाधिक 1,08,641 प्रलंबित तक्रारी आहेत. त्यामागोमाग कर्नाटकात 50,000, तामिळनाडू 41,241 आणि छत्तीसगडमध्ये 25,317 आहेत.अहवालानुसार, 31 मार्च 2019 पर्यंत 26 माहिती आयोगांमध्ये प्रलंबित प्रकरणांची संख्या 2,18,347 होती. जून 2022 मध्ये ही संख्या 3 लाखांच्या पुढे गेली आणि आता ती 4,05,509 वर पोहोचली आहे. 1 जुलै 2023 आणि 30 जून 2024 दरम्यान, 27 आयोगांनी 2,31,417 अपील आणि तक्रारी नोंदवल्या आणि 28 आयोगांनी याच कालावधीत 2,25,929 प्रकरणांचे निराकरण केले.

### स्वीय सहाय्यक प्रशिक्षण प्रमाणपत्र अभ्यासक्रम

**मुंबई :** रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्या प्रशिक्षण संकुलात दि. ७ ते १० ऑक्टोबर या कालावधित स्वीय सहाय्यक प्रशिक्षण प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे उद्घाटन निवडणूक तज्ज्ञ धनंजय खाडिलकर आणि प्रबोधिनीचे कार्यकारी संचालक डॉ. जयंत कुलकर्णी यांच्या हस्ते झाले. महाराष्ट्र राज्यातील २३ जिल्ह्यांतील एकूण ५३ प्रशिक्षणार्थी सहभागी झाले होते.

# मराठी भाषा भवन उत्तम आणि दर्जेदार व्हावे - मुख्यमंत्री शिंदे

प्रतिनिधी
■ मुंबई

माय मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने आता मराठी भाषेचा डंका अधिक जोमाने सर्वत्र गाजणार आहे. मराठी भाषेच्या संवर्धन आणि विकासासाठी मुंबईत होत असलेले मराठी भाषा भवन उत्तम आणि दर्जेदार व्हावे, असे सांगून भाषा भवनाच्या माध्यमातून मराठी भाषा अधिक समृद्ध आणि प्रगल्भ करण्यासाठी अधिक जोमाने काम करूया, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

काल जवाहर बाल भवन परिसर, चर्नी रोड (प.) येथे उभारण्यात येणाऱ्या 'मराठी भाषा भवन'चे भूमिपूजन आणि बृहन्मुंबई महानगरपालिका विकास निधी तथा मुंबई शहर जिल्हा अंतर्गत जिल्हा वार्षिक योजना यातून होणाऱ्या विविध विकास कामांचे भूमिपूजन / लोकार्पण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे करण्यात आले.



समारंभास विधानसभा अध्यक्ष ॲड. राहूल नार्वेकर, शालेय शिक्षण आणि मराठी भाषा मंत्री तथा मुंबई शहर जिल्ह्याचे पालकमंत्री दीपक केसरकर, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री तथा मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री मंगलप्रभात लोढा, विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, आमदार तथा सिद्धीविनायक ट्रस्टचे अध्यक्ष सदा सरवणकर, स्थानिक लोकप्रतिनिधी, बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी, मराठी भाषा विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव मनीषा म्हैसकर, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, शालेय शिक्षण विभागाच्या प्रधान सचिव आय.ए. कुंदन, महापालिका अतिरिक्त आयुक्त अश्विनी जोशी, मुंबई शहर जिल्हाधिकारी संजय यादव, ज्येष्ठ साहित्यिक मधू मंगेश कर्णिक, मराठी भाषा सल्लागार समितीचे अध्यक्ष डॉ. लक्ष्मीकांत देशमुख आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, मराठी भाषा भवनासाठी चांगली जागा उपलब्ध झाली असून भवनाचे भूमिपूजन आज सागराच्या साक्षीने होत आहे याचा आपणास आनंद होत आहे. भाषा भवनाचे काम अतिशय दर्जेदार व्हावे असे सांगून या भाषा भवनाच्या माध्यमातून मराठी भाषेच्या संवर्धन, संशोधन आणि प्रसारासाठी अधिक बळ मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच भाषा भवनसाठी साहित्यिक व अन्य क्षेत्रातून आलेल्या सूचनांचा आदर केला जाईल, असे ते म्हणाले.

दोन हजार वर्षांपेक्षा अधिक जुनी माझी माय मराठी भाषा असल्याचे सिद्ध झाले असून मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी अनेकांचे योगदान मिळाले आहे. सर्वांनी केलेल्या सकारात्मक प्रयत्नामुळेच मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाला आहे.

संतांनी अभंग, गवळण, भारुड यातून मराठी भाषेचे सौंदर्य समोर आणले. मराठी भाषेच्या वैभवात भर घातली. ज्ञानपीठकारांनी आणि सर्व साहित्यिकांनी मराठी भाषा समृद्ध केली आहे असे सांगून मराठी भाषेच्या विकासासाठी जे-जे करता येईल ते केले जाईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी बोलताना दिली.

मराठी भाषा मंत्री दीपक केसरकर यांनी यावेळी बोलताना मराठी भाषकांना आणि साहित्यिकांना अभिमानास्पद वाटेल असे भाषा भवन उभारले जाईल, अशी ग्वाही दिली. मराठी भाषा संवर्धन आणि विकासासाठी शासनामार्फत विविध उपक्रम राबविले जात आहेत. मुंबईत येणाऱ्या साहित्यिकांसाठी व राहण्याची सोय व्हावी यासाठी कवी मंगेश पाडगावकर यांच्या नावाने साहित्य भवन बांधणार असल्याचे केसरकर यांनी यावेळी सांगितले. तसेच सातारा येथे विश्वकोश मंडळासाठी नवीन इमारत, प्रत्येक जिल्ह्यात पुस्तकाचे गाव होणार असल्याचेही त्यांनी सांगितले. ज्येष्ठ साहित्यिक मधु मंगेश कर्णिक यांनीही यावेळी मनोगत व्यक्त केले.

# ओला-उबेर उद्योगात औद्योगिक कामगारांच्या बेरोजगार मुलांना स्वयंरोजगाराची संधी मिळावी!

### सचिन अहिर यांची मागणी



प्रतिनिधी
■ मुंबई

कामगार महर्षी गं.द.आंबेकर यांचा वारसा पुढे नेतांना,गिरणी उद्योगाव्यतिरिक्त महाराष्ट्रातील अनेक उद्योगातील कामगारांना संघटित करण्याचा विडा आम्ही उचलला असून,त्या अंतर्गत ॲप आधारित ओला-उबेरच्या वाहतूक व्यवसायात गिरणी उद्योग तसेच अन्य उद्योगातील कामगारांच्या बेरोजगार मुलांना स्वयंरोजगाराची संधी मिळाली पाहिजे,असे प्रतिपादन राष्ट्रीय मिल मजदूर संघ आणि महाराष्ट्र राज्य राष्ट्रीय कामगार संघाचे अध्यक्ष आमदार सचिन अहिर यांनी येथे नवीन हेल्पलाईन ॲपचे उद्घाटन करताना येथे केले.

राष्ट्रीय मिल मजदूर संघ आणि महाराष्ट्र राज्य राष्ट्रीय कामगार संघाचे दसरा संमेलन आणि वर्धापनदिन सोहळा परेल येथील मनोहर फाळके सभागृहात संपन्न झाला.याप्रसंगी अध्यक्ष स्थानावरून आमदार सचिनभाऊ अहिर बोलत होते. प्रारंभी संघटनेचे सरचिटणीस गोविंदराव मोहिते यांनी विविध कामगार समस्येवर बोलतांना आपल्या स्वागताच्या भाषणात, आंबेकरजींचा विधायक वारसा पुढे नेण्याचे आवाहन केले.

महाराष्ट्र राज्य राष्ट्रीय कामगार संघाच्या वाहतूक विभागाचे प्रमुख उपाध्यक्ष सुनिल बोरकर आणि संघटक शेख रिझवान यांच्या सहयोगाने,ओला-उबेरची ग्राहक सेवा केवळ मर्यादित तासांमध्ये कार्यरत असली तरी, संकटात सांपडलेल्या वाहकांना मदत मिळावी,म्हणून ही महाराष्ट्रा राज्य राष्ट्रीय कामगार संघ संचलित हेल्पलाइन सेवा आज पासून सुरू करण्यात आली आहे.

मुंबईसह एम.एम. आर. डी.ए.अंतर्गत ॲप आधारित ओला-उबेर वाहतूक सेवेचा आज ग्राहकांना निकडीच्या कामासाठी टॅक्सी-रिक्षा पाठोपाठ उपयोग होऊ लागला आहे. या आयोजिकांच्या मुद्याकडे वळून आमदार सचिनभाऊ अहिर म्हणाले, या नवीन हेल्पलाइन द्वारे संकटात सापडलेल्या चालकांबरोबर ग्राहकांचे संरक्षण झाले पाहिजे.या व्यवसायात ओला-उबेर मधील चालक-मालकांचे हित जोपासताना टॅक्सी आणि रिक्षा चालकांच्या हिताकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. त्यांची रोजी रोटी कायम राहिली पाहिजे,असेही सचिन अहिर यांनी सांगितले.आंबेकर श्रम संशोधन संस्थेचे संचालक जी.बी. गावडे यांनी आभार मानले.कार्यक्रमाला कोलोंबिया यूनिव्हर्सिटिच्या ओला-उबेर वाहतुकीच्या अभ्यासक मारीन थोरने खास पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. खजिनदार निवृत्ती देसाई उपाध्यक्ष बजरंग चव्हाण, शिवाजी काळे,मिलिंद तांबेडे,किशोर रहाटे,साई निकम आदी पदाधिकारी त्या वेळी उपस्थित होते. दसऱ्याला आपट्याची पाने एकमेकांना देऊन एकमेकांचा आदर भाव जपण्यात आला.

# सेवानिवृत्त मुख्याध्यापकास सुधारित सर्व लाभ द्यावे, अन्यथा आंदोलन - जंगले

प्रतिनिधी
■ मुंबई

उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सेवानिवृत्त मुख्याध्यापक चंद्रधर मिश्रा यांना त्यांचे सुधारीत पेंशन, ग्रॅच्युइटी, रजा वेतन व इतर आवश्यक आर्थिक लाभ शिक्षण खात्याने अद्याप मिळवून दिलेले नाही, ही अत्यंत गंभीर बाब असून संबंधित सर्व व शिक्षण खाते उच्च न्यायालयाच्या आदेशाचा जाणीवपूर्वक भंग करीत असल्याचे स्पष्ट दिसत आहे, शिक्षण खात्यानें तात्काळ चंद्रधर मिश्रा यांचे सुधारीत पेंशन ग्रॅच्युइटी व इतर सर्व आर्थिक लाभ मिळवून देण्यासाठी आठ दिवसात योग्य ती कार्यवाही करून मिश्रा यांना त्यांचें हक्कांचे पैसे मिळवून द्यावे, त्यांना जर तात्काळ पेंशन,ग्रॅच्युइटी व इतर लाभ मिळवून दिले नाही तर नाइलाजाने शिक्षण निरीक्षक, चेंबूर कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येईल असा इशारा टी डी एफ अध्यक्ष जनार्दन जंगले यांनी शिक्षण निरीक्षक मुश्ताक शेख आणि शिक्षण उपसंचालक संदीप संगवे यांना पत्राद्वारे दिला आहे.

# विधानसभा निवडणुकीतील पराभवाच्या भितीमुळे भाजपा शिंदे सरकारला मुस्लीमांची आठवण - नसीम खान

■ मुंबई

मुस्लीम समाजाला उघड उघड मारण्याची धमकी भाजपा-शिंदे सरकारचे नेते सातत्याने देत असतात त्यांच्यावर कारवाई केली जात नाही उलट त्यांचे समर्थनच केले जाते. मदरसे बंद करण्याची धमकी दिली जाते असे असताना विधानसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवूनच मदरश्यातील शिक्षकांचे मानधन वाढवण्यामागे मुस्लीम मतांवर डोळा असल्याचे स्पष्ट दिसत आहे, असे मत CWC सदस्य व प्रदेश काँग्रेसचे कार्याध्यक्ष नसीम खान यांनी व्यक्त केले आहे.

ते पुढे म्हणाले की, मदरश्यांमधील डी. एड. व बी. एड. शिक्षकांना देण्यात येणाऱ्या मानधनात वाढ करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला आहे. मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचे भागभांडवलही वाढविण्याचा निर्णय घेतला आहे. भाजपा-शिंदे सरकारचा हा निर्णय मुस्लीम समाजाचा विकास व्हावा या हेतूने घेतलेला नाही तर लोकसभा निवडणुकीत झालेल्या पराभवामुळे आगामी विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर घेतलेला निर्णय आहे. तरीही या निर्णयाचे आम्ही स्वागतच करीत आहे. भाजपा-शिंदे सरकारचे 'सब का साथ, सब का विश्वास' हे फक्त बोलण्यापुरते आहे, कृतीतून ते कधीच दिसत नाही.


भाजपा-शिंदे सरकार मधील आमदार व नेते सातत्याने मुस्लीम समाजाविरोधात भडाकाऊ भाषण करतात, त्यांच्याविरोधात पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल होऊनही सरकार काहीच कारवाई करत नाही. भाजपा-शिंदे सरकारने कितीही लोकप्रिय घोषणा दिल्या तरी मुस्लीम समाज त्यांच्या भुलथापांना बळी पडणार नाही. असेही नसीम खान म्हणाले.

# विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बुधवारी राज्यातील प्रागतिक पक्षांतर्फे नाशिक येथे राज्यव्यापी परिषद

### महविकास आघाडीने प्रागतिक पक्षांसोबत जागा वाटपाबाबत सन्मानपूर्वक तडजोड करावी

■ मुंबई

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर येत्या बुधवारी, १६ ऑक्टोबर रोजी नाशिक येथे राज्यातील प्रागतिक पक्षांतर्फे राज्यव्यापी परिषद आयोजित करण्याचा महत्त्वाचा निर्णय काल झालेल्या बैठकीत घेण्यात आला आहे. महाराष्ट्रभरातून हजारों लोक या परिषदेत सहभागी होणार आहेत. नाशिकच्या ह्या परिषदेत येत्या विधानसभा निवडणुकीसाठी महाविकास आघाडीने पर्यायी जनताभिमुख धोरणे जाहीर करावीत आणि प्रागतिक पक्षांसोबत जागा वाटपाबाबत सन्मानपूर्वक तडजोड करावी अशी आग्रही मागणी करण्यात



येणार आहे. महाविकास आघाडीच्या नेतृत्वासोबत चर्चा करण्यासाठी माजी आमदार जयंत पाटील, आमदार अबू असीम आझमी, डॉ. अशोक ढवळे व डॉ. भालचंद्र कानगो या चार सदस्यांच्या समितीची नेमणूक करण्यात आली. असल्याचे सांगण्यात आले.


काल झालेल्या या बैठकीत शेतकरी कामगार पक्षातर्फे माजी आमदार जयंत पाटील, प्रा. एस. व्ही. जाधव व राजेंद्र कोरडे, समाजवादी पक्षातर्फे मेराज सिद्दीकी व राहुल गायकवाड, भारतीय कम्युनिस्ट पक्षातर्फे डॉ. भालचंद्र कानगो, सुभाष लांडे, प्रकाश रेड्डी, राजू देसले, प्रा. राम बाहेती, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षातर्फे डॉ. अशोक ढवळे, किसन गुजर, डॉ. एस. के. रेगे, शैलेंद्र कांबळे, आणि सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षातर्फे किशोर ढमाले हजर होते.

# माझ्या नावाचे गार्डन हा मला मिळालेला मोठा पुरस्कार!

### महाराष्ट्र भूषण आशाताई भोसले यांच्या हस्ते लोकार्पण

प्रतिनिधी
■ मुंबई

महाराष्ट्र भूषण आशाताई भोसले यांच्या नावाने वांद्रे पश्चिम येथे सुंदर उद्यान तयार करण्यात आले असून आशाताईंच्या हस्ते या बगिचाचे लोकार्पण शुक्रवारी करण्यात आले. माझ्या साठी मिळालेला सर्वात मोठा पुरस्कार आहे, अशा शब्दांत आशाताई यावेळी भावना व्यक्त केल्या.



सुंदर रंगबिरंगी झाडे, दिव्यांची रोशणाई, एक छोटे स्टेज, साऊंडची सुविधा, बैठक व्यवस्था सोबत आशाताईंचे गाण्याचे स्वर तसेच गौतम राजाध्यक्षांनी काढलेली आशाताईंची प्रसन्न भावमुद्रेतील छायाचित्रे अशा प्रकारे या उद्यानाची रचना करण्यात आली आहे. एमएसआरडीसी कार्यालया समोरील जागेत हे उद्यान मुंबई भाजपा अध्यक्ष आमदार ॲड आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून साकारण्यात आले आहे. हे उद्यान सर्वांसाठी मोफत खुले असणार आहे. शिवाय येथे आशाताईंची गाणी ही रोज ऐकता येणार आहेत. अशा प्रकारचे हे उद्यान पहिलेच ठरावे असे सांगतानाच आमदार ॲड आशिष शेलार यांनी ही संकल्पना कशी सुचली हे विषद केले.

या लोकार्पण सोहळयात आशाताई भारावून गेल्या. म्हणाल्या की मला खूप पुरस्कार मिळाले, तसेच सगळ्यांचे खूप प्रेम लाभले पण माझ्या नावाचे उद्यान तयार करुन आशिष शेलार यांनी मला सुखद धक्काच दिला. मला मिळालेल्या सर्वच पुरस्कारा पेक्षा हा मोठा पुरस्कार आहे. ही बाग मला खूप आवडली, मी आता माझ्या मित्र परिवाराला सांगेन की नक्की एकदा या सुंदर बागेला भेट द्या. मी देवाचे खूप खूप आभार नेहमीच मानते परमेश्वाने मला भरभरून दिले त्या पैकी मला मिळालेले हे परमेश्वराचे सुंदरच देणेच आहे, अशा भावना व्यक्त करीत आशाताई यांनी आशिष शेलार यांचे आभार मानले. कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

# शिक्षकांसाठी दर्जेदार शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती स्पर्धा मंत्र्यांच्या उपस्थितीत पारितोषिक वितरण



■ मुंबई

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे महाराष्ट्र द्वारे नाडकर्णी पार्क मुंबई पब्लिक हिंदी शाळा क्रमांक 02 वडाळा पूर्व मुंबई चे प्रशिक्षक शैलेंद्र दिलीप खोब्रागडे यांना सहावी ते आठवी या गटात विज्ञान विषयासाठी निर्मित केलेल्या शैक्षणिक व्हिडिओ ला राज्यस्तरीय प्रथम पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.मागील वर्षापासून राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे महाराष्ट्र द्वारे मुलांच्या शिक्षणाचा दर्जा वाढवण्याकरिता काही उपक्रम राबविले जातात. यामध्ये शिक्षकांद्वारे निर्मित शैक्षणिक व्हिडिओ व इतर डिजिटल माध्यमांद्वारे शिक्षण देण्याचे काम करीत आहे. याकरिता शिक्षकांनी निर्मित केलेले उत्कृष्ट व्हिडिओ निवडून 84 शिक्षकांना राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.सन्मानचिन्ह, मेडल, पारितोषिक रकम व प्रशस्तीपत्र असे पुरस्काराचे स्वरूप होते.

सदर प्रसंगी महाराष्ट्र राज्य शिक्षण मंत्री दीपक केसरकर , केंद्रीय सहसचिव शालेय शिक्षण व साक्षरता विभाग नवी दिल्ली अर्चना शर्मा अवस्थी , प्रधान सचिव शालेय शिक्षण व क्रीडा विभाग महाराष्ट्र आय. ए. कुंदन , आयुक्त मांढरे , राज्य प्रकल्प प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई विमला , संचालक एससीईआरटी राहुल रेखावार , ज्यांच्या संकल्पनेतून स्पर्धा आयोजित करण्यात आली, ते संचालक प्राथमिक राज्य मंडळ पुणे शरद गोसावी, महेश पालकर , कृष्ण कुमार पाटील, संपत सूर्यवंशी, सहसंचालक एससीईआरटी रमाकांत काटकोरे उपस्थित होते. राज्य शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी आपल्या मनोगत मध्ये शिक्षकांच्या व त्यांच्या व्हिडिओ निर्मितीचा गौरव करताना सांगितले की अशा प्रकारचे व्हिडिओ निर्मिती करून मुलांच्या भावकल्पनेमध्ये एक नवीन जग निर्माण करता येते व त्यांच्यामध्ये नवीन उत्साह निर्माण करून एक भावी पिढी आपण घडवू शकतो. असे सांगितले.

# मुंबईतील सफाई कामगारांचा रखडलेला घरांचा प्रश्न तातडीने मार्गी लावा

### भाई गिरकर यांची आयुक्तांकडे मागणी



प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबईतील २८ हजार सफाई कामगारांच्या रखडलेल्या मालकी हक्काच्या घरांचा प्रश्न तातडीने मार्गी लावण्याची मागणी आज माजी मंत्री, आमदार विजय (भाई) गिरकर यांनी मुंबई महापालिका आयुक्त भुषण गगराणी यांना महापालिका मुख्यालयात निवेदन सादर करून केली. यामध्ये महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पारित केलेल्या शासन निर्णयानुसार घरांची उभारणी करण्यात यावी अशी प्रामुख्याने मागणी करण्यात आली. तसेच कुलाबा येथील पंचशील नगर, राजवाडकर स्ट्रीट येथे सुरू असलेल्या वसाहतीच्या निकृष्ठ कामाची पाहणी करून तातडीने कामाला स्थगिती देण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

मुंबईतील इतर ठिकाणी तांत्रिक तसेच विविध कारणास्तव रखडलेल्या मालकी हक्काच्या घरांच्या वसाहतीचे काम जलद गतीने पूर्ण करण्याची मागणी देखील निवेदनाच्या माध्यमातून करण्यात आली. या सर्व विषयांची माहिती घेऊन योग्य ती कार्यवाही करण्याचे आश्वासन महापालिका आयुक्त यांनी उपस्थित सफाई कामगारांना दिले.

याप्रसंगी उपायुक्त शेखर चोरे, सफाई कामगार प्रतिनिधी अनिल कांबळे, संतोष गमरे, गोविंद पडवणकर, दिपक पवार, राजेंद्र मोहिते, मयुर देवळेकर, सत्यवान नर, सुनिल मांजेकर व इतर सफाई कामगार उपस्थित होते.

# महामुंबई मेट्रोने सुरु केली पर्यावरणस्नेही व्हॉट्सॲप तिकीट सेवा, लाखो प्रवाशांचा प्रवास झाला सुलभ

प्रतिनिधी
■ मुंबई

महामुंबई मेट्रो ऑपरेशन्स कॉर्पोरेशन लिमिटेडने (एमएमएमओसीएल) प्रवाशांच्या सोयीसाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलत व्हॉट्सॲपवर आधारित तिकीट सेवा सुरू केली आहे. नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून या उपक्रमाचे उद्घाटन महिला प्रवाशांच्या हस्ते करण्यात आले. महिलांकडून झालेला या सेवेचा शुभारंभ हे महिला सक्षमीकरण व इनोव्हेशनचे प्रतीक आहे. आता मेट्रो लाईन २ए आणि ७च्या




प्रवाशांसाठी ही नवीन सुविधा उपलब्ध आहे. यामुळे प्रवासी थेट व्हॉट्स ॲपवरून तिकीट खरेदी करू शकतात. यासाठी स्वतंत्र मोबाइल ॲपची गरज नाही. त्यामुळे अधिक सोपी युझर-फ्रेंडली म्हणजेच वापरकर्त्यासाठी सोयीची असलेली सेवा उपलब्ध होणार आहे.


प्रवाशांना ८६५२६३५५०० या व्हॉट्सॲप क्रमांकावर 'Hi' पाठवून किंवा स्थानकांवरील क्यूआर कोड स्कॅन करून संभाषणात्मक यंत्रणेच्या (कन्व्हर्सेशनल इंटरफेस) माध्यमातून प्रवासी तिकीट खरेदी करू शकतात. या संवादात्मक सुविधेत महामुंबई मेट्रो ऑपरेशन्स कॉर्पोरेशन लिमिटेडद्वारे (एमएमएमओसीएल) संचलित करण्यात येणारी सर्व स्थानके व लाईन समाविष्ट करण्यात आल्या आहेत आणि मुंबईच्या मेट्रो नेटवर्कमध्ये ही नवी डिजिटल सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे.

**मध्य रेल्वे**
दूरसंचार कामे
**ई-निविदा सूचना क्र. सीआर-बीबी-टेले-२०२४-५५**

विभागिय रेल्वे व्यवस्थापक (एस आणि टी), १ ला मजला, पार्सल ऑफिस कार्यालय, पी. एफ. क्र. १३ जवळ, मध्य रेल्वे, मुंबई – ४००००१ भारताच्या राष्ट्रपतींसाठी आणि त्यांच्या वतीने नामांकित कंत्राटदारांकडून एक ई-निविदा (खुली निविदा) मागवित आहेत. निविदेच्या सादरीकरणासाठी शेवटचा दिनांक आणि वेळ १४/११/२०२४ रोजी १५.०० वा. पर्यंत आहे. कामाचे नाव : मुंबई विभागामधील कल्याण अनुभागामध्ये नेटवर्क कनेक्टीव्हिटीसह टेलीकॉम असेटस आणि कॉन्फरन्स सिस्टिम्सचा पुरवठा, बसविणे, तपासणे आणि कार्यान्वित करणे. कामाचे अंदाजे मूल्य: रु. ८६,१९,४६९/- इरठे: रु. १,७२,४००/- समाप्तीचा दिनांक आणि वेळ : १४/११/२०२४ रोजी १५: वा. वैधता: ६० दिवस . पूर्तता कालावधी: १२ महिने. निविदेच्या पूर्ण तपशिलासह शुद्धिपत्रक भारतीय रेल्वेचे संकेतस्थळ www.ireps.gov.in वर उपलब्ध आहे. संपूर्ण निविदा कागदपत्रे संकेतस्थळावरून डाऊनलोड करता येतील. निविदेचा पूर्ण तपशिल विभागिय रेल्वे व्यवस्थापक (एस आणि टी) ह्यांचे कार्यालय, मुंबई सीएसएमटी ह्यांच्या सूचना फलकावर देखील उपलब्ध आहे. सदर निविदा सार्वजनिक प्रापण धोरण आदेश २०१७/ दिनांकित १५.०६.२०१७ अंतर्गत मान्यताप्राप्त आहे. 467

रेल्वे फाटक को बंद स्थिति में पार करना मना है

संकुचित ध्येय बाळगू नका.
महान विचारदृष्टी समोर ठेऊन
परिश्रम केले तर आपला देश
निश्चितपणे एक विकसित राष्ट्र बनेल.



- डॉ. अब्दुल कलाम

वृत्तमानस
मुंबई, सोमवार, १४ ऑक्टोबर २०२४

# धोक्याची पातळी वाढतेय...

**महासागर** ओसंडून वाहत आहे, हा सर्वात मोठा धोका भविष्यात असू शकतो असा इशारा अलीकडेच देण्यात आला असला तरी त्याकडे अजूनही कोणी गांभीर्याने पाहिले नाही. मुळातच जगभरातील अनेक देश समुद्राच्या वाढत्या पातळीचा सामना करत आहेत. याचे कारण ग्लोबल वॉर्मिंग आहे. यातील काही देश पूर्ण बुडण्याच्या उंबरठ्यावर पोहोचले आहेत. या देशांतील रहिवाशांसाठी हा गंभीर धोका निर्माण झाला असल्याचे स्पष्ट होते. अलीकडेच बांगलादेशच्या काही किनारी भागात आलेल्या पूरस्थितीमुळे या समस्येचे गांभीर्य अधिक अधोरेखित झाले आहे. जुलै २०२३ मध्ये आलेल्या पुरामुळे लाखो लोक प्रभावित झाले आणि अनेक गावे पाण्याखाली गेली. बांगलादेशच्या जलसंपदा मंत्र्यांनी इशारा दिला की, जागतिक तापमान वाढ नियंत्रित न केल्यास बांगलादेशातील बहुतेक किनारी भाग येत्या काही वर्षांत पाण्याखाली जाऊ शकतात अशी भीती आहे. त्याचप्रमाणे मालदीवमध्ये ही समुद्राची पातळी वाढणे ही गंभीर समस्या मानली जात आहे. मालदीव सरकारने मागील वर्षांपासून वाढत्या समुद्र पातळीपासून पायाभूत सुविधांचे संरक्षण करण्यासाठी एक योजना सुरू केली आहे, परंतु या प्रयत्नांना न जुमानता, लोकांना त्यांची बेटे सुरक्षित राहतील की नाही याबद्दल काळजी व्यक्त आहे. समुद्राच्या वाढत्या पातळीचा परिणाम केवळ बांगलादेश आणि मालदीवपुरता मर्यादित नाही. हा संपूर्ण मानवतेला धोका आहे. मुंबई, न्यूयॉर्क, शांघाय यांसारख्या जगातील इतर अनेक किनारी शहरांनाही ही समस्या भेडसावत आहे. हवामान बदलावर नियंत्रण न ठेवल्यास लाखो लोक त्यांच्या घरातून विस्थापित होऊ शकतात. गेल्या तीन दशकांत ही जागतिक वाढ प्रतिवर्षी ३.४ मिलिमीटर होती. बर्फ वितळण्याचा वेग असाच कायम राहिल्यास समुद्राची पातळी मोठ्या प्रमाणात वाढेल आणि त्यामुळं २०५० पर्यंत मुंबई पानात जाऊ शकते असे सांगितले गेले आहे. हा धोका फक्त मुंबईसाठीच नाही. तर मुंबईजवळच्या ठाणे, आणि नवी मुंबईलाही असणार आहे. मुंबईतले अनेक भाग समुद्रात भराव टाकून तयार करण्यात आली असून तापमान वाढीमुळे समुद्राची पातळी वाढली आहे. मुंबई आणि कोलकातासह भारतातील आणखी काही शहरांना समुद्रामुळे मोठा धोका निर्माण होणार आहे. सुरत, ओडिशा, केरळ, तामिळनाडू या शहरांचा धोकादायक यादीत समावेश आहे.. समुद्र किनाऱ्यावर वसलेल्या १० देशांच्या लोकसंख्येवर याचा प्रभाव होणार आहे. सर्वाधिक प्रभावित देशांच्या यादीत भारत अव्वल स्थानी आहे. फक्त भारतच नाही तर जगभरातील अनेक देशांना समुद्राचा धोका असल्याचा इशारा तज्ज्ञांनी या आधीच दिला आहे. समुद्राच्या पाण्याच्या पातळीत वेगाने वाढ होत आहे; ज्यामुळे मानवाला भविष्यात अनेक संकटांचा सामना करावा लागणार आहे. जगभरातील अनेक किनारी प्रदेश आणि शहरे आधीच विनाशकारी पूर आणि वादळांचा सामना करत आहेत; ज्यामुळे जीवन, नोकऱ्या आणि महत्त्वपूर्ण पायाभूत सुविधा धोक्यात येत आहेत. ऊर्जा, उद्योग आणि वाहतूक त्यासह जीवाश्म इंधनाच्या ज्वलनातून सोडल्या जाणाऱ्या कार्बन डायऑक्साइड, मिथेन आणि इतर उत्सर्जनामुळे ग्लोबल वॉर्मिंग वाढत आहे आणि समुद्राची पातळीही वाढत चालली आहे. ग्लोबल वॉर्मिंगमुळे समुद्र तापत आहे. गेल्या २० वर्षांत समुद्र तापण्याची गती दुप्पट झाली आहे. नैर्ऋत्य पॅसिफिक समुद्रात जागतिक सरासरीपेक्षा तिप्पट वाढ नोंदवण्यात आली आहे. २०२३ मधील महासागराचे तापमान हे आतापर्यंतचे सर्वात उष्ण तापमान होते. सर्वात महत्वाचे म्हणजे अंटार्क्टिकामधून दरवर्षी सरासरी १५० अब्ज टन आणि ग्रीनलँडमधून २७० अब्ज टन बर्फाचे वस्तुमान नष्ट होतात. अलीकडील वैज्ञानिक अहवालांनी हवामान 'टिपिंग पॉईंट्स' बद्दलही चिंता व्यक्त केली आहे. त्यानुसार तापमानात १.५ अंश सेल्सिअसपेक्षा जास्त वाढ झाल्याने संपूर्ण ग्रीनलँड आणि पश्चिम अंटार्क्टिक बर्फ वेगाने वितळू शकतो; त्यामुळे समुद्राच्या पातळीवर गंभीर परिणाम होऊ शकतात असे सांगितले जाते. २० व्या शतकाच्या सुरुवातीपासून जागतिक समुद्राची पातळी गेल्या तीन हजार वर्षांतील कोणत्याही टप्प्यापेक्षा वेगाने वाढली आहे आणि हा वेग दिवसेंदिवस वाढत आहे. १८८० मध्ये नोंदी सुरू झाल्यापासून, समुद्राची पातळी २० सेंटीमीटर इतकी वाढली आहे. दर दशकात याचा वेग वाढत आहे. जागतिक हवामान संघटनेच्या म्हणण्यानुसार, २०२३ मध्ये जागतिक सरासरी समुद्र पातळी विक्रमी उच्चांक वर पोहोचली आहे. पृथ्वीच्या असमान गुरुत्वाकर्षण क्षेत्रामुळे जगभरात समुद्र पातळीत समान प्रमाणात वाढ होत नाही. नैऋत्य पॅसिफिकच्या काही भागात १९९३ पासून समुद्राची पातळी जागतिक दरापेक्षा दुप्पट वाढली आहे. समुद्राची पातळी वाढल्याने संपूर्ण जग चिंतेत आहे, असे म्हणायला हरकत नाही. कारण जगातील सुमारे ४० टक्के लोकसंख्या किनाऱ्याजवळ राहते आणि अंदाजे ९०० दशलक्ष लोक कमी उंचीच्या भागात राहतात. जगभरातील किनारपट्टीवरील शहरे आधीच किनारपट्टीची धूप, शेती, खारे पाणी, वाढत्या विनाशकारी पूर आणि वादळांचा सामना करत आहेत. २०२२ च्या अभ्यासानुसार, बांगलादेश, भारत, चीन आशियातील उष्णकटिबंधीय प्रदेशांमध्ये सर्वात जास्त प्रभावित ठिकाणे असतील. कैरो, लागोस, लॉस एंजेलिस, मुंबई, ब्युनोस आयर्स आणि लंडन यांसारख्या मोठ्या शहरांवरही गंभीर परिणाम होण्याची भीती आहे. समुद्राच्या पातळीचा वेग वाढत्या तापमानावर अवलंबून आहे. वाढीचा हा आकडा मोठा वाटत नसला तरी शास्त्रज्ञांचा असा अंदाज आहे की, समुद्रातील प्रत्येक २.५ सेंटीमीटरच्या वाढीमुळे २.५ मीटरचा समुद्रकिनाराही हरवत चालला आहे. त्याचप्रमाणे, समुद्र पातळीच्या प्रत्येक सेंटीमीटर वाढीसाठी सहा दशलक्ष लोक किनारपट्टीच्या पुराच्या संपर्कात येण्याचा अंदाज आहे. शास्त्रज्ञांचा असाही अंदाज आहे की, मानवी क्रियाकलाप यामुळे शतकाच्या अखेरपर्यंत समुद्राची पातळी दोन मीटरपर्यंत वाढू शकते. समुद्राच्या पातळीत होणारी ही वाढ रोखण्याचा उपाय जलद उत्सर्जन कमी करणे हा असू शकतो. परंतु, उद्या जरी जगाने सर्व हरितगृह वायूंचे उत्सर्जन थांबवले तरी जागतिक तापमान वाढीमुळे समुद्राचे तापमान आणि बर्फ व हिमनदी वितळण्यावर होणारा परिणाम नियंत्रणात येण्यास काही काळ जाईल. जगभरातील देश समुद्रापासून शहरांचे संरक्षण करण्यासाठी आणि वादळाच्या लाटांचा सामना करण्यासाठी ड्रेनेज सिस्टम आणि पूर प्रतिरोधक इमारतींमध्ये सुधारणा करण्यापर्यंत अनेक प्रकारचे अनुकूलन उपाय करत आहेत. कासेनेगलच्या समुद्रकिना- यावर लाकडाची धूप करून किंवा कॅमेरूनमधील खारफुटीची जंगले पुन्हा निर्माण करून किनारपट्टीवरील धूप रोखण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. तसेच सखल भागात असलेल्या लहान बेटांना असणारा धोका पाहता गावे उंच ठिकाणांवर हलवण्यात येत आहेत. एकूणच या संकटाचा सामना करण्यासाठी जागतिक स्तरावर ठोस पावले उचलण्याची गरज आहे. विविध देशांदरम्यान सहकार्य करणे, अक्षय ऊर्जेच्या वापरास प्रोत्साहन देणे आणि हवामान बदलाचे परिणाम कमी करण्यासाठी संशोधनात गुंतवणूक करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. संयुक्त राष्ट्रांच्या अंतर्गत हवामान बदलावरील वाटाघाटींनी या दिशेने काही प्रगती केली आहे, परंतु अद्याप बरेच काही करणे बाकी आहे. भविष्यात येणारा हा धोका टाळणे आपल्या सर्वांच्या हातात आहे.

# महानगरपालिकेची तिजोरी रिकामी...

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी ५ ऑक्टोंबर २०२४ रोजी महाराष्ट्र राज्यात येऊन गेले. मुंबईत असलेल्या भुयारी मेट्रो रेल्वेचे उद्घाटन त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ठाण्यात येऊन केले. कोट्यवधीच्या विकास योजना राज्य सरकारने जाहीर करून झाल्या, मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला, मुंबईत दोन शिवसेनेचे दसरा मेळावे पार पडले, राष्ट्रीय स्वयसेवक संघाचा शस्त्र पूजनाचा आणि त्यानतंर नागपूरच्या रेशीम बाग मैदानावर विजय दशमी उत्सव पर पडला., दीक्षा भूमीवर धम्म चक्रप्रवर्तन दिन साजरा झाला, पंकजा मुंडे यांचा बीड जिल्ह्यातील सावरगावातील भगवान गडावर दसरा मेळावा पार पडला, मराठा आरक्षणासाठी लढा देणारे मनोज जरांगे पाटील यांनी ही बीड मध्ये श्री क्षेत्र नारायण गड येथे दसरा मेळावा घेऊन शक्ती. प्रदर्शन केले. आता विधानसभा निवडणुकीपूर्वीचे सर्व कार्यक्रम पार पडले आहेत. त्यामुळे आज, उद्या निवडणूक आयोगाला निवडणूक कार्यक्रम जाहीर करायला काहीच हरकत नाही. तसे त्यांना आदेश मिळाले असावेत असे गृहीत धरायला काही हरकत नाही. आजच आचारसंहिता जाहीर होईल अशी दाट शक्यता आहे असे वाटते.कारण मुंबई महानगरपालिकेच्या वतीने झालेल्या वा करायचे असलेल्या विकास कामांचे भूमिपूजन तसेच उद्घाटनाचे कार्यक्रम शिंदे सरकारच्या वतीने ७ आणि १० ऑक्टोंबर २०२४ रोजी रद्द झाल्याने काल रविवारी सुट्टीच्या दिवशी या विकास कामांचे भूमिपूजन, उद्घाटने शिंदे मंत्रिमंडळाने उरकून घेतली. विशेष म्हणजे विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर लगबगीने ही कामे पार पा गेली आहेत. हे लक्षात घेतले पाहिजे. अनेक संभाव्य उमेदवारांनी महिलांचे हळदीकुंकू समारंभ आटपून घेतले. महिलांना ताट वाट्या भेटीदाखल दिल्या व शेवटी मत द्यायला विसरू नका अशी आठवणही त्यांना करून देण्यात आली. काहींनी जेष्ठ नागरिकांना देव दर्शन घडवून आणले, गणेशोत्सवात आणि नवरात्रोत्सवात ही मंडळांना खुश करण्याची संधी संभाव्य उमेदवारांनी सोडली नाही. आता आचारसंहिता लागू झाल्यानंतर नवीन विकास कामांच्या घोषणा करता येणार नाही. उद्घाटने, भूमिपूजने करता येणार नाहीत. आदान प्रदान , देवदर्शन घडवता येणार नाही. म्हणून ही कामे युद्ध पातळीवर संभाव्य उमेदवारांनी उरकून टाकली.आहेत. असे मानायला हरकत नाही.

### पालिका कंगाल

विधानसभा निवडणूक जिंकायचीच या उद्देशाने महायुती व महाविकास आघाडी रननीती आखत आहेत. पण ही रननिती स्वपक्षासाठी आखली जाते हे लक्षात घेतले पाहिजे. या वरून त्यांच्यात सर्व आलबेल आहे असे नाही. जागा वाटपाचे घोडे अजून अडले आहेत. पण या दोन्ही युत्या आघाड्या आपल्या लहान सहान मित्र पक्षांना महत्वाच्या चर्चा जागावाटप यात सहभागी करून घेताना दिसत नाहीत. ते आपल्यातच जागा वाटून घेत आहेत. महाविकास आघाडीत समाजवादी पक्ष, कम्युनिस्ट पक्ष, रिपब्लिकन खोब्रागडे गट यांना चर्चेला बोलावले जात नाही म्हणून हे पक्ष खट्टू झाले आहेत. महायुतीमध्ये सुद्धा तोच प्रकार आहे. रिपब्लिकन पक्षाचे काही गट भाजप सोबत आहेत. ते जागांची मागणी करीत आहेत पण त्यांना म्हणावा तसा प्रतिसाद मिळत नाही. विशेष म्हणजे या लहान सहान पक्षांनी कोणतीही अपेक्षा न धरता लोकसभा निवडणुकीत युती - आघाडीला मदत केली आहे. दलित व मुस्लिम.समाजाने तर महा विकास आघाडीला भरभरून मते दिली.म्हणून त्यांना चांगले यश मिळाले होते हे महाविकास आघाडीचे नेते आता विसरून गेले आहेत. ते त्यांना गृहीत धरून चालल्याचे दिसत आहेत. पण लोकसभा निवडणुकीवेळी जी परिस्थिती होती ती आज कुठे दिसत नाही. या लहान सहान पक्षांना तसेच दलित, मुस्लिम घटकांना सत्तेत वाटा मिळणार नसेल तर त्यांनी महाविकास आघाडीला विनाशर्थ पाठिंबा का द्यायचा? अशी भावना.ते व्यक्त करतात. तर मुंबईवरील शिवसेना ( उध्दव ठाकरे) गटाचे वर्चस्व नेस्तनाबूत करण्याचा विडा उचललेल्या महायुतीच्या नेत्यांनी मुंबई महानगरपालिका कंगाल करून टाकल्याचे दिसत आहे. मुंबई महापालिकेकडे ९० हजार कोटींच्या मुदत ठेवी होत्या. विशेषतः या ठेवीत महत्वाच्या प्रकल्पाचा निधी असतो,



**महापालिकायन**

सुनील शिंदे

मोबाईल नंबर-९८२१९९६११७

कंत्राटदारांची अनामत रक्कम असते, कामगारांच्या प्रा.फंडाचे पैसे असतात, सेवा निवृत्त कामगारांच्या पेन्शनची रक्कम असते. विविध बँकांमध्ये ही रक्कम अल्पमुदतीने ठेवण्यात येते. या पैशांवर वार्षिक ४५०० कोटी रुपये व्याज मिळते. पण गेल्या दोन वर्षात मुदत ठेवीच्या आधीच १८२२ कोटी ७० लाखाची रक्कम काढण्यात आली आहे. तर गेल्या ५ वर्षात २३६० कोटीची रक्कम मुदत संपण्यापूर्वीच काढण्यात आली आहे. व राज्य सरकारच्या आदेशाने ती रक्कम खर्च करण्यात आली आहे. पालिकेचे उत्पन्नाचे स्त्रोत हळू हळू कमी होत आहेत. पालिका जकातीच्या माध्यमातून दर वर्षी ९ हजार कोटी पर्यंत महसूल मिळवत असे. पण जकात बंद.झाल्यामुळे त्यामानाने केंद्राकडून येणारी जीएसटी चा निधी पुरेसा नसतो.तसेच मुंबई शहरातील ५०० चौरस फुटाच्या मालमत्तांचा कर माफ करण्यात आल्यामुळे महसुलात घट झाली आहे. त्यामुळे अद्याप पालिका व बेस्ट कर्मचाऱ्यांना दिवाळी साठी सानुग्रह अनुदानाची रक्कम जाहीर करण्यात आली नाही. आचारसंहिते पूर्वी प्रत्येकी ३० हजार रुपये सानुग्रह अनुदान जाहीर करण्याची मागणी पालिकेतील विविध कामगार संघटनांच्या समन्वय समितीच्या नेत्यांनी पालिका.आयुक्त भूषण गगराणी यांची प्रत्यक्ष भेट घेऊन अनेक वेळा केली आहे. पण मुख्यमंत्र्यांशी चर्चा केल्याशिवाय सानुग्रह अनुदानाची रक्कम जाहीर होऊ शकत नाही ही आपली अडचण आयुक्त गगराणी यांनी कामगार नेत्यांच्या समन्वय समितीच्या नेत्यांना सांगून बसले आहेत.आचारसंहिता लागू होण्यापूर्वी ही सानुग्रह अनुदानाची रक्कम जाहीर झाली नाही तर पालिका कामगारांच्या रोषाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना बळी पडावे लागणार आहे. सानुग्रह अनुदानासाठी अर्थसंकल्पातच पालिका प्रशासनाने तरतूद केली आहे असे पालिका कामगार नेते सांगत आहेत. मग निर्णय घ्यायला इतका उशीर का लागतो? हा पालिका कामगारांना पडलेला प्रश्न आहे. गेल्या वर्षी ८ नोव्हेंबर २०२३ रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या समवेत वर्षा बंगल्यावर त्यावेळचे पालिका आयुक्त इकबाल सिंह चहल व त्यांचे सहकारी व अधिकारी तसेच समन्वय समितीचे नेते यांची संयुक्त बैठक होऊन २६ हजार रुपये सानुग्रह अनुदान देण्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली होती.

१. महानगरपालिका अधिकारी / कर्मचारीः रुपये २६,०००/-
२. अनुदान प्राप्त खासगी प्राथमिक शाळा शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारीः रुपये २६,०००/- ३. महानगरपालिका प्राथमिक शाळेतील तसेच अनुदानप्राप्त खासगी प्राथमिक शाळेतील शिक्षण सेवकः रुपये २६,०००/- ४. माध्यमिक शाळेतील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी (अनुदानित/विनाअनुदानित): रुपये २६,०००/-
५. माध्यमिक शाळेतील शिक्षण सेवक (अनुदानित/ विनाअनुदानित): रुपये २६,०००/-
६. अध्यापक विद्यालय अधिव्याख्याते / शिक्षकेतर कर्मचारी- (अनुदानित/विनाअनुदानित): रुपये २६,०००/- ७. अध्यापक विद्यालय शिक्षण सेवक (पूर्ण वेळ) (अनुदानित/विनाअनुदानित): रुपये २६,०००/-

आणि ८. सामाजिक आरोग्य स्वयंसेविका (CHV): भाऊबीज भेट रुपये ११,०००/- अशाप्रकारे इतरांना सानुग्रह अनुदान जाहीर झाले होते. पण यंदा तशी हालचाल अजूनही दिसत नाही. गणेशोत्सवापूर्वीही समन्वय समितीने पालिका आयुक्तांची भेट घेतली होती. मुंबई मनपा कर्मचा-याच्या विविध भत्यामध्ये 2009 पासून सुधारणा करण्यात आली नव्हती आयुक्तांनी मात्र भत्यामध्ये 100 टक्यांनी वाढ करून सुधारणा करण्याचे मान्य करून त्यापोटी ५० टक्के थकबाकीची रक्कम गणेश चतुर्थी पूर्वी देण्याचे आयुक्त गगराणी यांनी मान्य केले होते. व ही पालिका कर्मचाऱ्यांना गणेशोत्सवासाठी मिळालेली भेट असणार आहे. असे कामगार नेत्यांनी पत्रकारांना सांगितले होते. तशा बातम्याही प्रसिद्ध झाल्या होत्या. पण कामगारांना गणेश चतुर्थी पर्यंत काय आज पर्यंत ती थकबाकी मिळालेली नाही. कामगार मात्र पत्रकार खोट्या बातम्या देत असल्याचा आरोप करून मोकळे झाले.याच बैठकीत 1 सप्टेंबर 2024 पासून नवीन गटविमा योजना चालू करण्यात येणार होती. पण त्यात खूपच जाचक अटी असल्यामुळे ती कामगारांनी अजून स्वीकारली नाही.मात्र प्रशासन परिपत्रक काढून मोकळे झाले आहे. पण ती चालू झालेली नाही. त्यासाठी वार्षिक रुपये 223 कोटी रुपये लागणार आहेत., रामनाथ झा समितीचा अहवालाची लवकरच अंमलबजावणी केली जाईल व उर्वरित कर्मचा-यांच्या वेतन विसंगतीवर पुन्हा चर्चा होणार होती. पी.टी. केसेस व प्रकल्पग्रस्तांची भरती करण्यात करण्यात येणार होती. रुग्णालयात, घनकचरा व्यवस्थापन या अत्यावश्यक सेवेमध्ये येतात. त्यांचीही तत्काळ भरती करण्यात येईल असे आयुक्तांनी सांगितले होते. पण त्याची अंमलबजाणी झाली नाही. तसेच मध्यंतरी कामगार कर्मचाऱ्यांचे वेतन ही १ तारखेला होऊ शकले नव्हते. या साऱ्या गोष्टी आर्थिक बाबींशी निगडित आहेत. पालिका बरखास्त झाल्यानंतर सरकारचा अंकुश या स्थानिक स्वराज्य संस्थांवर आहे. मुंबई महानगर पालिका म्हणजे दुभती गाय. त्यातच शिवसेने(उध्दव ठाकरे) ची पालिकेत निर्विवाद सलग २५ वर्षे सत्ता होती. बदलेल्या राजकीय समीकरणांमुळे शिवसेनेला सत्तेवरून हटवण्याची शिंदे भाजपमध्ये अहमहमिका सुरू झाली आहे. मुंबईकरांना खुश करण्यासाठी वारेमाप खर्च करण्यास सुरूवात करण्यात आली त्याचेच परिणाम आज दिसत आहेत. पालिका निवडणूक पुढच्या वर्षी होईल. पण पालिकेची तिजोरी विधानसभा निवडणुकीपूर्वीच खाली झाली आहे. नव्हे खाली करण्यात आली आहे. काल पालिका कामांची ही उद्घाटने व भूमिपूजने सरकारच्याच वतीने झाली. पालिकेचे एक अंग असलेल्या बेस्ट उपक्रमाची आर्थिक परिस्थिती हालाखीची आहे. एक एक कंत्राटदार आता बेस्ट ला राम राम करीत आहे. हंस कंपनीने दोन दिवसांपासून गाड्या बाहेर काढल्या नाहीत. ही सुरुवात झाली आहे. बेस्ट कडे नवीन बसगाड्या घेण्यासाठी पैसे नाहीत. म्हणून भाडेतत्त्वावर बसेस घेण्यात आल्या होत्या पण त्याही हळू हळू अंग काढून घेत आहेत. सर्वच कंत्राटदारांनी अंग काढून घेतले तर ? पालिकेने बेस्ट ला आर्थिक मदत केली पाहिजे असे सरकार मधील मंत्री महोदय सांगतात. पण पालिकेचे पैसे सुशोभिकरण किंवा एमएमआरडीए वा जिल्हाधिकारी यांच्या अखत्यारितील प्रकल्पांना खर्च करायला भाग पाडलेजात असतील तर बेस्ट उपक्रमात नवीन बसगाड्या कुठून येणार? बेस्ट उपक्रम उद्या बंद पडला तरी सरकारला त्याचे सोयरसुतक वाटणार नाही. मुंबईकरांना मात्र नाहक त्रास सहन करावा लागणार आहे. हे लक्षात घेतले पाहिजे.

## पत्र मानस

### राज्यात ना नेते सुरक्षित ना जनता 'सुरक्षित.'

देशात आणि राज्यात मोठय़ा ऊत्साहात दुसऱ्याचा सण साजरा होत असताना, सत्ताधारी पक्षाच्या एका माजी आमदार आणि महत्वाचे पदे भुषविलेल्या बाबा सिद्दिकी यांच्या वर भर गर्दीत, एका कार्यक्रमात गोळीबार करण्यात आला आणि त्यात त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. त्याच वेळी खुद्द मुख्यमंत्री आणि ऊद्धव ठाकरे यांचा दसरा मेळाव्याच्या निमित्ताने एकमेकांवर आरोप प्रत्यारोप करण्याचा शिमगा देखील मुंबईतच सुरू होता. एक ऊपमुख्यमंत्री नागपूरात होते तर दूसरे कुठे होते कोण जाणे? काही दिवसांपूर्वीच भायखळयात देखील राष्ट्रवादीच्या एका पदाधिकाऱ्याची हत्या करण्यात आली होती. त्याचबरोबर काही महिन्यांपूर्वी मुंबईतच विनोद घोसाळकर यांच्या मुलाची देखील अशीच हत्या झाली होती. केवळ मुंबईतच नव्हे तर पुणे, नागपूर असो कि ईतर ठिकाणी असो गुन्हेगारांना कोणाचेच भय राहिलेले नाही अशी परिस्थिती आहे. महिला व मुलीवरील अत्याचाराच्या घटनां सातत्याने घडत आहेत, पुण्यात तर पोलिस, प्रशासन, संबधित यंत्रणा यांच्या नाकावर टिच्चून बलात्काराच्या, ड्रंक अँण्ड ड्राईव्ह च्या घटना, अमली पदार्थाचा गोरखधंद्या, कोयता गँगची दहशत, या अशा घटना वारंवार घडत आहेत. नागपुरात ही काही वेगळी परिस्थिती नाही. युती सरकारच्या पहिल्या काळात दाऊद ला फरफटत आणण्याची घोषणा मोठ्या आवेशाने केली गेली होती मात्र आजपर्यंत दाऊदला आणण्यात कारभाऱ्यांना यश आले नाही. एका शिंदेला चे एन्काऊंटर करुन मारले गेले, म्हणून केवढा गदारोळ माजला होता, श्रेयवाद, आरोप प्रत्यारोप केले गेले, पाठ थोपटून घेतली गेली, मात्र ऊरण, नवी मुंबई, पुण्यात आणि अनेक ठिकाणी बलात्कार आणि हत्यांच्या अशाच पद्धतीने घटना घडल्या त्यापैकी ना कोणाचे एन्काऊंटर झाले ना कोणी गजाआड गेले. भ्रष्टाचार, महागाई, बेरोजगारी याकडे ना सत्ताधारी ना विरोधक गांभीर्याने पहायला तयार. राज्यात खरोखरच कायद्याचे राज्य आहे का? गृहमंत्री हे केवळ सत्ताकारण आणि राजकारणात मग्न आहेत,आतातर'मी पुन्हा येईन' यासाठी विधानसभा निवडणुक त्यांच्यासाठी महत्त्वाची आहे, त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचे त्यांना काही देणे घेणे नसावे. गुन्हेगारांना ना शिक्षेची भिती राहिली आहे ना कायद्याचा धाक राहिला आहे. त्यामुळेच गुन्हेगारांची हिम्मत ईतकी वाढली आहे कि आता सत्ताधारी पक्षाचे नेते देखील सुरक्षित राहिलेले नाहीत, विशेष म्हणजे बाबा साद्दिकी यांना सुरक्षा व्यवस्था असतांना देखील सर्वांसमक्ष त्यांची हत्या करण्यात आली. जो तो आपापल्या अर्थकारणात, राजकारणात, सत्ताकारणात मग्न आहे, कोणालाच कोणाचे काही पडले नाही, तुम्हा आम्हाला, सर्व सामान्य जनतेला तर कोणीच वाली नाही. एकुणच परिस्थिती पाहता सगळा रामभरोसे कारभार सुरू आहे. गृहमंत्री म्हणून फडणवीस हे सपशेल अपयशी ठरले आहेत हे अनेकदा अधोरेखित झाले आहे.

**- अनंत बोरसे शहापूर**

### माणसातील माणुसकी कसाईवृत्तीकडे का वाढतेय?

माणसातली माणुसकी शुल्लक कारणांसाठी लोप पावताना दिसत आहे. एकदा मनुष्य या जगातुन गेला की या जन्मात परत येत नाही. पुनर्जन्म आहे की नाही या कथा तर कपोलकल्पित आहेत. कोणतेही दैनिक उघडले की हत्या, अत्याचाराच्या बातम्या वाचायला मिळतात.. एकेक घटना ऐकुन मन सुन्न झाल्याशिवाय राहात नाही. माजी मंत्री बाबा सिद्धीकी यांची गोळयाघालुन हत्या करण्यात आली. माजी मंत्री पंकजा मुडे यांनी आपल्याच सभेत " प्रत्येकाचा हिशेब करणार.. कोयत्याला धार लावा "असे सांगितले. संभाजीनगर मधील गांधी नगरात त्रिपुरा औटे या १६ वर्षीय युवतीने गळफास घेतला. व मृत्युला कवटाळले. रिक्षाचे भाडे देण्याच्या बाचाबाचीत टिटवाळा गणपती मंदिराजवळ कल्याण कसारा जवळ रिक्षा चालकाने मारहाणीत प्रवाशाचा मृत्यु झाला. ठाणे येथील वागळे इस्टेट परिसरात राहाणाऱ्या आजीची नातवाने हत्या केली.पैशाचा नातवावर संशय घेतल्यानेच घटना घडली. मीरा रोड ठाणे हद्दीत पती नादीर खान याने पत्नी अमरिनचा भर रस्त्यात गळा कापून हत्या केली. एका खटल्यात न्यायालयीन आदेशावरून मुलाचा ताबा घेण्यावरून भांडण झाले. या अशा बातम्या वाढतच असल्याचे लक्षात येते.माणसातली माणुसकी लयाला जाताना दिसते. कोणत्याही भांडणाचा शेवट हाच मुळी "कसाई " वृत्तीकडेच का जातो ? संत समागमाच्या मार्गाने "माणसांनी माणुसकीने" वागले पाहिजे. कोणी मृत्युनंतर काही घेऊन जात नाही. मोकळ्या हाताने आला ,मोकळ्या हाताने जातो. जीवंत माणसांना स्मशानात "क्षणिक "दु:ख होते. " काय घेऊन गेला/ गेली" म्हणुन वाईट वाटते . नंतर घरी आल्यावर" ये रे माझ्या मागल्या" कविवर्य भा.रा.तांबे आपल्या कवितेत " जन पळभर म्हणतील हाय हाय, तु जाता राहिल कार्य काय ? " मनुष्य मृत्यु नंतर पुन्हा येतच नाही. केवळ क्षणिक शोक केला जातो. त्या व्यक्तिने कार्य काय केले इतकेच शिल्लक राहते.

**- अनंत दत्ताराम दाभोळकर.अंधेरी**

### कोविड काळाचे विस्मरण नको

२०२० मधील जगावर कोसळलेली कोविडची महामारी आजचे सत्ताधारी पूर्णपणे विसरलेले दिसतात. परिणामी केंद्र सरकारने घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांना अनुसरून तत्कालीन ठाकरे सरकारने अनेक निर्बंध घातले होते. त्यातच दोन वेळा नैसर्गिक आपत्तीचे संकट ओढवल्याने सरकारी खजिन्यातील आवक पूर्णतः मंदावली होती. हे वास्तव समोर असतानाही त्यावेळच्या मंत्रिमंडळातील मंत्री असलेले आजचे मुख्यमंत्री, त्यांच्या कारभाराशी तुलना करतात हे विसंगत वाटते. त्यामुळेच कुठे न फिरता घरून काम करणे अनिवार्य होते. त्यावरही टीका होते. इतकेच नव्हे तर त्यांच्या आजारपणावरही टीका टिपणी करणे शोभा देत नाही. वास्तविक त्यांच्या मुळेच आपल्याला सर्व रान मोकळे होते याचेही त्यांना विस्मरण झाले याचे वाईट वाटते. सर्व काही देऊनही माणूस कसा बदलू शकतो ? याचीच जनतेत चर्चा आहे. धनशक्तिचा वरदहस्त तसेच सरकारी तिजोरीत बऱ्यापैकी आवक असल्यानंतर राज्याचा कारभार करणे यात फरक आहे. त्यातच केंद्र सरकार कडून आज जे भरीव योगदान मिळत आहे तसे तेव्हा मिळत नव्हते हे विचारात घ्यावे. बाळासाहेबांनी आपला उत्तराधिकारी म्हणून आपले पुत्र उद्धव ठाकरे यांची निवड केल्यावर त्यांना सांभाळून घ्या असे आवाहन करूनही आजचे फुटीर जाणीवपूर्वक दुर्लक्ष करताना दिसतात. मग त्यांचा वारसा पुढे कसा काय चालवणार ? आज राज्याच्या तिजोरीवर डल्ला मारण्याचे काम सुरू असल्याने कर्जाचा भार वाढत चालला आहे याचे भान असावे. परिणामी मीच योग्य कारभारी म्हणणे कितपत योग्य आहे? त्यामुळे संकट काळात ज्याने जनतेची नीट काळजी घेतली त्या काळाचे विस्मरण होऊ नये.

**- पांडुरंग भाबल,भांडुप.**

## रविवारी पहाटे पार पडला तुळजाभवानी मातेचा सीमोल्लंघनाचा सोहळा

**धाराशिव :** श्री तुळजाभवानी देवीजींच्या शारदीय नवरात्र महोत्सवात तुळजापूर येथे आज 13 ऑक्टोबर रोजी पहाटे 6 च्या सुमारास तुळजाभवानी मातेचा सीमोल्लंघनाचा सोहळा पार पडला. श्री तुळजाभवानी मंदिरात पहाटे विधीवत पूजा व आरती करुन देवीजींचे माहेर असणाऱ्या अहिल्यानगरहून आलेल्या मानाच्या पालखीत देवीजींची वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली.पिंपळाच्या पारावर देवीजींची पालखी टेकवून पुन्हा आरती करण्यात आली.मिरवणुकीनंतर प्रथेप्रमाणे पारंपारिक पध्दतीने मंत्रोच्चार,आई राजा उदो उदोचा जयघोष आणि पारंपरिक वाद्य संबळाच्या साथीने सर्व विधी करण्यात आले. तुळजाभवानी देवीजींची मूर्ती ही चल मूर्ती असल्याने ती आपलं सिंहासन सोडून सीमोल्लंघन करण्यासाठी भाविकांच्या बरोबर मंदिराच्या बाहेर येते. सीमोल्लंघनानंतर देवी पुन्हा पौर्णिमेपर्यंत निद्रा अवस्थेत जातात. यावेळी देवीजींच्या मुर्तीला इजा होऊ नये म्हणून 108 साडया परिधान करण्यात येतात. शेवटी प्रथेनुसार अहिल्यानगरच्या भक्तांनी श्रीदेवीजींची पालखी तोडून पालखीचे होमात विसर्जन केले.



**म ह त्त्वा चे**

### रविवारी पुण्यात नास्तिक परिषद

**पुणे :** येत्या रविवार 20 ऑक्टोबर, 2024 रोजी सकाळी 9 ते संध्याकाळी 6 वाजे पर्यंत गांधी भवन, चैतन्य नगर, कोथरूड, पुणे येथे नास्तिक परिषदेचे आयोजन करण्यात आहे. या परिषदेला प्रमुख पाहुणे वसंत आबाजी डहाके (लेखक, कवी, मराठीचे भाषातज्ज्ञ, 85 व्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष). हे उपस्थित राहणार आहेत. या परिषदेत अर्जुन डांगळे (ज्येष्ठ साहित्यिक, सामाजिक कार्यकर्ते, दलित पँथरचे सहसंस्थापक, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या स्टेट युनिटचे अध्यक्ष) यांना चार्वाक पुरस्काराने गौरवण्यात येणार आहे. तसेच, हर्षदा स्वकुळ (वृत्तनिवेदिका, पत्रकार) यांना मधुरजग पुरस्काराने गौरवण्यात येणार आहे. काही पुस्तकांचा प्रकाशन सोहळा सुद्धा या परिषदेत होईल. प्रामुख्याने ही परिषद ब्राइट्स सोसायटीचे सदस्य आणि विशेष निमंत्रित यांच्या साठी आहे. शिवाय सदस्यांचे कुटुंबीय आणि मित्रपरिवार हे सुद्धा सहभागी होऊ शकतात. अगांतुक व्यक्तींना या परिषदेत सहभागी होता येणार नाही. असे आयोजकांनी कळविले आहे.

### अष्टविनायक गणपती मंदिरांच्या जिर्णोद्धार

**अलिबाग :** राज्यसरकारने अष्टविनायक गणपती मंदिरांच्या ९२ कोटी १९ लाख रुपयांच्या जिर्णोद्धार आराखड्यास मंजुरी दिली असून, याबाबतचा शासन निर्णय वित्त व नियोजन विभागाने गुरुवारी जारी करण्यात आला आहे. यात रायगड जिल्ह्यातील पाली आणि महड येथील गणपती मंदिरांचा समावेश असून या दोन मंदिरांच्या जिर्णोद्धारासाठी २८ कोटी ८५ लाख रुपये खर्च केले जाणार आहेत.तिर्थक्षेत्र विकास कार्यक्रमाअंतर्गत रायगड, पुणे आणि अहिल्या नगर जिल्ह्यांनी अष्टविनायक गणपती मंदिरांच्या जिर्णोद्धार करण्यासंदर्भातील प्रस्ताव राज्यसरकारला सादर केला होता. हा प्रस्ताव शासनाच्या मजुरीसाठी गेली दिड वर्ष प्रलंबित होता. विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर त्याला मंजुरी देण्यात आली आहे. ९२ कोटी १९ लाख रुपयांच्या या प्रस्तावाला राज्यसरकारच्या वित्त व नियोजन विभागाने प्रशासकीय मंजुरी दिली आहे. त्यामुळे अष्टविनायक गणपती मंदिरांच्या जिर्णोद्धाराचा मार्ग मोकळा झाला आहे. याबाबतचा शासन निर्णय गुरुवारी काढण्यात आला.

### मालवाहू वाहनाची दुचाकीला धडक

**जामनेर :**नवरात्रोत्सवानिमित्ताने साखरादेवी यात्रेत देवीच्या दर्शनाला जाताना तरुणावर काळाने घाला घातला. जामनेर तालुक्यातील वाकोदजवळ दुचाकी आणि पिकअप वाहनांची समोरासमोर धडक झाल्याने हा भीषण अपघात झाला. यात एकाचा जागीच मृत्यू झाला. तर दुसरा गंभीर जखमी झाला आहे. जामनेर तालुक्यातील कुंभारी तांडा येथील अमोल शिवाजी गोसावी व आशिक गब्बर गोसावी हे वाकोद येथील साखरादेवी यात्रेनिमित्ताने देवीच्या दर्शनाला जात होते. देवीचे दर्शन घेऊन वाकोदच्या आठवडे बाजार असल्याने दसऱ्याचा बाजार करून येतो असं सांगून निघाले. गावापासून काही अंतरावर गेले असतांनाच वाकोदकडून तोंडापूरकडे भरधाव वेगाने जाणाऱ्या पिकअप वाहनाने मोटारसायकलला समोरून जोरदार धडक दिली. यात अमोलचा जागीच मृत्यू झाला.

# लाडकी बहिण योजनेवरून काहींच्या पोटात दुखतंय; उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा विरोधकांवर निशाणा

प्रतिनिधी
■ गोंदिया



लाडकी बहीण योजना सुरु केली तेव्हा विरोधक हसत होते. योजना सुरु झाल्यानंतर लाडक्या बहिणींच्या खात्यात पैसे जमा होऊ लागले. नोव्हेंबरमध्ये निवडणुका राहतील; म्हणून पैसे जमा करता येणार नाही. यामुळे अडवान्समध्ये ऑक्टोबर आणि नोव्हेंबरचे पैसे देखील बहिणीचा खात्यामध्ये आम्ही टाकतो. या योजनेमुळे आता विरोधकांच्या पोटात दुखायला लागले आहे; असे म्हणत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधांवर निशाणा साधला आहे.

गोंदिया जिल्ह्यातील तिरोडाचे भाजप आमदार विजय रहांगडाले यांच्यातर्फे आयोजित धापेवडा उपसा सिंचन टप्पा दोन भूमिपूजन कार्यक्रमाकरिता उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस गोंदिया जिल्ह्यात आले होते. त्यावेळी त्यांनी लाडकी बहिण योजनेवरून नाना पटोले, उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांच्यावर निशाणा साधत लाडकी बहिण योजना बंद होऊ देणार नाही असे वक्तव्य केले.

लाडकी बहीण योजना सुरू केली; त्यावेळी विरोधी पक्षातील मंडळी सभागृहामध्ये आमची गंमत करत होते. ही फसवी योजना आहे, पैसे जाणार नाही म्हणून बोलत होते. परंतु आम्ही म्हटलं हा बहिणीचा लाडक्या भावांचा वादा आहे. बहीणीचा खात्यात पैसे देऊ आणि अडीच कोटी बहिणीच्या खात्यांमध्ये पंधराशे रुपये टाकाने आम्ही सुरू केले. आता तर ऑक्टोबर आणि नोव्हेंबरचे पैसे देखील आम्ही पैसे टाकणे सुरू केले आहे. पहिले तर सांगितलं की योजना सुरू होऊ शकत नाही. सुरू झाली तर कोर्टामध्ये गेले.

कोर्टात जाऊन सांगतात कि महिलांकरीता आणलेल्या योजना आहेत. या योजनांने सरकारी तिजोरीच्या पैशांचा चुराडा होत आहे. म्हणून या योजना बंद करा म्हणून हे कोर्टात गेले. परंतु त्यांना कुठलाही रिलीफ दिलेला नाही. कोर्टात आम्ही त्यांना कुठलाही ऑर्डर मिळू देणार नाही. कारण आमच्या बहिणीची योजना आम्ही बंद करणार नाही. ज्यांचा पाठीशी बहीणी आहेत. त्यांचेच सरकार येणार आहे. उद्धव ठाकरे, काँग्रेस आणि पवारसाहेब तुम्ही लाडकी बहीण योजना बंद करायचा फक्त स्वप्न पाहत राहा; असे म्हणत देखील फडणवीस यांनी टोला लगावला आहे.

## साईबाबा पुण्यतिथी उत्सव; दोन लाख भाविकांनी घेतले साईदर्शन

शिर्डी येथे मागील वर्षापेक्षा ५० हजार यंदा भाविकांची संख्या अधिक



सुनील ओसवाल
■ शिर्डी

शिर्डी येथे साईबाबांच्या १०६ व्या पुण्यतिथी उत्सवाच्या मुख्य दिवशी शनिवारी २ लाख साईभक्तांनी श्रीसाईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतले. मागील वर्षीपेक्षा ५० हजारांहून अधिक भाविकांनी यावर्षी दर्शन घेतले.

उत्सवाच्या मुख्य दिवशी श्रीद्वारकामाईत सुरू असलेल्या श्रीसाईसच्चरित्र या पवित्र ग्रंथाच्या अखंड पारायणाची समाप्ती झाली. अखंड पारायण समाप्तीनंतर श्रीसाईबाबांच्या प्रतिमेची व श्रीसाईसच्चरित या पवित्र ग्रंथाची मिरवणूक काढण्यात आली.

लेंडी बाग येथे ध्वज पूजन करण्यात आले. नंतर काढण्यात आलेल्या भिक्षा झोळी कार्यक्रमात पदाधिकाऱ्यांसह पुजारी, कर्मचारी यासह १० ग्रामस्थ व १० साईभक्त सहभागी झाले होते. सकाळी १० वाजता छत्रपती संभाजीनगरातील डॉ. सविता मुळे यांचे कीर्तन झाले. साईच्या भोजन प्रसादाचा ५० हजार भाविकांनी शनिवारी लाभ घेतला.

**पुण्यतिथी उत्सवाची सांगता**

*१३ ऑक्टोबर रोजी उत्सवाची सांगता होईल. पहाटे श्रींचे मंगलस्नान, सकाळी श्रींची पाद्यपूजा व गुरुस्थान मंदिरात रुद्राभिषेक पूजा होईल. सकाळी रत्नागिरीचे कैलास खरे यांचे गोपालकाला कीर्तन व दहिहंडी होणार आहे. दुपारी श्रींची माध्यान्ह आरती होईल. नंतर पुण्याचे उदय दुग्गल यांचा साईभजन तर ललिता पांडे, जोगेश्वरी यांचा साई स्वराधना कार्यक्रम होईल. दिल्लीतील सक्सेना बंधूचा साईभजन संध्या कार्यक्रमही होणार आहे. रात्री १० वाजता श्रींची शेजारती होणार आहे.*

**व्हेंटिलेटरचे लोकार्पण**

*तामिळनाडू राज्यातील धर्मपुरी येथील देणगीदार साईभक्त जे. पी. बाल सुब्रमण्यम यांनी मंदिराला एक कोटी रुपयांच देणगी दिली होती. यातून साईबाबा हॉस्पिटल येथे बसवलेल्या ६ व्हेंटिलिटर मशिनचा लोकार्पण सोहळा हॉस्पिटलच्या आयसीयू विभागात पार पडला. यावेळी बाल सुब्रमण्यम यांचे कुटुंबीय उपस्थित होते.*

## कोल्हापूरच्या सरलष्कर बहाद्दर घराण्याचे वंशज श्रीमंत बंटीराजे खर्डेकर यांचे निधन

■ सातारा



फलटण येथील ख्यातनाम उद्योजक, समाजसेवक राजसिंहराजे आप्पासाहेब निंबाळकर तथा बंटीराजे खर्डेकर (वय ७९) (मूळ रा. कोल्हापूर) यांचे शनिवारी रात्री फलटण येथे अल्पशा आजाराने निधन झाले.दिवंगत श्रीमंत दादाराजे खर्डेकर यांचे ते बंधू, आ. श्रीमंत छ. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचे ते मामा तथा सासरे तर, श्रीमंत छ. सौ. वेदांतिकाराजे भोसले यांचे ते वडील होते.

कोल्हापूर येथील सरलष्कर बहाद्दर घराण्याचे वंशज असलेल्या बंटीराजे खर्डेकर यांनी औद्योगिक क्षेत्रात मोठे योगदान दिले. त्यांनी फलटण येथे साईराजा फ्रुट अँड फूड प्रोसेसिंग कंपनीची स्थापना करून या कंपनीचा नावलौकिक आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहचवला. त्यांना शेतीची विशेष आवड होती. त्यांनी फलटण येथील श्रीराम साखर कारखान्याचे व्हाइस चेअरमन पदही भूषविले. नेहमी हसतमुख असणारे आणि मनमिळाऊ व्यक्तिमत्त्व म्हणून बंटीराजे खर्डेकर यांना ओळखले जाई. बंटीराजे यांनी असंख्य गोर- गरीब, गरजू लोकांना सढळ हाताने मदत केली. त्यांच्या पश्चात पत्नी वैशालिनिराजे, मुलगा दिप्तीमानराजे, मुलगी वेदांतिकाराजे भोसले, जावई शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्यासह सुन, नातवंडे असा परिवार आहे.

## दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर मंत्री रविंद्र चव्हाण यांनी फोडला महायुतीच्या प्रचाराचा नारळ

प्रतिनिधी
■ डोंबिवली



विधानसभा निवडणुकीच्या तारखा जाहीर झाल्या नसल्या, तरीही सर्वपक्षीय नेते कंबर कसून कामाला लागले आहेत. महाराष्ट्राचे सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण यांनीही दसऱ्याचे औचित्य साधून एक कार्टून सोशल मीडियावर शेअर केले आहे.

विजया दशमीच्या दिवशी श्रीरामाने रावणाचा वध केला होता, याची आठवण म्हणून दरवर्षी दसऱ्याला रावण दहन करण्याची प्रथा आहे. याच प्रथेवर आधारित असलेल्या या कार्टूनच्या माध्यमातून रविंद्र चव्हाण यांनी महाविकास आघाडीवर तोफ डागली आहे. या चित्रात रावणाचा मोठा पुतळा दाखवण्यात आला असून त्याला १० हात दाखवण्यात आले आहेत. या हातांवर भ्रष्टाचार, लांगुलचालन, घराणेशाही, व्होट जिहाद, नारीशक्तीला विरोध, विकासकामांना खो, जातीवाद, शिवरायांना विरोध, हिंदू दैवतांचा अपमान आणि सावरकरांचा अपमान असे विविध मुद्दे दाखवण्यात आले आहेत. आगामी काळात महायुतीकडून या मुद्द्यांवर आघाडीला कोंडीत पकडले जाणार आहे. यासोबतच समोर भगव्या कपड्यातील एक माणूस दाखवण्यात आला असून तो महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करत असल्याचं दिसून येतो. त्याच्या हाती धनुष्यबाण असुन जणू काही महाविकास आघाडीच्या रावणाचा वध करायलाच महाराष्ट्र सज्ज असल्याचं दिसतंय. यासोबतच रविंद्र चव्हाण यांनी महाराष्ट्रातील मतदारांना सोशल मीडियाच्या माध्यमातून एक आवाहन देखील केलं आहे. "महाविकास आघाडीच्या अखंड भारतद्वेषी, हिंदूविरोधी आणि जिहादी रावणाचं दहन करूया. राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी पुन्हा एकदा महायुतीला विजयी करूया" असं रविंद्र चव्हाण यांनी म्हटलं आहे.

## पंढरपुरात धम्मचक्र परिवर्तन दिनानिमित्त भव्य मिरवणूक

**मनसे नेते दिलीप बापू धोत्रे यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करून मिरवणुकीला सुरुवात**

प्रतिनिधी
■ पंढरपूर



धम्मचक्र परिवर्तन दिनानिमित्त पंढरपूर शहरात तथागत भगवान गौतम बुद्ध व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढण्यात आली. यावेळी तथागत भगवान गौतम बुद्ध आणि महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन मनसे नेते दिलीप बापू धोत्रे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मनसे नेते दिलीप बापू धोत्रे यांनी मिरवणुकीत सामील होऊन बौद्ध बांधवांना शुभेच्छा दिल्या. या मिरवणुकीचे आयोजन भीमशक्ती सांस्कृतिक बहुउद्देशीय सामाजिक संस्था व रमामाता महिला मंडळ पंढरपूर यांच्यावतीने करण्यात आले होते.

यावेळी भीमशक्ती सांस्कृतिक बहुउद्देशीय सामाजिक संस्था व रमामाता महिला मंडळाचे संस्थापक अध्यक्ष संतोष सर्वगोड, ज्येष्ठ नेते नानासाहेब कदम, पत्रकार अभिराज उबाळे, शिवाजी चंदनशिवे, रवी सर्वगोड, सचिन भोरकडे ॲड. किशोर खिलारे, विठ्ठल वाघमारे, रिपब्लिकन सेनेचे सागर गायकवाड, आदींसह बौद्ध बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी गाण्याच्या तालावर लेझीमचे उत्कृष्ट असे सादरीकरण करण्यात आले. धम्म चक्र प्रवर्तन दिन दरवर्षी दसऱ्याच्या दिवशी साजरा केला जातो. भारतीय राज्यघटनेचे निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी दसऱ्याच्या दिवशी अनुयायांसोबत बौद्ध धर्म स्वीकारला, त्यामुळे हा दिवस धम्मचक्र परिवर्तन दिन म्हणून बौद्ध समुदायामध्ये महत्त्वपूर्ण आणि आदरणीय बनला. तेव्हापासून हा दिवस बौद्ध समाजातील लोक मोठ्या आदराने आणि उत्साहाने साजरा करतात.

## इतर धर्मांवर टीका - टिप्पणी हे सच्चा बौद्धाचे लक्षण नाही - डॉ. डोंगरगावकर

प्रतिनिधी
■ नवी मुंबई

इतर धर्म आणि अन्य धर्मियांवर, त्यांच्या सण उत्सवांवर टीका - टिप्पणी करणे हे अस्सल बौद्ध माणसाचे लक्षण असू शकत नाही, असे प्रतिपादन शिक्षण तज्ज्ञ प्रा. डॉ. जी.के. डोंगरगावकर यांनी येथे केले. मराठीसोबतच पाली भाषेलाही अभिजात भाषेचा दर्जा देण्याच्या निर्णयाचे स्वागत करून त्यांनी केंद्र सरकारला त्याबद्दल धन्यवाद दिले.

राहुल शिक्षण प्रसारक मंडळ या हैद्राबाद मुक्ती संग्राम लढयातील स्वातंत्र्य सैनिकांच्या शिक्षण संस्थेतर्फे ६८ वा धम्मचक्र प्रवर्तन दिन शनिवारी साजरा करण्यात आला. त्यावेळी अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. हा समारंभ खारघरच्या सेक्टर:७ येथील सत्याग्रह महाविदयालयाच्या शांताबाई रामराव सभागृहात पार पडला. यावेळी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते प्रा. प्रवीण मोरे, प्रा. सतीश पवार, ॲड.हर्षल शाक्य, प्राचार्या नेहा राणे आदी मान्यवर उपस्थित होते.



डॉ. डोंगरगावकर आपल्या भाषणात पुढे म्हणाले की, बुध्द धम्माला जागतिक मान्यता आहे. भगवान बुध्द सम्राट अशोक डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि भिक्षु संघाच्या जिवन आणि कार्याचा प्रचंड वारसा आहे. बुध्द धम्म कुशल कर्म आहे. कुशल कर्म करणाऱ्या वैभवशाली परंपरेची ओळख आणि शिकवण करुन देणे हे बौध्दांची जबाबदारी आहे. तथागत बुद्धाचा उपदेश असलेले ' त्रिपिटक ' अभ्यासून कृती आणि आचरणातून बौद्धांनी इतरांनाही सुखी, समृद्ध जीवनासाठी मार्गदर्शन करावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

पाली भाषेचे प्रमूख प्रा. सतीश पवार यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची धर्मांतरामागची भुमीका विषद केली. तर गेल्या ६८ वर्षात शासन ,प्रशासन आणि न्याय व्यवस्थेने सूड उगवणयासाठी धर्मांतरित बौद्धांचा नाना प्रकारे छळ केला आहे, असा स्पष्ट आरोप ॲड. हर्षल शाक्य यांनी केला. या धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या समारंभात दीप प्रज्वलन प्रा. प्रवीण मोरे यांच्या हस्ते करण्यात आले. तर, प्राचार्या नेहा राणे यांनी सुत्रसंचलन केले. प्राचार्या वनिता सुर्यवंशी यांनी आभार मानले.

## महापालिका कार्यक्षेत्रात बेकायदेशीर फलकांविरोधात पालिकेची मोहीम

■ पनवेल



पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रात बेकायदेशीर फलक विरोधात विशेष मोहीम करण्याचे आदेश आयुक्त मंगेश चितळे यांनी दिल्यानंतर आज पनवेल, कामोठे, कळंबोली, खारघर या चारही प्रभागामध्ये सहायक आयुक्तांच्या नेतृत्वाखाली युध्द पातळीवर बेकायदेशीर फलक काढण्यात येत आहेत. बेकायदशीर फलक हटवण्याबाबत सुस्वराज्य फाऊंडेशन या संस्थेने केलेल्या मूळ याचिकेवर मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती अमित बोरकर यांच्या खंडपीठासमोर बुधवार दिनांक 9 ऑक्टोबर रोजी सुनावणी झाली. यावेळी उच्च न्यायालयाने बेकायदशीर फलक हटवण्यासाठी १० दिवसांची विशेष मोहीम हाती घेण्याचे आदेश राज्यातील सर्व महापालिका व नगर परिषदांना न्यायालयाने दिले होते. त्यानूसार आयुक्तांच्या निर्देशानूसार आज पनवेल महानगरपालिका हद्दीतील पनवेल, कामोठे, कळंबोली, खारघर या चारही प्रभागामध्ये सहायक आयुक्तांच्या नेतृत्वाखाली अनधिकृत फलक काढण्यात येत आहेत.

या बेकायदेशीर फलक हटविण्याच्या विशेष मोहिमे दरम्यान मोठे होर्डिंग/बैनर, किऑस्क-युनिपोल होर्डिंग(वीज/दूरध्वनी/सिग्नल चे खांब यावरील),झेंडे, झाडावरील बैनर/पोस्टर्स, कमानी, अनधिकृत लाईटच्या माळा,रस्त्यामधील मंडप, डिव्हायडर मध्ये उभे केलेले कटाउट्स, इतर फलक काढण्यात येत आहेत.

दुपारच्या सत्रात खारघर प्रभाग अ मध्ये सुमारे 44 व नावडे उपविभागांमध्ये 34 बेकायदेशीर फलक काढण्यात आले, पनवेलमध्ये 56 अनधिकृत फलक काढण्यात आले, प्रभाग समिती कामोठे अंतर्गत 18 पोस्टर , 73 बॅनर, 6 कमानी यांच्यावर दुपार पर्यंत कारवाई करण्यात आली तसेच कळंबोलीमध्ये सुमारे 150 अनधिकृत फलक काढण्यात आले.

## सिद्दिकींच्या सुरक्षेची जबाबदारी मुख्यमंत्र्यांची सुद्धा; छगन भुजबळांचा सरकारला घरचा आहेर

प्रतिनिधी
■ येवला

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे नेते बाबा सिद्दिकी यांच्या हत्येवरुन छगन भुजबळ यांनी सरकारला घरचा आहेर दिला आहे. बाबा सिद्दिकी यांच्या सुरक्षेची जबाबदारी फक्त गृहमंत्र्यांची नाही तर मुख्यमंत्र्याची देखील आहे, असे भुजबळ म्हणाले. बाबा सिद्दिकी यांच्या हत्येनंतर विरोधकांकडून सरकारवर टीकेची झोड उठवली जात आहे. अशात छगन भुजबळ यांनीही सरकारला घरचा आहेर दिला आहे. पोलिसांना फ्री हँड दिला पाहिजे, अशी सूचना देखील भुजबळ यांनी दिली आहे. ते नाशिकच्या येवल्यामध्ये प्रसारमाध्यमांशी बोलत होते.



**मुंबई पोलिसांसाठी एक चॅलेंज**

*बाबा सिद्दिकी यांना अनेक वर्षांपासून ओळखत होतो. त्यांना धमकी मिळाल्यानंतर वाय सुरक्षा देण्यात आली होती. पण फक्त सुरक्षा देऊन काही होत नाही. धमकी कोणी दिली याचा तपास करणे गरजेचे होते. भायखळा येथील तालुका प्रमुखांची देखील निघृण हत्या झाली होती. या हत्या म्हणजे मुंबई पोलिसांसाठी एक चॅलेंज आहे, असे छगन भुजबळ म्हणाले.*

छगन भुजबळ म्हणाले, बाबा सिद्दिकी यांची हत्या कॉन्ट्रॅक्ट किलिंग आहे. 10-12 हजारांत पोरं हत्या करतात. पोलिसांना फ्री हँड दिला पाहिजे. मी तुमच्या पाठीमागे उभा राहिल. तुम्ही काय करतात हे मी विचारणार नाही. पण जे कोणी गुन्हेगार आहेत, त्यांची विल्हेवाट लावा. मात्र ही केवळ गृहमंत्र्यांची नाही तर मुख्यमंत्र्यांची देखील जबाबदारी आहे, असे भुजबळ म्हणाले.

पुढे बोलताना भुजबळ म्हणाले, पोलिस खात्यात योग्यप्रकारचे अधिकाऱ्यांची नेमणूक केली पाहिजे. योग्य अधिकारी कोण आहेत, याबाबत वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांना माहिती असते. कुणाला घेतले पाहिजे, कुणाला बाहेर ठेवले पाहिजे, याबाबत त्यांना माहिती असते. त्यांच्यावर आम्ही दबाव आणला, तर पोलिस खाते कसे काम करणार, असा सवाल भुजबळ यांनी केला आहे.

## पंढरपुरातही टोकन दर्शन सुविधा सुरु

**पंढरपूर :** आषाढी यात्रेनंतर येणाऱ्या प्रमुख पंढरपूर यात्रेतील कार्तिकी एकादशी यंदा १२ नोव्हेंबरला होणार आहे. त्या निमित्ताने ४ ते २० नोव्हेंबर या काळात श्री विठ्ठल रुक्मिणीचे २४ तास दर्शन सुरू राहणार आहे; अशी माहिती मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली. पंढरपूरला वर्षभर भाविकांची रीघ सुरु असते. मात्र आषाढी व कार्तिकी एकादशीला पंढरपुरात येणाऱ्या भाविकांची संख्या अधिक असते.

**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

सार्वजनिक बांधकाम विभाग
निविदा सुचना

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील "रेंटल हौसिंग स्किममधील इमारतींची देखभाल व दुरुस्ती" या लेखाशिर्षका अंतर्गत लोकमान्य - सावरकरनगर प्रभाग समिती क्षेत्रातील प्रभाग क्र. १४ मधील दोस्ती रेंटल इमारत क्र. ४ मधील सदनिकांची दुरुस्ती करणे या कामाकरीता ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहे. सदर निविदा प्रक्रियेमध्ये ज्या निविदाकारांवर शासकीय, निमशासकीय, सार्वजनिक उपक्रम, स्थानिक संस्था, महानगर पालिका ई. मार्फत नोंदणी रद्द करणेबाबत / काळ्या यादीत टाकणेबाबत कार्यवाही करण्यात आली आहे अथवा प्रस्तावित आहे अशा निविदाकारांना निविदा भरता येणार नाही. सविस्तर निविदा सुचना व निविदा प्रपत्र ठाणे महानगरपालिकेचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in वर दि. १४.१०.२०२४ ते दि. २१.१०.२०२४ पर्यंत उपलब्ध आहे. ऑनलाईन निविदा महापालिकेचे संकेतस्थळ येथे वर दि.२१.१०.२०२४ रोजी पर्यंत सायं. १६.०० वाजेपर्यंत स्विकारण्यांत येतील. सदर निविदा दि. २३.१०.२०२४ सायं. १६.०० वाजता निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी समक्ष उघड्यात येतील. कोणतीही एक अथवा सर्व निविदा प्रपत्रके कारणे न दाखविता नाकारण्याचा अधिकार नगर अभियंता यांनी राखून ठेवला आहे.

ठामपा/पिआरओ/पिडब्ल्यूडी-लो.सा प्र.स/ ७७०/२०२४-२५ **सही/-**
दि: ११.१०.२०२४
कार्यकारी अभियंता
ठाणे महानगरपालिका, ठाणे

**Pls visit our oficial web-site**
**www.thanecity.gov.in**

# गुरुवर्य गणेश केळकर : वृत्तपत्र लेखक व कार्यकर्त्यांचा वाटाडया

**मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबईचे माजी अध्यक्ष आणि साहित्यिक स्व. गणेश केळकर यांचा रविवारी ७१ वा जन्मदिवस! यनिमित्ताने त्यांच्या विविधांगी कार्यकर्तृत्वाचा घेतलेला आढावा.**



रवींद्र मालुसरे
अध्यक्ष, मराठी वृत्तपत्रलेखक संघ

आता या घटनेला २० वर्षे उलटून गेली आहेत. ८ मे २००४ चा शनिवार, नेहमीप्रमाणे आम्ही मराठी वृत्तपत्र लेखक संघांचे पदाधिकारी आणि नियमित हजेरी लावणारे सभासद दादर पूर्वेकडील शिंदेवाडीच्या कार्यालयात येण्यासाठी आपापल्या कार्यालयातून किंवा घरून शिरस्त्याप्रमाणे निघालो होतो. गणेश केळकरही निघाले होते. संध्याकाळी ६ वा आम्ही कार्यालय उघडायचो....आणि बरोबर त्याच वेळी बातमी आली.. गणेश केळकर यांचे हार्ट अटॅकने निधन झाले. त्यांना अस्वस्थ वाटू लागले म्हणून लोअर परळ स्टेशनवरून ते परत घरी गेले ते संघात परत न येण्यासाठी. कोणत्याही आजाराची पूर्वसूचना न देता केळकर गेले होते. केळकरांच्या निधनाच्या बातमीवर आम्हा सहकाऱ्यांपैकी अखेरपर्यंत कुणाचाच विश्वास बसत नव्हता. प्रत्येकाला ही बातमी खोटी आहे असेच वाटत होते. परंतु... देवाजीच्या मनात काही वेगळेच होते. सतत चैतन्यशील वृत्तीने काम करणाऱ्या, सुपारीच्या खांडाचेही व्यसन नसलेल्या केळकरांचा मृत्यू वयाच्या पन्नाशीत हृदयविकाराने व्हावा याचा आम्हा कार्यकर्त्यांना एक जबरदस्त आघात बसलाहोता. दुर्दैवी योगायोग म्हणजे पत्रलेखन चळवळीत काम करणाऱ्या वृत्तपत्रलेखकांचा शनिवार हा आठवड्यातील एकमेव हक्काचा दिवस. चळवळीवर नितांत प्रेम करणारे बुजुर्ग आणि नवे अशा दोन्ही पिढीतील पत्रलेखक प्रत्येक शनिवारी शिंदेवाडीतील' पत्रलेखक संघात हमखास भेटणार. गेल्या कैक वर्षांचा हा शिरस्ता केळकरांनीही पाळला होता. मात्र ८ मेच्या शनिवारी हा नियम केळकरांनी तोडला. ते संघात आले नाहीत तर कार्यकर्त्यांनाच त्यांच्या घरी जावे लागले. तेही त्यांचे अंतिम दर्शन घेण्यासाठी. नियतीचा हा कोणत्या प्रकारचा योगायोग म्हणायचा?

गणेश केळकरांचा जन्म १३ ऑक्टोबर १९५३ सालचा. वडील लक्ष्मणराव यांचा सामाजिक कार्याचा वसा गणेश केळकरांनी घेतला होता. वरळी येथील गांधीनगर परिसरात त्यांचे बालपण आणि तारुण्य गेले. गांधीनगरमध्ये पूर्वी झोपडपट्टी होती. आता तेथे पक्क्या इमारती उभ्या राहिल्या आहेत.. झोपडपट्टीत आढळणारी असामाजिक तत्त्व गांधीनगरमध्ये देखील होती. पण गणेश केळकर हे अशा अपप्रवृत्तींपासून सदैव दूर राहिले. म्हणूनच समाजात ते चिखलात फुलणाऱ्या कमळासारखे शोभून दिसले. याचे मुख्य कारण त्यांचे वडील लक्ष्मणराव केळकर त्यांनी आपल्या मुलांवर केलेले संस्कार हे होय. लक्ष्मणराव हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे निष्ठावंत कार्यकर्ते आहेत. त्यांच्या विचारांचा वारसा गणेश केळकर यांनी देखील उचलला. पण सामाजिक कार्य करत असताना त्यांनी कधीही राजकारण केले नाही. इन्कम टॅक्समधील नोकरी सांभाळून ते विविध संस्थांच्या माध्यमातून समाजसेवा करीत आले. किंबहुना पूर्णपणे निर्व्यसनी असलेल्या केळकरांना समाजसेवेचे फार मोठे व्यसन होते. मुंबई शहरातील विविध सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमात केळकर सदैव पुढे असलेले दिसत. सकाळी नऊ वाजता घरातून बाहेर पडलेले केळकर रात्री बारानंतरच घरी परतत. ऑफिसचे काम संपवल्यानंतर ते सामाजिक कार्यात रमत. घरचे कार्य असल्याप्रमाणे 'विविध संस्थांच्या कार्यक्रमांमध्ये ते हसतमुखाने वावरत. हे करत असतानाच ते लेखन, वाचन आणि चिंतन करीत. त्यांना लिखाणाची आवड होती. लेख व पत्रलेखनाद्वारे त्यांनी विपुल लिखाण करतानाच जनतेची गाऱ्हाणी व नागरी समस्या प्रभावीपणे मांडल्या.

मुंबईतील सर्वच आघाडीच्या वर्तमानपत्रांमध्ये केळकर यांची शेकडो पत्रे आतापर्यंत प्रसिद्ध झाली आहेत. त्यांची आतापर्यंत ८ हजार पत्रे प्रसिद्ध झाली आहेत. दादर येथील वसंत बुक स्टॉलचे अरविंद तेंडुलकर यांनी त्यांची अनेक पुस्तकें प्रकाशित केली आहेत. याशिवाय त्यांचे 'संसारी वाहे झरा सुखाचा' हे नाटकाचे पुस्तक देखील प्रकाशित झाले आहे. मोत्यांसारखे अक्षर आणि सोपे मराठी हे केळकर यांच्या लेखनाचे वैशिष्ठ्य होते. हिंदू सण आणि उत्सव या त्यांच्या पुस्तकाच्या त्यांच्या हयातीत एकविस आवृत्त्या निघाल्या होत्या. अबालवृद्धांमध्ये हे पुस्तक प्रचंड लोकप्रिय झाले. अमेरिकेतील मराठी माणसांनी तर हे पुस्तक मुंबईतून खास मागवून घेतले. या पुस्तकाव्यतिरिक्त त्यांची इतरही अनेक पुस्तके प्रसिद्ध झाली होती. महिमा सणांचा या दोन आवृत्त्या निघालेल्या त्यांच्या पुस्तकाला महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ठ वाङमयाचा पुरस्कार मिळाला. भारतीय संस्कृती : प्रतिके आणि संस्कार (पाचवी आवृत्ती), प्रार्थना (तृतीय आवृत्ती), सात वार बारा महिने (द्वितीय आवृत्ती), संस्कार महिमा (द्वितीय आवृत्ती) आणि चातुर्मासातील सण - व्रते (द्वितीय आवृत्ती) या त्यांच्या पुस्तकांनी सर्व वयोगटातील वाचकांवर संस्कारांची शिंपण केली. केळकर यांनी जशी धार्मिक पुस्तके लिहिली तशी वीर सावरकर, डॉ. हेडगेवार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या रथीमहारथिंवर आगळीवेगळी पुस्तके संपादीत देखील केली. त्यांनी एकांकीका देखील लिहिल्या आणि आकाशवाणी व दुरदर्शनवर कार्यक्रम देखील केले. त्याचप्रमाणे 'जागरूक 'नागरिक' म्हणून देखील त्यांचा गौरव करण्यात आला होता.

दैनिक मराठा, दैनिक शिवनेर, दैनिक सकाळ, दैनिक नवाकाळ, दैनिक सामना, दैनिक लोकसत्ता, हंटर साप्ताहिक यवतमाळ, कोकण वैभव साप्ताहिक, भक्तिसंगम मासिक आंदींतून त्यांनी विपुल साहित्यलेखन केले आहे. 'साहित्य शतरंग' आणि 'चळवळ' या नियतकालिकांचे त्यांनी संपादन केले होते. मध्यंतरी काही वर्षापूर्वी त्यांनी दैनिक कृषीवलमध्येही लेखन केले होते. मुंबईतील वरळी येथील आचार्य अत्रे यांचा अर्धपुतळा, प्रभादेवी येथील रवींद्र नाट्य मंदिरात आचार्य अत्रे यांचे तैलचित्र लावणे, व्यसनमुक्ती, ग्रंथप्रसार, मराठी वाचवा मराठी - टिकवा अशा चळवळीत त्यांचा सक्रिय सहभाग होता.

सामाजिक, सांस्कृतिक चळवळीत वावरताना कोणत्याही प्रकारचा गाजावाजा न करता काही माणसांची शांतपणे आपले काम करण्याची एक पद्धत असते. मुंबईतील पत्रलेखन चळवळीचे एक अध्वर्यू गणेश केळकर यांनी त्यांच्या पत्रलेखन आणि साहित्य क्षेत्रातील आपल्या तीस वर्षांच्या कारकीर्दीत हे तंत्र कायम जोपासले. मग ते वृत्तपत्रलेखक संघाचे किंवा वरळीच्या प्रगती कला मंडळाचे उपक्रम असोत किंवा सामाजिक, सांस्कृतिक चळवळीतील त्यांचे काम असो. त्यांच्यासोबत 'काम करणाऱ्या आम्हा कार्यकर्त्यांना ही त्यांची कामाची पद्धत माहीत होती.

महाराष्ट्रातील मराठी वृत्तपत्रांतून पत्रलेखन करणाऱ्या पत्रलेखकांची आद्यसंस्था मराठी वृत्तपत्रलेखक संघाशी केळकर जवळपास ३० वर्षे निगडित होते. पत्रलेखक संघ ही त्यांची मातृसंस्था होती. एक सामान्य कार्यकर्ता ते अध्यक्ष अशी वाटचाल त्यांनी केली. स्वभावात जिद्द आणि बंडखोर वृत्ती असल्याने त्यांनी संघाला प्रतिकूल परिस्थितीतून उत्कर्षापर्यंत नेले. या काळात त्यांचे अनेकांशी वादविवाद झाले पण संस्थेपेक्षा व्यक्ती मोठी नाही या त्यांच्या काम करण्याच्या पद्धतीमुळे केळकर टिकून राहिले. सैन्य जसे पोटावर चालते तशी सामाजिक संस्थादेखील आर्थिकदृष्ट्या सक्षम असायला पाहिजे हा ध्यास त्यांनी कायम घेतला. त्यादृष्टीने पावले टाकून विविध माध्यमांतून संघाला स्वतःच्या पायावर आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविले. वृत्तपत्रलेखक संघ ही मुंबईतील जागृत नागरिकांची वैचारिक आणि सांस्कृतिक चळवळ व्हावी हे त्यांचे स्वप्न त्यांच्या हयातीत पूर्ण झाल्याचे समाधान त्यांना लाभले. कार्यकर्त्यांना वेळोवेळी ते तसे सांगतही असत की, मुंबईतील सामाजिक, सांस्कृतिक चळवळींचा इतिहास लिहायचा झाला तर इतिहासकाराला मराठी वृत्तपत्रलेखक संघाला वगळून पुढे जाता येणार नाही. सुदैवाने केळकरांचे हे शब्द आज खरे ठरले आहेत. संघ आज त्या टप्प्यावर पोहोचला आहे. याचे श्रेय नि:संशय संघाच्या जुन्या-जाणत्या कार्यकर्त्यां प्रमाणेच केळकरांनाही जाते. मराठी वृत्तपत्र लेखक संघ आणि गणेश केळकर हे एक अद्वैत होते.

संघ कार्यरत ठेवणे, पत्रलेखकांना प्रतिष्ठाप्राप्त करून देणे नवीन पत्रलेखक तयार करणे व ही पत्रलेखकांची चळवळ अव्याहतपणे सुरू ठेवणे हे ध्येय उराशी बाळगून गणेश केळकरांनी निःस्वार्थीपणे पत्रलेखक संघाची सेवा केली. मी रवींद्र मालुसरे, दत्ताराम घुगे, प्रकाश नागणे, सुनील शिंदे, रोपळेकर, दिलीप ल सावंत, दत्ताराम घुगे, नितीन चव्हाण, मनोहर मांदाडकर, मनोहर साळवी, वसंत हरयाण, रमेश सांगळे, नारायण परब, दिगंबर चव्हाण, सखाराम जाधव, दिलीप अ सावंत, लक्ष्मण कोकाटे, श्रीकांत खांडके,सुरेंद्र देवस्थळी, विजय पवार, नवनाथ दांडेकर असे संघाची धुरा वाहणारे अनेक कार्यकर्ते केळकरांनी तयार केले. वृत्तपत्र लेखक संघाला आज समाजात जो सांस्कृतिक चेहरा प्राप्त झाला आहे त्यामागे केळकरांचे योगदान अश्याप्रकारे मोठे आहे. प्रसंगी स्वतःच्या कौटुंबिक बाबी दूर सारून त्यांनी संघाचे कार्य महत्त्वाचे मानले. त्याची उदाहरणे देण्याची ही जागा नव्हे. मात्र याची जंत्री फार मोठी होईल हे निश्चित...

सोलापूर वृत्तपत्र लेखक संघटनेचे सर्वोत्कृष्ट पत्रलेखनाचे प्रथम पारितोषिक, 'जागरुक नागरिक' व उत्कृष्ट वृत्तपत्र लेखक म्हणून मुंबईच्या विविध संस्था व व्यक्तींनी गणेश केळकरांना सन्मानीत केले होते. मुंबईच्या महापौरांकडून १९७८ व १९८२ साली गौरव, सामाजिक आशयाच्या प्रभावी नाट्याला महाराष्ट्र राज्य दारुबंदी शिक्षण विभागातर्फे नाट्याचार्य खाडिलकर पुरस्कार, श्रमिक सभा यांची नाट्यलेखनाची पारितोषिके, उल्लेखनीय साहित्यसेवेबद्दल स्वातंत्र्यवीर सावरकर वाङ्मय पुरस्कार, मराठी वृत्तपत्र लेखक संघाचा उत्कृष्ट वाड्मय निर्मितीचे 'सृजन साहित्य' पुरस्कार अशी अनेक पारितोषिके त्यांना मिळाली. हिच त्यांची खरी कमाई होती.

सौजन्यमूर्ती म्हणून लक्षात राहिलेल्या अशा गुरुवर्य गणेश केळकर यांचे वयाच्या अवघ्या ५१ व्या वर्षी हृदय विकाराच्या झटक्याने तडकाफडकी अकाली निधन व्हावे हे समाजाचे दुर्दैव होय. गणेश केळकर यांच्या स्मृतीस आमची भावपूर्ण आदरांजली. त्यांच्या निधनाने विविध क्षेत्रात आपल्या कर्तबगारीचा वेगळा ठसा उमटविणारे व्यक्तिमत्व काळाच्या पडद्याआड गेले आणि आता केवळ उरल्या आहेत त्या त्यांच्या आठवणी !

## ई कचऱ्याविषयी जागरुकता हवी



आज १४ ऑक्टोबर, आजचा दिवस संपूर्ण जगात जागतिक ई कचरा दिवस म्हणून साजरा केला जातो. ई कचरा कमी करणे आणि ई कचऱ्याचा पुनर्वापर या बाबत जनजागृती करणे हा या दिवसा मागचा उद्देश आहे. २०१८ साली पहिल्यांदा जागतिक कचरा दिवस साजरा करण्यात आला. पर्यावरण आणि मानवी आरोग्यासाठी धोकादायक असलेला ई कचरा ही जगातील आज सर्वात मोठी समस्या बनली आहे. आपल्या रोजच्या जगण्यामध्ये इलेक्ट्रॉनिक आणि डिजिटल सेवांचा वापर जसा वाढत चालला आहे तसतसा इलेक्ट्रॉनिक वस्तूंचा डोंगरही वाढत चालला आहे. उपयुक्तता संपलेल्या आणि तांत्रिक बिघाडामुळे वापरण्यायोग्य नसलेल्या वस्तू फेकून दिल्या जातात आणि मग त्याचा ई कचरा बनतो. फक्त महाराष्ट्राचा विचार केला तर महाराष्ट्रात दरवर्षी ५० हजार टन हून अधिक ई कचरा जमा होतो तर देशात ५ लाख टन ई कचरा वर्षाला तयार होतो. महाराष्ट्र खालोखाल आंध्र प्रदेश, तामिळनाडू, उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगाल या राज्यात सर्वाधिक ई कचरा तयार होतो. आपल्या देशातच इतका ई कचरा तयार होत असेल तर जगात किती ई कचरा तयार होत असेल याचा विचार न केलेलाच बरा. ई कचऱ्याची समस्या इतकी गंभीरपणे आ वासून उभी असतानाही आपण ई कचऱ्या विषयी जागृत नाही. काहींना तर ई कचरा म्हणजे काय हे देखील माहीत नाही. ई कचरा म्हणजे तुमच्या आमच्या घरातील निकामी झालेल्या किंवा वापरात नसलेल्या इलेक्ट्रॉनिक वस्तू ज्या सहजपणे आपण इतर कचऱ्यासोबत बाहेर फेकतो. या कचऱ्याचा निचरा देखील आपण इतर कचऱ्या प्रमाणेच करतो. घरगुती वापरातील टीव्ही, टेप, रेडिओ, टू इन वन, फ्रिज, मिक्सर, वॉशिंग मशीन, कुलर, एअर कंडिशनर, इलेक्ट्रॉनिक कुकर, मायक्रोव्हेव, ओव्हन, हीटर, पंखे यासारख्या इलेक्ट्रॉनिक वस्तू निकामी झाल्या की त्याला ई कचरा असे संबोधले जाते. यासोबतच महिती तंत्रज्ञान क्षेत्रातील उपकरणे जसे संगणक, लॅपटॉप, टॅब, फोन, मोबाईल, बॅटरी, सर्किट बोर्ड, हार्ड डिस्क, पेन ड्राईव्ह, सिडी, व्ही सिडी यांचा ई कचऱ्यात समावेश होतो. अशा प्रकारे निकामी झालेल्या इलेक्ट्रॉनिक वस्तूंना ई कचरा असे म्हणतात. इलेक्ट्रॉनिक वस्तूंमध्ये भरपूर प्रमाणात सजीवांना अपायकारक घटक असतात. हे अपायकारक घटक पर्यावरणातील हवा, मती आणि पाण्यात मिसळले की सभोतालची हवा, पाणी आणि माती दूषित होती. मोबाईलची किंवा कोणत्याही बॅटरीची निर्मिती शिसे वापरून केली जाते. हे शिसे पावसाच्या पाण्यात झिरपून हवेतील आर्द्रतेमध्ये मिसळून संबंधित हवा, पाणी आणि दूषित होते. अमेरिकेतील एका पर्यावरण संवर्धन संस्थेच्या म्हणण्यानुसार दरवर्षी ३० दशलक्ष संगणक निकामी झाले की फेकून दिले जातात. यापैकी वीस टक्क्यांहून कमी संगणकाचे पूनार्विनिकरण केले जात नाही. युरोपमध्ये तर दरवर्षी सुमारे १०० दशलक्ष फोन फेकून दिले जातात. कालबाह्य ठरलेली, निकामी झालेली ही उपकरणे पर्यावरणातील जागा वेगाने व्यापत आहेत. निष्काळजीपणे फेकलेल्या काही उपकरणांमध्ये बोरोलियम, कॅडीमियम, पारा आणि शिसे यासारखी घातक घटक असतात. या घटकांना वातावरणात संमिश्र होण्यास अवकाश लागत असला तरी खूप जास्त प्रमाणात जेंव्हा हे वातावरणात मिसळले जातात तेंव्हा पर्यावरणाची मोठी हानी होते. एकूणच ई कचऱ्यामुळे पर्यावरणाची मोठी हानी होत आहे. हे लक्षात घेता ई कचऱ्याच्या समस्येवर वेळीच आणि गांभीर्याने विचार करण्याची नितांत गरज आहे. ई कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी विशिष्ट प्रक्रिया अवलंबणे आवश्यक आहे. त्याचा निचरा इतर कचऱ्यासोबत न करता त्याचा निचरा करण्यासाठी भिन्न प्रक्रिया राबवली पाहिजे. ई कचऱ्याचे नियोजन आणि विल्हेवाट लावण्याच्या प्रक्रियेत या कचऱ्याचे संकलन त्याचे रिसायक्लिंग आणि त्याचे मॅन्यूफॅकचरिंग महत्वाचे आहे. त्यासाठी सार्वजनिक व खाजगी क्षेत्राने संयुक्त रुपात पायाभूत सुविधा उभाराव्या लागतील. पर्यावरण मंत्रालयाने सादर केलेल्या ई कचरा व्यवस्थापन नियम २०२२ च्या मसुद्यात ई कचरा व्यवस्थापनामध्ये उत्पादक, पुनर्वापर संस्था आणि संघटना सर्वांची जबाबदारी निश्चित केली गेली आहे. ती जबाबदारी प्रत्येक घटकाने पार पाडल्यास काही प्रमाणात ही समस्या मिटेल.

- श्याम ठाणेदार

## इराणी करंडकावर पुन्हा मुंबईचा 'कब्जा'



सुहास जोशी
ज्येष्ठ क्रीडा पत्रकार

भारतीय क्रिकेट विश्वात प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या इराणी करंडक क्रिकेट स्पर्धेत पुन्हा एकदा तब्बल २७ वर्षांच्या मोठ्या अवधीनंतर बलाढ्य मुंबई संघाने करंडकावर कब्जा करण्याचा पराक्रम केला. लखनऊ येथे झालेल्या शेष भारत विरुद्ध मुंबई यांच्यातील इराणी करंडक सामन्यात मुंबईने पहिल्या डावातील महत्त्वाच्या आघाडीच्या जोरावर जेतेपदावर पुन्हा एकदा नाव कोरले. आपला लढाऊ बाणा आणि खडूस वृत्ती या दोन महत्त्वाच्या बाबींची मुंबई संघाने प्रचिती देत शेष भारत संघावर विजय मिळवण्यात यश मिळवले. २०२४-२५च्या नव्या क्रिकेट मौसमाचा मुंबई संघाने ही स्पर्धाने जिंकून जोरदार शुभारंभ केला. मुंबईने शेवटी १९९७-९८ साली इराणी करंडक ह्या अगोदर जिंकला होता. तेव्हा शेष भारत संघावर मुंबईने ५४ धावांनी निर्णायक विजय मिळवला होता. योगायोग म्हणजे त्यावेळी देखील ५ ऑक्टोबर हीच विजयाच्या दिवशीची तारीख होती. यंदा देखील तोच तारखेचा योग जुळून आला. मुंबईचे या स्पर्धेतील हे १५वे विजेतपद होते. ८ वेळा मुंबईचा संघ ह्या स्पर्धेत उपविजेता राहिला.

सामन्याच्या पहिल्या दिवशी आणि शेवटच्या पाचव्या दिवशी मुंबईचा संघ काहीसा अडचणीत सापडला होता... परंतु दोन्ही दिवशी मुंबईने आपला लढाऊ बाणा दाखवून शेष भारत संघाला जेतेपदापासून दूर ठेवले. शेष भारत संघाचा कर्णधार ऋतुराज गायकवाडने सामन्यातील महत्त्वाची नाणेफेक जिंकली. सामन्याच्या पहिल्या दिवशी वातावरण काहीसे पावसाळी आणि ढगाळ असल्यामुळे गायकवाडने मुंबईला प्रथम फलंदाजीला पाचारण केले. सुरुवातीला त्याचा हा निर्णय काहीसा यशस्वी ठरला. मुंबईची ३ बाद ३७ धावा अशी बिकट अवस्था झाली होती. शॉ ४ धावा, म्हात्रे १९ धावा आणि तामोरे शून्यावर झटपट तंबूत परतले. मग या कठीण समयी कर्णधार अजिंक्य राहणे आणि श्रेयस अय्यर यांनी ४थ्या विकेटसाठी शतकी भागिदारी करून मुंबईचा डाव सावरला. अजिंक्यचे शतक अवघ्या तीन धावांनी हुकले. तर अय्यरला मात्र अर्ध शतक झाल्यानंतर मोठी खेळी करता आली नाही. जानेवारी २०२४ मध्ये आसामविरुद्ध रहाणेने शेवटची प्रथम दर्जाच्या सामन्यातील शतकी खेळी केली होती. त्यानंतर गेले नऊ महिने राहणेला शतक मात्र हुलकावणी देत आहे.

हे दोघे बाद झाल्यानंतर युवा फलंदाज सर्फराझ खानने जबरदस्त नाबाद द्विशतकी खेळी करून मुंबईला पहिल्या डावात ५३७ धावांचा डोंगर उभारू देण्यात मोठी भूमिका बजावली. त्याला तनुष कोटियनने अर्ध शतकी खेळी करून चांगली साथ दिली. इराणी सामन्यात द्विशतक ठोकणारा सर्फराज खान मुंबईचा पहिला फलंदाज ठरला आहे. या अगोदर मुंबईतर्फे सर्वाधिक धावा रामनाथ पारकर यानी केल्या होत्या. त्यानी १९७२ साली पुण्यात झालेल्या सामन्यात १९५ धावांची मोठी खेळी केली होती. सर्फराझ खानने द्विशतकी खेळी करून पारकर यांचा सर्वाधिक धावांचा विक्रम मागे टाकला. सर्फराझ खानने आपल्या नाबाद द्विशतकी खेळी २८६ चेंडूंचा मुकाबला करताना २५ चौकर ठोकून नाबाद २२२ धावा फटकावल्या. शतकाजवळ असताना खानला एकमेव जीवदान मिळाले. याचा अपवाद वगळता त्याने शेष भारत संघाच्या गोलंदाजांना बाद करण्याची एकही संधी दिली नाही. मिळालेल्या जीवदानाचा खानने पुरेपूर फायदा घेतला. लढवय्याला नेहमीच नशिबाची साथ मिळते. तसेच काहीसे सर्फराझ खान बाबत झाले.

शेष भारत संघातर्फे वेगवान गोलंदाज मुकेश कुमारने सुरेख मारा करताना ५ बळी टिपले. मुंबईच्या पहिल्या डावातील ५३७ या धावसंख्येला उत्तर देताना शेष भारत संघाचा पहिला डाव ४१६ धावांवर आटोपला. शेष भारत संघातर्फे सलामीवीर अभिमन्यू ईश्वरनने १९१ धावांची जबरदस्त खेळी करून त्यांच्या पहिल्या डावातील आघाडी घेण्याच्या आशा पल्लवीत केल्या होत्या. त्यानी ध्रुव जुरेलसोबत ५व्या विकेटसाठी शतकी भागीदारी करून शेष भारताची झुंज कायम ठेवली. परंतु तळाच्या फलंदाजांनी निराशा केल्यामुळे शेष भारत संघ पहिल्या डावात आघाडीपासून वंचित राहिला. ५ बाद ३९३ धावा अश्या सुस्थितित असलेला शेष भारत संघ मुंबईची मोठी धावसंख्या ओलांडणार असे काहीसे चित्र सामन्याच्या ४थ्या दिवशी निर्माण झाले होते. परंतु ईश्वरन (१९१ धावा), जुरेल (९३ धावा) हे दोघे धोकादायक फलंदाज परतल्यानंतर शेष भारत संघाचा डाव पत्त्याच्या बंगल्या प्रमाणे कोसळला. अवघ्या २३ धावात त्यांचे ५ फलंदाज माघारी परतले.

फिरकी गोलंदाज मुलानीने ईश्वरन आणि जुरेल यांचे महत्त्वाचे बळी घेऊन मुंबईला पहिल्या डावात आघाडी मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. जम बसलेल्या ईश्वरन, जुरेल यांनी कारण नसताना स्वीप फटका मारण्याची जोखीम घेतली तिच त्यांच्या अंगलट आली. कर्णधार ऋतुराज गायकवाड मात्र या लढतीत मोठी खेळी करू शकला नाही. तो अवघ्या ९ धावा काढून बाद झाला. ईश्वरनचे हे प्रथम दर्जाच्या सामन्यातील २६वे शतक होते. या स्पर्धे अगोदर झालेल्या दुलीप करंडक क्रिकेट स्पर्धेत ईश्वरनने २ दमदार शतके काढली होती. २०१३ साली प. बंगालतर्फे पदार्पण करणारा ईश्वरन सातत्याने धावा करत असून भारतीय संघाचे तो दार ठोठावत आहे. मुंबईतर्फे मुलानी आणि कोटीयनने प्रत्येकी ३ बळी घेतले तर अवस्थीला २ बळी मिळाले. सामन्यातील शेवटच्या दिवशी मुंबईची सकाळी ८ बाद १७१ धावा अशी काहीशी बिकट अवस्था झाली होती. सलामीवीर शॉने ७६ धावांची झटपट खेळी करून मुंबईला चांगली सुरुवात करुन दिली होती. परंतु तो बाद झाल्यानंतर मुंबईचे फलंदाज झटपट माघारी परतले. त्यावेळी मुंबईचा संघ अडचणीत असताना तनुष कोटीयन आणि मोहित अवस्थी या दोघांनी मुंबईची पडझड रोखली. या दोघांनी ९व्या विकेटसाठी १५८ धावांची भागिदारी करून नवा विक्रम केला. या स्पर्धेच्या इतिहासात ही आजवरची नव्या विकेटसाठीची सर्वात मोठी भागिदारी होती. तनुषने शानदार शतक ठोकले. तर मोहितने अर्ध शतकी खेळी केली. शेष भारत संघाचा फिरकी गोलंदाज सरनेश जैनने ६ बळी घेऊन आपली चुणुक दाखवली.

अभिमन्यू ईश्वरनप्रमाणेच मुलाणी, कोटीयन हे दोघे देखील मुंबईचे युवा खेळाडू भारतीय संघात स्थान मिळविण्यासाठी जोरदार प्रयत्न करत आहेत. या अगोदर झालेल्या दुलीप करंडक स्पर्धेत मुलानीने अष्टपैलू खेळ करून भारतीय 'अ' संघाच्या विजयात मोठी भूमिका बजावली होती. वेगवान गोलंदाज जुनैद खान याचा देखील मुंबई संघात समावेश होता. जुनैद हा मुळचा उत्तर प्रदेशचा परंतु मुंबई आपली क्रिकेट कारकीर्द घडविण्यासाठी २०१४मध्ये तो आला. सुरुवातीच्या काळात अंधेरीच्या एका जिन्स कंपनीत तो हेल्पर म्हणून कामाला लागला. त्यानंतर तो रिक्षादेखील चालवत असे. २०१९ मध्ये तो वांद्रे येथील संजीवनी क्रिकेट अकादमीत दाखल झाला. येथूनच त्याची खऱ्या अर्थाने क्रिकेट कारकिर्द सुरु झाली. पोलीस ढाल क्रिकेट स्पर्धेच्या वेळी अभिषेक नायर यांच्या नजरेस जुनैद पडला. मग त्यांच्या मार्गदर्शनामुळेच त्याने मुंबई क्रिकेट संघात स्थान मिळवण्यात यश मिळवले. आयपीएलमधील कोलकता शिबिराच्या सराव शिबिरामध्ये देखील त्याची निवड झाली होती. आजही वांद्रे येथील चाळीत जुनैद राहतो. एकूण ६ जण घरात राहतात. मोहम्मद शमीला आदर्श मानणाऱ्या जुनैदला आता भविष्यात भारतीय संघात स्थान मिळवायचे आहे.

१९५९-६० साली इराणी चषक सामन्याला सुरुवात झाली. यंदाची या स्पर्धेची ६१वी लढत होती. पहिल्या चार लढतीत मुंबईने बाजी मारली होती. मुंबईचेच या करंडकावर वर्चस्व राहिले असून त्यांनी सर्वाधिक जास्त १६ वेळा ही स्पर्धा जिंकली आहे. २०१५-१६ नंतर पुन्हा एकदा या सामन्यासाठी मुंबई संघ प्राप्त ठरला होता. या स्पर्धेत वासिम झाफरने सर्वाधिक १२९४ धावा केल्या आहेत. तर मुंबईचे महान फिरकी गोलंदाज पद्माकर शिवलकर यांनी सर्वाधिक ५१ बळी घेतले आहेत. कर्णधार अजिंक्य रहाणेने रणजी करंडका पाठोपाठ इराणी करंडक जिंकून देऊन मुंबईला शानदार दुहेरी यश मिळवून दिले आहे. आता लवकरच सुरु होणाऱ्या नव्या क्रिकेट मोसमात मुंबई क्रिकेट संघाची विजयी दौड अशीच कायम राहिल अशी आशा संघाचे तमाम चाहते करत असतील.

# राज्य बेंचप्रेस पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत रायगडचे खेळाडू चमकले

**मुंबई :** वडाळा येथे झालेल्या राज्य बेंचप्रेस क्लासिक पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत रायगडच्या खेळाडूंनी चमकदार कामगिरी करताना ११ सुवर्ण, १० रौप्य, ७ कांस्य अशी एकूण २८ पदकांची कमाई केली. सब ज्युनिअर मुलींच्या गटात नंदिनी ऊपर बॉडी लाईन जिम खोपोली ही "स्ट्रॉंग वुमन" या किताबाची मानकरी झाली. जूनियर क्लासिक "स्ट्रॉंग मॅन" हा किताब संसारे जिमच्या तन्मय पाटीलने मिळवला. तर सीनियर इक्विप १०५ किलो वजनी गटात फिटनेस ऑन जिम, पनवेलचा गणेश तोटे विजेता झाला. रायगडला दोन सांघिक विजेतेपद पुरुष ज्युनिअर आणि महिला ज्युनिअरची मिळाली. तसेच क्लासिक स्पर्धेत सीनियर आणि मास्टर पुरुष गटाचे उपविजेतेपद देखील मिळाले. पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोसिएशन, रायगडचे अध्यक्ष गिरीश वेदक यांनी सर्व पदक विजेत्या खेळाडूंचे खास अभिनंदन केले आहे. रायगड संघाचे प्रशिक्षक म्हणून अरुण पाटकर, संघ व्यवस्थापक सुभाष टेंबे, सहाय्यक म्हणून संदीप कृष्णा पाटकर यांच्याकडे जबाबदारी देण्यात आली होती.



# षष्ठ्यब्दीपूर्तीनिमित्त सुनिता चव्हाण यांच्या क्रीडा कार्याचा गौरव




प्रतिनिधी
■ मुंबई

आयडियल स्पोर्ट्स अकॅडमी-ग्रुप तर्फे आतापर्यंत यशस्वीपणे साकारलेल्या ९९ बुध्दिबळ स्पर्धा, ४१ कबड्डी स्पर्धा, ८६ क्रिकेट स्पर्धा, ६५ कॅरम स्पर्धा, २२ शरीरसौष्ठव स्पर्धा, २१ व्यायाम स्पर्धा, ७ खोखो स्पर्धा, ४१ क्रीडा प्रशिक्षण शिबीर आदी उपक्रमामध्ये क्रीडाप्रेमींचा मोलाचा वाटा होता. त्यामध्ये उपक्रमा अनुषंगाने बॅकस्टेज सांभाळणाऱ्या आयडियल स्पोर्ट्स अकॅडमीच्या महिला क्रीडा विभाग प्रमुख सुनिता चव्हाण यांच्या कार्याचा सहभाग देखील महत्वाचा होता. म्हणूनच आयडियल स्पोर्ट्स अकॅडमीतर्फे सुनिता चव्हाण यांच्या षष्ठ्यब्दीपूर्तीचे औचित्य साधून नुकताच माजी नगरपाल व लायन्स डीस्ट्रीक्ट गव्हर्नर डॉ. जगन्नाथराव हेगडे यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व सुवर्ण गौरवचिन्ह प्रदान करून क्रीडा कार्याचा सन्मान करण्यात आला. नुकतीच पार पडलेली राज्य स्तरावरील शालेय ६० मुलींची मोफत कॅरम स्पर्धा ही सुनिता चव्हाण यांच्या क्रीडा कार्याची पोचपावती ठरली.

आयडियल स्पोर्ट्स अकॅडमीतर्फे मागील तीन महिन्यात झालेल्या पाचपैकी तीन शालेय विनाशुल्क कॅरम स्पर्धेत काही तांत्रिक अडचणींमुळे फक्त मुलांची स्पर्धा घेण्यात आली. त्यामुळे स्पर्धांपासून वंचित झालेल्या ३१ मुलींनी स्पर्धेसाठी जोरदार मागणी केली. परिणामी कार्यालयीन कॅरम स्पर्धेत उल्लेखनीय खेळ करणाऱ्या महिला क्रीडा विभाग प्रमुख सुनिता चव्हाण यांनी स्वतःच्या आईच्या स्मरणार्थ आयडियलमार्फत फक्त मुलींसाठी क्रीडाप्रेमी स्व. कमलाबाई कडवे स्मृती विनाशुल्क कॅरम स्पर्धा आयोजित केली. त्यांच्या सक्रीय मार्गदर्शनामुळे आरएमएमएस सहकार्यीत राष्ट्रीय स्तर गाजविणाऱ्या राज्यातील सबज्युनियर कॅरमपटूसह शालेय ६० मुलींच्या सहभागाने यशस्वी झालेली आंतर शालेय मुलींची विनाशुल्क कॅरम स्पर्धा रंगली.

परेल येथील स्पर्धेमध्ये सिध्देश्वर इंग्लिश मिडीयम स्कूल-पुण्याच्या तनया पाटीलने अंतिम विजेतेपद तर आर.बी. शिर्के हायस्कूल-रत्नागिरीच्या स्वरा कदमने अंतिम उपविजेतेपद पटकाविले. पहिल्या १६ विजेत्या-उपविजेत्यांना पुरस्कारासह गौरविण्यात आले. केवळ मुलींसाठी चॅम्पियन कॅरम सेटवर मोफत स्पर्धा आयोजित केल्याबद्दल राज्यातील पालक-शिक्षक वर्ग, खेळाडू यांनी सेवाभावी कार्याचे विशेष कौतुक करीत मुलींच्या स्पर्धेचे सातत्य राखण्याचे आवाहन केले.

# अहिका-सुतीर्थाने आशियाई टेबल टेनिसमध्ये जिंकले कांस्यपदक

## स्पर्धेच्या 52 वर्षांच्या इतिहासात प्रथमच भारताला महिला दुहेरीत पदक

वृत्तसंस्था
■ अस्ताना

भारतीय टेबलटेनिसपटू हिका मुखर्जी आणि सुतीर्था मुखर्जी यांनी आशियाई टेबल टेनिस चॅम्पियनशिपच्या महिला दुहेरी गटात कांस्यपदक जिंकले आहे. या स्पर्धेच्या 52 वर्षांच्या इतिहासात भारताला सांघिक स्पर्धेव्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रकारात पदक मिळण्याची ही पहिलीच वेळ आहे.

रविवारी कझाकस्तानमधील अस्ताना येथे खेळल्या जात असलेल्या चॅम्पियनशिपमध्ये भारतीय जोडीला उपांत्य फेरीच्या सामन्यात जपानच्या मिवा हरिमोटो आणि मियू किहारा या जोडीकडून 0-3 असा पराभव स्वीकारावा लागला. त्यामुळे भारतीय जोडीला कांस्यपदकावर समाधान मानावे लागले. 1972 पासून आशियाई टेबल टेनिस असोसिएशनद्वारे ही स्पर्धा आयोजित केली जाते. यापूर्वी आशियातील टेबल टेनिस महासंघ या स्पर्धेचे आयोजन करत आहे. ही स्पर्धा 1952 मध्ये झाली.



**उपांत्यपूर्व फेरीत दक्षिण कोरियाचा पराभव केला**

*भारतीय जोडीने उपांत्यपूर्व फेरीत पॅरिस ऑलिम्पिक कांस्यपदक विजेत्या दक्षिण कोरियाच्या किम नयोंग आणि ली युन्हाई जोडीचा 3-1 असा पराभव केला. सुतीर्था आणि अहिका यांनी पॅरिस ऑलिम्पिकमधील कांस्यपदक विजेत्या दक्षिण कोरियाच्या जोडीचा 10-12, 11-7, 11-9, 11-8 असा पराभव केला.*

उपांत्य फेरीत सुतीर्थ मुखर्जी आणि अहिका या भारतीय जोडीला सलग तीन गेममध्ये पराभवाला सामोरे जावे लागले. जपानी जोडीने पहिला गेम 11-4 असा जिंकला. ०-१ ने पिछाडीवर पडल्यानंतर भारतीय पॅडलर्सनी पुनरागमन करण्याचा प्रयत्न केला, मात्र तसे झाले नाही. दुसऱ्या आणि तिसऱ्या गेममध्ये भारताचा 9-11, 9-11 असा पराभव झाला.

# दिनेश पवार यांना सुवर्णपदक

प्रतिनिधी
■ मुंबई

द.आफ्रिका येथे सन सिटी या शहरांमध्ये झालेल्या कॉमनवेल्थ क्लासिक आणि इक्विप्ड बेंचप्रेस स्पर्धेत मास्टर१ (४० वर्षावरील पुरुष) या गटात 75 किलो वजनी गटात रायगडच्या "दिनेश हरिचंद्र पवार'यांनी सुवर्णपदक मिळविले.

दिनेश पवार हे महड येथील रहिवासी असून खालापूर येथील स्पार्टन जिम मध्ये सराव करतात. यापूर्वी सुद्धा त्यांनी आंतरराष्ट्रीय स्पर्धेत पदक जिंकली आहेत. दिनेश पवार यांच्या यशात त्यांच्या मातोश्री गीता हरिचंद्र पवार आणि पत्नी रेशमा दिनेश पवार यांचा देखील मोठा वाटा आहे.

पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स



असोसिएशन रायगड चे अध्यक्ष गिरीश वेदक यांनी पवार यांचे खास अभिनंदन केले आहे. महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंग असोसिएशनचे सचिव संजय प्रतापराव सरदेसाई यांचे सुद्धा मार्गदर्शन पवार यांना मिळाले.

# अजय जाडेजा जामनगरचे 'जाम साहेब'

**जामनगर :** गुजरातमधील जामनगर येथील जाम साहेब शत्रुशल्य सिंगजी यांनी त्यांच्या राजघराण्याचा वारस घोषित केला आहे. त्यांनी आपला उत्तराधिकारी म्हणून माजी भारतीय क्रिकेटपटू अजय जाडेजा यांची निवड केली आहे. शत्रुशल्य सिंघीजी म्हणाले, अजय जाडेजा नवानगरचा नवा जाम साहेब होणार याचा मला आनंद आहे. सध्या जाम साहेब शत्रुशल्य सिंहजी यांना मूलबाळ नाही. या कारणास्तव त्यांना आपला उत्तराधिकारी निवडावा लागला. त्यांनी अजय जाडेजाची निवड केली. जाम साहेब शत्रुशल्य सिंघजी यांचे वडील दिग्विजय सिंह होते. त्यांनी 33 वर्षे जाम साहेबांचे पद भूषवले. त्यांचे काका रणजितसिंगजी यांनी त्यांना दत्तक घेऊन त्यांचा वारस बनवला.

# शिवनेरी सेवा मंडळ कबड्डी नवोदित संघ, शिवमुद्रा प्रतिष्ठान कुमार गटाच्या अंतिम फेरीत

## गतविजेत्या भारत पेट्रोलियमसह इन्शोअर कोट; न्यू इंडिया एन्शो; रिझर्व्ह बँक उपांत्य फेरीत

प्रतिनिधी
■ मुंबई

नवोदित संघ, शिवमुद्रा प्रतिष्ठान यांनी शिवनेरी सेवा मंडळाने आयोजित केलेल्या कुमार गट कबड्डी स्पर्धेच्या अंतिम फेरीत धडक दिली. विशेष व्यावसायिक गटात गतविजेत्या भारत पेट्रोलियमसह इन्शोअर कोट, न्यू इंडिया एन्शो; रिझर्व्ह बँक यांनी उपांत्य फेरी गाठली. दादर(पूर्व) शिंदेवाडी येथील भवानीमाता क्रीडांगणावर सुरू असलेल्या कुमार गटाच्या उपांत्य सामन्यात नवोदित संघाने काळाचौकीच्या अमर मंडळाला ४३-२६ असे सहज नमविले. पहिल्या डावात २लोण देत २४-०८ अशी भक्कम आघाडी घेणाऱ्या नवोदितने दुसऱ्या डावात सावध खेळ करीत आपला विजय साकारला.



अथर्व सुवर्णा, शौर्य धुरी यांच्या चतुरस्त्र खेळाला या विजयाचे श्रेय जाते. दुसऱ्या डावात अमरच्या रोहित शिंदेने कडवी लढत देत पराभवतील अंतर कमी केले. दुसऱ्या उपांत्य सामन्यात शिवमुद्रा प्रतिष्ठानने विजय क्लबवर ३५-१४ अशी लीलया मात केली. विशाल लाड, आर्णव हातकर यांच्या पूर्वार्धातील झंझावाती खेळाने शिवमुद्राने विजयवर ३लोण देत २८-०१ अशी महत्वपूर्ण आघाडी घेतली. उत्तरार्धात विजयच्या आरिफ शेखने बऱ्यापैकी प्रतिकार करीत एक लोण परतविण्यात यश मिळविले. पण संघाचा पराभव टाळण्यात तो अपयशी ठरला. विशेष व्यावसायिक गटाच्या उपांत्यपूर्व सामन्यात भारत पेट्रोलियमने युनियन बँकेचा २६-१४ असा पराभव केला. आकाश अरसुळ, आकाश गायकवाड यांच्या चढाई पकडीच्या खेळाला या विजयाचे श्रेय जाते. दुसऱ्या सामन्यात इन्शोअर कोटने चुरशीच्या लढतीत २७-२२ असे नमवित आगेकूच केली. राकेश, विनीत इन्शोअर कोटकडून, तर अक्षय तावडे, सुशांत साईल मुंबई कस्टम कडून उत्कृष्ट खेळले.

रिझर्व्ह बँकेने बलाढ्य मुंबई पोलीस संघाचा प्रतिकार २४-१५ असा मोडून काढला. विश्रांती पर्यंत दोन्ही संघानी एकमेकांना अजमाविण्यात वेळ घेतल्याने गुण फलक ८-८ अशा बरोबरीत होता. नंतर मात्र रिझर्व्ह बँकेच्या तुषार शिंदे, यश राक्षेने आपला खेळ उंचावित ९गुणांनी बँकेच्या गळयात विजयाची माळ घातली. पोलीस संघाचा हनुमंत गर्जे एकाकी लढला. न्यू इंडिया एशोरंस् ने मुंबई पोष्टलचा प्रतिकार २४-१८ असा मोडून काढला. पूर्वार्धात ०९-११ अशा पिछाडीवर पडलेल्या न्यू इंडियाने उत्तरार्धात मात्र गतिमान खेळ करीत हा विजय साकारला. या अगोदर झालेल्या उपउपांत्यपूर्व सामन्यात मुंबई कस्टमने मध्य रेल्वेला २५-१६, न्यू इंडियाने सेंट्रल बँकेला २४-१५, युनियन बँकेने हिंदुजाला २५-१७, इन्शोअर कोटने बेस्टला ४०-२१, रिझर्व्ह बँकेने मध्य रेल्वे माटुंगा ला २२-१७, तर मुंबई पोष्टलने रुबीचा ३६-१९ असा पराभव करीत उपांत्यपूर्व फेरी गाठली होती.

# गोरेगावमधील एमएमआरडीएच्या प्रकल्पबाधितांना न्याय द्या!

## दलालबाधित रहिवाशांचे एमएमआरडी आयुक्तांना साकडे

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) तर्फे प्रकल्पबाधित लोकांसाठी राम मंदिर गोरेगाव (पश्चिम) येथे सदनिका (घरे) बांधल्या आहेत. संबंधित अधिकारी व दलाल (मध्यस्थी) यांच्या संगनमताने भ्रष्टाचार करण्यात आल्याचा आरोप काँग्रेसतर्फे करण्यात आला आहे. याबाबत खासदार काँग्रेस मुंबई अध्यक्षा वर्षा गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली उपाध्यक्षा माधवी राणे यांनी आयुक्त संजय मुखर्जी व अतिरिक्त आयुक्त विक्रम कुमार यांच्याकडे चौकशी करण्याची मागणी करणारे निवेदन दिले होते. त्यानंतर आयुक्तांनी सदर मागण्याची गंभीर दखल घेत चौकशी करण्याचे आदेश दिले होते. यासंदर्भात अतिरिक्त आयुक्त विक्रम कुमार यांनी तात्काळ प्रकल्पबाधित व काँग्रेस पदाधिकाऱ्यांशी चर्चा केली होती. त्यामुळे गोरेगावमधील एमएमआरडीएच्या



अतिरिक्त आयुक्त विक्रम कुमार



प्रकल्पबाधितांना अतिरिक्त आयुक्त न्याय द्या, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

भिवंडी-ठाणे- कल्याण प्रकल्पबाधित पंधरा ते वीस लोकांना दलालांच्या सहाय्याने सिग्मा 1 मध्ये सदनिका देणार असल्याचे समजते. परंतु ठाणेमधील प्रकल्पबाधित लोकांना त्याच परिसरात घरे देण्यात यावी. तसे न केल्यास आम्ही हा प्रयत्न हाणून पाडू, असा इशारा काँग्रेसच्या मुंबई महिला उपाध्यक्षा माधवी राणे व गौरव राणे यांनी केली आहे.

गोरेगाव पश्चिम येथील राम मंदिरच्या ओशिवरा जिल्हा केंद्र (ओडीसी) येथे एमएमआरडीएतर्फे प्रकल्पबाधित व जवळच असलेल्या धोकादायक स्थितीत असलेल्या पी 5 मधील रहिवाशांना सिग्मा 1 इमारतीमध्ये हलवण्याचा निर्णय तत्कालीन आयुक्त व उपायुक्तांनी घेतला होता. परंतु या निर्णयाची अंमलबजावणी न करता दलाल व अधिकाऱ्यांनी 105, 205, 305, 405, 505, 605, 705, 1005 ही घरे विकली आहेत. कायद्यानुसार ही घरे विकू शकत नाही. दरम्यान, सर्वसामान्यांच्या करातून उभारणाऱ्या एमएमआरडीच्या इमारतीतील घरे विकून दलालानी शासनाची फसवणूक केली आहे. दरम्यान, सिग्मा 1 या इमारतीमध्ये चार ते पाच एजंटची घरे असून 40 ते 50 लाखाला ती घरे विकणार असल्याचे समजते. या सर्व घरांचा पंचनामा करावा, अशीही मागणी काँग्रेसतर्फे करण्यात आली आहे. दरम्यान, प्रकल्पबाधित लोकांसाठी बांधलेल्या सिग्मा 1 इमारतीतील घरे ज्या लोकांना अलॉटमेंट झाली आहेत, ते सर्वजण बोगस असल्याचा आरोपही काँग्रेसतर्फे करण्यात आला आहे.

# दिंडोशीत आमदार राजहंस सिंह यांनी केले 15 विकास कामांचे भूमिपूजन

प्रतिनिधी
■ मुंबई

आमदार राजहंस सिंह यांनी रविवारी दिंडोशी विधानसभा परिसरात १५ ठिकाणी आमदार निधीच्या माध्यमातून होणाऱ्या मैदान सौदर्यीकरण, गटारे, लादीकरण, काँक्रीटीकरण, शौचालय नूतनीकरण इत्यादी नागरी सुविधा कामांचे भूमिपूजन केले.

मालाड (पूर्व) येथील दिंडोशी विधानसभेच्या प्रभाग क्र. 40,42,43,44 मधील रामलीला मैदान (पं. इंद्रदेव मिश्र मैदान) - इंदिरा नगर, सोनू कंपाऊंड, पाल नगर, पिंपरी पाडा, संजय नगर, मावले नगर, पठाणवाड़ी, कोकणी पाड़ा इत्यादी ठिकाणी नागरी



कामांचे नारळ वाढवून भूमिपूजन करण्यात आले.

याप्रसंगी मुंबई सचिव ग्यानमूर्ती शर्मा, मंडळ अध्यक्ष राजन सिंह, मा.नगरसेविका संगीता शर्मा सहित दिंडोशीमधील सर्व भाजपा महामंत्री, वॉर्ड अध्यक्ष, पदाधिकारी तसेच महिला व युवा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्वानंद बाबा आश्रमात नवरात्रोत्सावाचा भव्य सोहळा



प्रतिनिधी
■ मुंबई

पू. स्वानंद बाबा सेवा ट्रस्ट तर्फे ठाणे, येऊर हिल्स येथील प.पू. स्वानंद बाबा आश्रमात नवरात्रोत्सवाचा भव्य सोहळा आयोजित करण्यात आला होता. सकाळच्या सत्रात कन्या पूजन कार्यक्रमाची करण्यात आला. यावेळी भजन सादर करण्यात आले. महाभंडारामध्ये हजारो भाविक सहभागी झाले होते. यावेळी पं.दुर्गाप्रसाद पाठक, प्रेम शुक्ला, शांती शुक्ला यांनी सर्वांचे स्वागत केले.

यावेळी अभिनेते सानंद वर्मा, आरटीआय कार्यकर्ते अनिल गलगली, मुंबई भाजपचे प्रवक्ते उदय प्रताप सिंह, अभिनेते राजकुमार मिश्रा, मुंबई हिंदी पत्रकार संघाचे अध्यक्ष आदित्य दुबे, अनिल शुक्ला, राजेश विक्रांत, वीरेंद्र मिश्रा, शेषनारायण त्रिपाठी, राकेश पांडे, अनिल पांडे, अमरदेव मिश्रा, सरताज मेहंदी, धीरज मिश्रा, दिलीप सिंह, शिवसेना संघटक गुलाब दुबे, एड चंद्रभूषण मिश्रा, एड विजय पांडे, घनश्याम मौर्य, हिमांशु सिंह, संजय धवन, देव पाठक, महेश शर्मा, संतोष तिवारी, अशोक यादव, अनिल बारी, शिवसागर मिश्रा, योगेश शुक्ला, राजेश राज, गामा मिश्रा, रवि सिंह आदिसह अन्य मान्यवर उपस्थित होते.

# प्रज्ञा, शिल, करुणा या मुल्यांकडे लक्ष देण्याची आवश्यकता - आयएएस प्रेरणा देशभ्रतार

प्रतिनिधी
■ मुंबई

जगात अनेक प्रकारच्या हिंसक क्रांत्या झाल्या, पण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्वच क्रांत्या शांततेच्या मार्गाने केल्या. त्यांनी सतत हिंसा टाळण्यात यश मिळवले आणि सर्वांना विशेषतः महिलांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून दिली.सत्तरच्या दशकात तर दलितांवर प्रचंड अन्याय झाला, त्याला विरोध करण्यासाठी पँथर चळवळ उभी राहिली, त्यातून दलित साहित्य मोठ्या प्रमाणात प्रकाशित होऊ लागले. आज दलित साहित्याला जागतिक पातळीवर मान्यता मिळत आहे.प्रज्ञा, शील, करूणा या मूल्यांकडे लक्ष देणे आवश्यक आहे. तसेच उद्योजकता वाढवून आर्थिक विकास साधावा लागेल, असे प्रतिपादन आय.ए.एस व सहआयुक्त राज्य कर तपासणी प्रेरणा देशभ्रतार यांनी केले.




देशभ्रतार कर्मवीर दादासाहेब गायकवाड सांस्कृतिक केंद्र, चार बंगला, अंधेरी येथे 68 व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या सोहळयात बोलत होत्या. अध्यक्षस्थानी विजय जाधव होते. विचार पीठावर नितिन सोनावणे (उपाध्यक्ष), चंद्रकांत बच्छाव (सरचिटणीस), रत्नाकर रिपोटे (चिटणीस) उपस्थित होते.

सुरुवातीला चंद्रकांत बच्छाव यांनी उद्योजक रतन टाटा यांच्या दुःखद निधनाचा ठराव मांडून त्यांना दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली वाहण्यात आली. संस्थेच्या वतीने 2017 मध्ये उद्योजक कार्यशाळा आयोजित केली असता उद्योजक रतन टाटा यांच्याशी संपर्क साधला होता. त्यांनी टाटा पॉवर कंपनी चे चेअरमन रंजित देसाई व प्रशांत कोकीळ यांना पाठविले होते.अशी आठवण त्यांनी यावेळी सांगितली

प्रेरणा देशभ्रतार पुढे म्हणाल्या की, त्या काळी वंचित समाजाची बारा बलुतेदारांमध्ये विभागणी झाली होती. परंतु, पुढे जातीय वर्गवारीमुळे या बलुतेदारांचे शोषण व भेदभाव करण्यात आला. हा अन्याय स्वतः डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ही अनुभवला आणि त्यामुळेच त्यांनी संघर्ष व चळवळी सुरू केल्या. त्याचा परिणाम म्हणून आज आपण सुस्थितीत आणि सन्मानाने जीवन जगत आहोत.




***मुंबई :** मुंबई - उत्तर मुंबईत क्रीडा संकुल बांधण्यासाठी महाराष्ट्र सरकार आणि SAI यांच्यात झालेल्या सामंजस्य करारावर नुकत्याच केंद्रीय वाणिज्य आणि उद्योगमंत्री पियुष गोयल यांच्या उपस्थितीत स्वाक्षऱया झाल्या. कांदिवलीत पार पडलेल्या या सोहळ्यात राज्याचे नाव उज्वल करणारे क्रीडा प्रशिक्षक आणि क्रीडापटूंचा केंद्रीय मंत्री गोयल यांच्या हस्ते सन्मान करण्यात आले. सन्मान करण्यात आलेल्या प्रशिक्षकांत ज्येष्ठ कबड्डी संघटक अनिल घाटे यांचाही समावेश होता. या सोहळ्यास आमदार प्रवीण दरेकर आणि अतुल भातखळकर हे मान्यवरही उपस्थित होते.*

# आयबीबी क्रोनिकल्सच्या अर्चना जैन यांच्या ग्लोबल फॅशन परेडचे आयोजन



■ मुंबई

आयबीबी क्रोनिकल्सच्या अर्चना जैन यांनी आयोजित केलेली ग्लोबल फॅशन परेड मुंबईच्या सेंट रेजिस हॉटेलमध्ये पार पडली. आर्ट मीडिया ॲड्स प्रायव्हेट लिमिटेड प्रस्तुत केलेल्या या फॅशन परेड मध्ये शायना एनसी, सीमा सिंह, अनिल काशी मुरारका, श्याम सिंघानिया, महेश पाटील आणि अर्चना जैन यांच्यासह अनेक सेलिब्रिटींनी हजेरी लावली आणि दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन केले. प्रियांशू चॅटर्जी, बिग बॉस फेम अर्चना गौतम, मोनालिसा, अनुस्मृती सरकार, विश्वजीत प्रधान, दक्ष सेठी, हॅरी आनंद, खालिद सिद्दीकी, उमेश फिरवानी आणि एकता जैन सारखे स्टार्सही या कार्यक्रमात उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सिमरन आहुजा यांनी केले, तर कार्यक्रमाचे दिग्दर्शन शाई लोबो यांनी केले.

ग्लोबल फॅशन परेड 2024 मध्ये चार शो झाले. पहिला शो स्टाइल कास्टी (वामिका लुथिया ज्वेलरी) साठी होता. जिथे मोनालिसा, दक्ष सेठी आणि विश्वजीत प्रधान शोस्टॉपर्स होते. लुब्धा रितेश पोरवाल यांनी सादर केलेला मीट आणि ग्रीट फाऊंडेशनचा दुसरा शो होता, ज्यामध्ये दिव्या पोरवाल यांनी कार्यक्रमाचे उद्घाटन केले आणि अर्चना गौतम, अनुस्मृती सरकार आणि दक्ष सेठी हे शोस्टॉपर्स होते. तिसरा शो ओशी डायमंड्सचा होता, ज्यामध्ये सिमरन आहुजा आणि दक्ष सेठी यांनी शो उघडला, तर उमेश फिरवानी, दिव्या पोरवाल, अनुराधा गुप्ता, तरुण खन्ना आणि स्मृती खन्ना हे शोस्टॉपर्स होते. ग्रँड फिनाले बॉबीचा होता, नाद्या आणि दक्ष सेठी हे शो ओपनर होते, आणि प्रियांशू चॅटर्जी आणि अनुपमा कुवर हे शोस्टॉपर्स होते. अर्चना जैन यांचे अभिनंदन करताना शायना एनसी म्हणाल्या की, महिलांचे सक्षमीकरण करणे अत्यंत महत्त्वाचे असून अर्चनाचे हे पाऊल कौतुकास्पद आहे.



## सुविचार

उगवणाऱ्या सूर्याचे आणि पळणाऱ्या
घोड्यांचे चित्र भिंतीवर लावून प्रगती होत नसते.
प्रगती करण्यासाठी सूर्योदयाच्या आधी उठून
घोड्याच्या वेगाने कष्टाची दौड करावी लागते.

# पूर्वीच्या कलात्मक सुंदर विळ्या, खवण्या व किसण्या!

लेखक
मकरंद करंदीकर

भारतातील आणि विशेषतः महाराष्ट्रातील पूर्वापार चालत आलेल्या भोजन पद्धती आणि जेवणासाठी वापरली जाणारी वैशिष्ट्यपूर्ण भांडी, स्वयंपाकघरातील वेगळ्या वस्तू यांची माहिती, त्यांची उपयुक्तता, आख्यायिका यावर मी अनेक लेख लिहिले आहेत. यातील अनेक प्रथा आणि वस्तू आता लुप्त होत चालल्या आहेत. यातील कांही वस्तू माझ्या संग्रहात आहेत.

स्वयंपाकघरांमध्ये अनेक पिढ्यांची खाद्यसंस्कृती जपलेली असायची. कित्येक भांडी आणि वस्तू या ३ / ४ पिढ्या वापरात असायच्या. झिजल्या, मोडल्या तरच नवीन नाहीतर त्याचा अविरत वापर होत राहायचा. रोजच्या



कामांसाठी, विशिष्ट सणवारांसाठी, अधिक पाहुणे येणार असल्यास, मोठे कार्य असले तर त्यानुसार भांडी आणि वस्तू वापरल्या जात असत. एरवी माळ्यावर, कोठीच्या खोलीत अशी भांडी व वस्तू ठेवल्या जात असत. मांसाहार करणाऱ्या अनेक घरांमधून उपवास, चातुर्मास, पूजा, व्रते अशा वेळी भांडीही वेगळी वापरली जात असत. त्या काळी Kitchen Staff, Chef, Assistants वगैरे सर्व स्त्रियाच असायच्या. खूप अवजड कामांसाठी एखादा धोंडू, रामा, पांडू मदतीला येत असे. या विभागाचे प्रमुखपद हे नात्याने ज्येष्ठ असलेल्या स्त्रीकडे आपोआपच यायचे.




स्वयंपाकासाठी भाज्या, मांस, मासे इत्यादी चिरणे ही एक महत्वाची क्रिया आहे. यासाठी विळया, खवण्या व किसण्या यांचा खूप वापर होत असे. देशाच्या अर्ध्याहून अधिक भागात चाकू, सुरीचा वापर खूप कमी प्रमाणात होत असे. ही छोटी शस्त्रे म्हणून वापरली जात असत. लिंबू कापणे याला वेगळा अर्थ होता. खाण्यासाठी लिंबू चिरले जात असे. पण या तीन वस्तूंच्या वापरातून स्वयंपाकघरातील कापणे, चिरणे, तोडणे, सोलणे, चोचविणे, खापरणे, खरवडणे, किसणे, शिरा काढणे अशी अनेक क्रियापदे मराठी भाषेत रूढ झाली. या वस्तूंच्या निर्मितीसाठी पोलाद, लोखंड, पितळ,लाकूड इत्यादींचा वापर केला जात असे. यात अत्यंत कुशल अशा लोहार, सुतार, तांबट समाजातील कारागिरांचा सहभाग असे. आर्थिक व्यवहारापेक्षा उपयुक्तता आणि कला कौशल्याला अधिक प्राधान्य दिले जात असे. त्यांनी बनविलेल्या कित्येक वस्तू शेकडो वर्षे टिकून राहिल्या आहेत.

सोबत माझ्या संग्रहातील कांही अत्यंत नक्षीदार, विविध सजावटीच्या विळया, खवण्या व किसण्यांचे फोटो व माहिती देत आहे. पहिल्या आणि नवव्या फोटोतील विळी व खवणी खूप जड असून, गरज नसेल तेव्हा याच्या विळीचे पक्षीमुख पाते, पाटावर घडी घालून ठेवता येते. दुसऱ्या फोटोतील संचाच्या पेटीवर खूप छान कोरीव काम केलेले असून यातील खोक्यात विळी व खवणीची दोन्ही पाती काढून, घडी घालून ठेवता येतात. नंतरची ( फोटो क्रमांक ३ ) सुंदर नक्षीकाम असलेली मोराची विळी ही पितळ व पोलादापासून तयार करण्यात आली आहे. फोटो क्रमांक ४ मधील खवणीला, खवल्यावर खाली पडणाऱ्या नारळाच्या किसासाठी विशेष खोलगट जागा आहे. दक्षिणेतील या खवणीला अरुवामनाई म्हणतात. नंतरच्या फोटोतील पितळी संच हा विशेष आहे. यात विळी, खवणी आणि किसणी एकत्रच आहेत. विळी खवणीचा नंतरचा संच पूर्ण पोलादी आहे. ४ इंचांची एकसंध लाकडातून कोरलेली विळी ही बदाम, पिस्ते अशा सुक्यामेव्याचे काप करण्यासाठी व छोटी पितळी विळी ही लिंबू कापण्यासाठी आहे. विळीला वऱ्हाडी भाषेत पावशी असा वेगळाच शब्द आहे. नंतरच्या अष्टकोनी, कासवाच्या आकाराची, आयताकृती या किसण्या तर आत्ता आत्तापर्यंत वापरात होत्या. शेवटच्या फोटोतील हात खवणी तर झटपट वापरण्यासाठी उपयुक्त आहे.

आता नव्या जमान्याचे मिक्सर, फूड प्रोसेसर, ग्रेटर्स, स्लायसर अवतरले आहेत. जमिनीवर बसून काम करण्याऐवजी ओट्यावरच ठेऊन वापरण्याचे विळी, खवणी आणि किसणी संच आले आहेत. पण तरीही गावांमधील या जुन्या वस्तूंचे उपयोग अजूनही चालू आहेत हे महत्वाचे आहे.

# तेथे कर माझे जुळती!

लेखक
प्रशांत कुळकर्णी



"शलाका अग , शलू ,उठा आता शाळेत जायचे आहे, तुझ्या सारखी आळशी, अंथरुणात झोपेला घट्ट कवटाळून झोपणारी लेक पदरात असेल तर माझी पुजा तरी लवकर कशी होणार ?" शलाकाचि आई हसत हसत म्हणाली.

"दुपारी शाळा सुटली घराच्या दिशेने चालताना मुले आपसात बोलत होती.

" देवाघरी गेलेल्या रतनजी टाटांची माहिती किती सुंदर सांगितली दवणे बाईंनी !

माझी आई चहाची बरणी उघडते त्यावर लिहिलेले असते टाटा टी ! माझी आई रोज बाबांच्या हातात चहा देते आणि म्हणते, " टाटा चहा पिऊन तर पहा ! मग बाबा कामाला जायला निघतात, जाताना मला शाळेत सोडताना म्हणतात टाटा बाय बाय !

शलू आता तु शाळेत आणि मी माझ्या गाडीवर टाटा ट्रकवर ! यामुळे टाटा हे नाव दिवसभर आमच्या सोबतच असते."शलू तुझे बाबा ड्रायव्हर आहेत का ग ?" रंजिताने विचारले, "रंजू माझे बाबा नुसतेच ड्रायव्हर नाही , तर माझे बाबा रेती विकतात आमचा भलामोठा ट्रक आहे, आपल्या साईनाथ नगराचे गणपती बाप्पा,येतात आणि जातात सुध्दा आमच्या ट्रकमधून बरं का !" शलाका अभिमानाने म्हणाली.

"आज आपले मुख्याध्यापक सुध्दा काहीतरी म्हणाले मला काही कळले नाही एवढेच समजले की रतन टाटांच्या मालकीचे चहाचे मळे होते ,जे ट्रक आणि गाड्या तयार करायचे,विकायचे ते देवाघरी गेले आहेत !" विनोद आपल्या केसांवर हात फिरवत म्हणाला.

"अरे बावळट कुठला ! तुला कळलेच नाही रतनजी टाटा कोण होते ते ?" अरे वर्गात झोपा काढू नकोस, आपले शिक्षक जे सांगतात ते आपण लक्ष देऊन ऐकले पाहिजे,नाही समजले तर पुन्हा पुन्हा विचारले पाहिजे, तू मागणार तर नाहीस ,मग शोधणार तरी कसा?

मागा म्हणजे मिळेल शोधा म्हणजे सापडेल! पण शाळा कधी सुटणार ! आणि मी घरी कधी धावत जाणार ? याची वाट बघणाऱ्या तुझ्या सारख्या चांगल्या मुलाला ते कसे कळणार ? देवकी विनोदला चिडवत चिडवत म्हणाली.

" अरे उगीचच विनोदला बोलू नका, आपल्या शेरे बाईंनी सांगितले आहे की रतन टाटांची माहिती मिळवा आणि उद्या,मला कळलेले रतनजी टाटा,असा निबंध लिहून आणा, विनोद घरी जा पहिले जेऊन घे,मग आजोबांना विचार, त्यांच्याकडे रतन टाटांची खुप माहिती मिळेल !" शलाका म्हणाली.

" शलाका बरं झालं तू मला आजोबांची आठवण करुन दिलीस,माझे आजोबा तर टाटांच्या बोरीवलीच्या लोखंडाच्या कारखान्यात कामाला होते! विनोद शलाकास म्हणाला.

सर्व मुले रमत गमत आपापल्या घरी रवाना झाली. सर्वजण संध्याकाळी गरबा खेळण्यासाठी पुन्हा भेटणारच होते.

शलाका घरी आली, आईने प्रेमाने जेऊ घातले आणि तिच्या हातात एक पुस्तक दिले.आणि म्हणाली, " तुझी काकी तुझ्यासाठी ' रतन टाटांच्या बालकथा' हे पुस्तक आणि खरवस देऊन गेली आहे. तुला पहिले काय देऊ खरवस की पुस्तक ? आईने विचारले. " शलाका आईला खुशीत जाऊन बिलगली आणि म्हणाली, " माय लाडाची आई ! पुस्तक आणि खरवस दोन्ही एकसाथ दे आणि तू खुशाल आराम कर !"

" आणि तू काय करणार ?" "अग आये माझे लाडाची आये मी पुस्तक वाचता वाचता खरवस सुध्दा खाणार!" काकी ने वाचनालयातून आणलेले ते छोटेसे पुस्तक वाचता वाचता शलाका झोपी गेली. रात्री साडेआठ वाजता साईनाथ नगरातील बरेच लोक मैदानावर जमा झाले होते. परंतू आज ढोल ताशा,बॅंड बाजा,डिजे वगैरे काही नव्हते.एका टेबलावर रतन टाटा यांचा फोटो सुबकपणे मांडला होता,त्याच्यावर सुंदर फुले,हार वाहिलेले होते.मुलांच्या घोळक्यात असलेल्या शलाकास पाहून विद्या घाईघाईने पुढे आली आणि म्हणाली," शलू आज म्हणतात गरबा होणार नाही,आपले रतन टाटा देवाघरी गेले म्हणून त्यांना आदरांजली वाहिली जाणार आहे ! अमरदादा सुध्दा येणार आहे,सगळे त्याची पाहत आहेत.

" अमर दादा कोण हा अमर दादा ?

इतक्यात अमर दादा आला! अमर दादा आला असा लोकांचा एकच गलका सुरू झाला ! शलाका,विद्या, विनोद, सुहास,अशी सगळी लहान लहान मुले टाचा उंचावून अमर कोण आहे ते पाहायला लागले.शलाकाने अमरला पाहिले आणि जोरजोराने ओरडायला लागली,

"अरे हाच तर अमरदादा आहे ज्याने लिहिलेले पुस्तक मी आजच वाचले !"

सगळी मुलांची टोळी आता शलाकाकडे पाहायला लागली.

अमर मंडपात आला,रतन टाटांच्या फोटोला नमस्कार केला, फुले वाहून झाल्यानंतर तो म्हणाला,

" आपण पहिल्यांदा शांतता पाळून रतनजी टाटांना आदरांजली अर्पण करु !"

सर्व जण हात जोडून स्तब्ध उभे राहिले मनोमन प्रार्थना केली. थोड्या वेळानंतर अमर म्हणाला .

" मी मघाशी मंडपात आलो तेव्हा एका छोट्याशा मुलीला बोलताना ऐकले,ती म्हणत होती,

" अमर दादाचे पुस्तक मी वाचले आहे.कोण आहे ती मुलगी ? नाव काय तिचे ? तीने इथे यावे प्लीज!"

अमरच्या माईक वरुन बोलण्याने शलाका भांबावून गेली पण लगेचच ती भानावर आली आणि अमर दादाच्या जवळ गेली आणि म्हणाली,

" हो मीच शलाका! मी अमरदादाचे पुस्तक वाचले आहे ! पुस्तकाच्या मागच्या पानावर अमरदादांचा फोटो आणि त्याची माहिती छापली आहे ती सुद्धा मी वाचली ! सांगू का तुम्हाला सगळ्यांना ?" शलाका ने विचारले,

"सांग सांग शलाका लवकर सांग!" लोकांचा आवाज येऊ लागला.

म्हणूनच शलाकाने बोलायला सुरुवात केली.

रतनजी टाटा खुप मोठ्या टाटा ग्रुपचे अध्यक्ष होते. मसाले, औषधे, चहा पावडर,लोखंड, सिमेंट, ट्रक, मोटारगाड्या ,अशा अनेक अनेक गोष्टी टाटांच्या कंपनीत तयार होतात .

त्याशिवाय विमान कंपनी, पंचतारांकित हॉटेल , कोळशाच्या खाणी सुध्दा टाटांच्या आहेत.

शाळा महाविद्यालये, सामाजिक शिक्षण संस्था, हॉस्पिटल अशा मोजता सुध्दा येणार नाहीत एवढ्या गोष्टी टाटांना सांभाळताना आनंद होतो. गरीबांना औषधे, इलाज करण्यासाठी टाटा पैशे देऊन मदत करतात. अमर दादा, आपल्या साईनाथ नगरात राहात होता,त्याचे आईवडील खुप गरीब होते.एकदिवशी अमरदादा खुप आजारी पडला,त्याच्या हृदयाला भोक पडले होते .त्याला श्वास घेता येत नव्हता.

तेव्हा टाटांच्या लोकांसाठी असलेल्या फंडातून अमर दादाला मदत मिळाली, शस्त्रक्रिया झाली , उपचार झाले.नंतर टाटांच्या कंपन्यांच्या फंडातून अमर दादाला शिकण्यासाठी मदत मिळाली,तो खुप खुप शिकला आणि टाटांच्या विमान कंपनीचा पायलट झाला.

आपल्या आईबाबांना राहाण्यासाठी त्याने खुप मोठी जागा घेतली आहे.अमर दादाने लिहिलेले पुस्तक मी वाचले म्हणून मला टाटा समजले.माझा अमर दादाला थॅंक यू आणि नमस्कार.रतनजी टाटांना विनम्रपणे श्रद्धांजली! रतनजी टाटा खुप महान म्हणूनच मी म्हणते!

दिव्यत्वाची जेथे प्रचिती ! तेथे कर माझे जुळती ! अमरदादा आणि सर्व लोक शलाकाकडे कौतुकाने पाहायला लागले.

# मेणाचा सिंह

काही वर्षांपूर्वीची गोष्ट आहे जेव्हा राजे एकमेकांना निरोपासह काही कोडेही पाठवत असत. असाच एक राजाचा दूत हिवाळ्यात एके दिवशी मुघल साम्राज्याचा सम्राट अकबराच्या दरबारात पोहोचला. त्याने एक कोडे म्हणून पिंजऱ्यात बंदिस्त सिंह सोबत घेतला. राजाने कोड्यासह निरोपही पाठवला. पिंजऱ्याला आणि सिंहाला हात न लावता सिंहाला बाहेर काढणारा मुघल राज्यात कोणी हुशार आहे का, असे संदेशात लिहिले होते. आता मुघल सम्राट अकबर विचार करू लागला की सिंहाला आणि पिंजऱ्याला हात न लावता सिंहाला कसे बाहेर काढता येईल. एखाद्या व्यक्तीला सिंहाला पिंजऱ्यातून बाहेर काढण्याची एकच संधी मिळेल, असे कोडे पाठवलेल्या संदेशातही स्पष्टपणे लिहिले होते.

अकबर खूप अस्वस्थ झाला. त्यांना वाटले की हे फार कठीण आहे आणि जर सिंहाला पिंजऱ्यातून बाहेर काढता आले नाही तर मुघल राज्याची खूप बदनामी होईल. हा सगळा विचार करत असतानाच त्यांनी दरबारात उपस्थित सर्वांकडे पाहिले आणि विचारले, 'हे कोडे सोडवणारा कोणी आहे का', पण हे कसे शक्य आहे, या विचारात सर्वजण मग्न झाले. अकबराच्या प्रश्नाला कोणीही उत्तर दिले नाही तेव्हा त्याला आपला वजीर बिरबल आठवला, जो विधानसभेत उपस्थित नव्हता. त्यांनी ताबडतोब द्वारपालाला पाठवून बिरबलाला दरबारात हजर राहण्याचा आदेश दिला, पण बिरबल काही सरकारी कामासाठी राज्याबाहेर गेला होता.

रात्रभर अकबर हे कोडे कसे सोडवायचे या विचारात मग्न राहिला. दुसऱ्या दिवशी पुन्हा दरबार भरवण्यात आला, पण बिरबलाची खुर्ची रिकामी पाहून अकबराला वाईट वाटले. बादशहाने पुन्हा दरबारींना विचारले, 'या सिंहाला पिंजऱ्यातून बाहेर काढण्याची कोणाला कल्पना आहे का?' इतक्यात एक दरबारी अकबराच्या समोर आला आणि त्याने सिंहाला पिंजऱ्यातून बाहेर काढण्याचा प्रयत्न केला, पण तो अयशस्वी झाला. दुसऱ्या पोर्टरने कोडे सोडवण्यासाठी जादूगाराला बोलावले, पण तोही अयशस्वी झाला.

प्रयत्न करता करता संध्याकाळ झाली, तेवढ्यात बिरबल दरबारात पोहोचला. अकबरला अस्वस्थ पाहून बिरबलाने विचारले, 'काय झाले बादशाह, तुम्ही इतके अस्वस्थ का आहात?' बादशहाने लगेच बिरबलाला सिंहाशी संबंधित कोडे सर्व सांगितले. अकबराने बिरबलाला विचारले, 'तुम्ही हा सिंह पिंजऱ्यातून बाहेर काढू शकाल का?' बिरबल म्हणाला, 'हो, मी प्रयत्न करू शकतो.' अकबरला खूप आनंद झाला, कारण मुघल साम्राज्यात बिरबलाएवढा हुशार आणि हुशार दुसरा कोणी नव्हता. तेथे


सिंहाला पिंजऱ्यातून बाहेर काढण्यासाठी बिरबलाने अकबरला सांगितले की, त्याला दोन लाल-गरम लोखंडी सळ्या आणि सळ्यांची गरज आहे. बादशहाने लगेच व्यवस्था करण्यास सांगितले. बिरबलाला लोखंडी रॉड मिळताच, पिंजऱ्याला हात न लावता तो रॉड आत पोहोचला आणि त्याने बनावट सिंहावर ठेवला. गरम लोखंडी रॉडच्या संपर्कात येताच सिंह वितळू लागला, कारण तो मेणाचा सिंह होता. काही वेळात संपूर्ण सिंह पिंजऱ्यातून मेणाच्या रूपात बाहेर आला.

बिरबलाच्या या शहाणपणावर अकबर खूप खूश झाला. त्याने बिरबलाला विचारले, 'अरे! शेवटी, हा पिंजऱ्यात कैद झालेला मेणाचा सिंह आहे हे तुला कसे कळले.'' बिरबलाने अतिशय नम्रपणे उत्तर दिले, ''हजूर, फक्त सिंहाला काळजीपूर्वक पाहण्याची गरज होती. कोडे जाणून घेतल्यानंतर जेव्हा मी ते काळजीपूर्वक पाहिले तेव्हा मला वाटले की तो मेणाचा सिंह असू शकतो. त्याचवेळी राजाने सिंहाला कसे बाहेर काढायचे हे देखील सांगितले नाही म्हणून मी तो वितळवून बाहेर काढले.

इकडे बिरबल दरबारात जयजयकार करू लागला. दुसरीकडे, कोडे घेऊन अकबराच्या दरबारात पोहोचलेला राजदूत आपल्या राज्यात परतला आणि त्याने बिरबलाच्या या पराक्रमाबद्दल राजाला सांगितले. असे म्हणतात की त्या दिवसापासून राजाने अशी कोडी पाठवणे बंद केले.

**कथेतून शिका:- बुद्धीने सर्व काही शक्य आहे. प्रत्येक ठिकाणी बळाचा नव्हे तर बुद्धिमत्तेचा वापर केला पाहिजे. प्रत्येक समस्या मनाने सोडवता येते.**


## मनोरंजक शब्दकोड



**आडवे शब्द :**
१) मूर्ख २) चिवट, कडक ५) उष्ण ६) कटी ८) भाळ १०) चेष्टा ११) एक मद्य प्रकार १२) एक अलंकार १३) वाईट १४) वाहनाला दिशा देणारे साधन १५) थंड १७) एखाद्या गोष्टीवर आदळणे १८) लांबी मोजण्याचे परिमाण १९) गोधडी २०) पत्र २४) घोळका, समुदाय २५) मर्कट २६) कमी करणे २८) सैल अंगरखा ३०) समुद्र ३१) अरण्य ३२) एक द्विपाद प्राणी ३४) तबला वाजवणारा ३५) मालक ३७) ताक घुसळण्याचे साधन

**उभे शब्द :**
१) अस्सल, खरे २) मोटार ३) घोडागाडी ४) मनोरंजन ५) मासे पकडण्याचे साधन ७) फणसाचा प्रकार ८) काल्पनिक ९) पान १३) वादळ १४) स्वर्गातील दिव्य पुरुष १६) पोळी भाजण्याचे साधन १८) द्विदल धान्य २१) खाण्याची वर्तुळाकार चकती २२) बसण्याचे साधन २३) हे दह्यापासून बनते २४) शेवटचे लहान बोट २५) माळ २७) XXX खिंड २९) मोठी होडी ३१) बुद्धिबळातील एक सोंगटी ३२) रस्ता ३३) हत्या ३६) दुसरे व्यंजन

## चित्रातील ५ फरक ओळखा




## चित्र रंगवा




## बालचित्ररंग




चित्रकार
अर्पिता भोवड
सेंट अलोयसिस हायस्कूल नालासोपारा



## चला चित्र शिकूया



## स्टाईल मारो



आराध्य सावंत
गुरुनानक हायस्कूल,भांडुप